# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ४०

## सभावृत्तांत

दिनांक - २०.२.२०१५ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रूवारी-२०१५ ची मासीक मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२०.२.२०१५ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
६. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७. मा.सायकर अजय शंकरराव
८. मा.जाधव साधना रामदास
९. मा.जाधव राहुल गुलाब
१०. मा.आल्हाट मंदा उत्तम
११. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१२. मा.काळजे नितीन प्रताप
१३. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१४. मा.बाबर शारदा प्रकाश
१५. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१६. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१७. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१८. मा.पवार संगीता शाम
१९. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२०. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२१. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२२. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२४. मा.भारती फरांदे
२५. मा.आर.एस.कुमार
२६. मा.जावेद रमजान शेख
२७. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३०. मा.नंदा विकास ताकवणे
३१. मा.नेटके सुमन राजेंद्र
३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३४. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३५. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३६. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
३७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३८. मा.अपर्णा निलेश डोके
३९. मा.अनंत सुभाष को-हाळे
४०. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४१. मा.जयश्री वसंत गावडे
४२. मा.पवार मनीषा काळूराम
४३. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४४. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४५. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४६. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४७. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४८. मा.वाबळे संजय मल्हारराव
४९. मा.मडिगेरी वर्षा विलास
५०. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५१. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५२. मा.सुपे आशा रविंद्र
५३. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५४. मा.मोहिनीताई विलास लांडे
५५. मा.गोफणे अनुराधा देविदास
५६. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५८. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
५९. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६०. मा.लोंढे शुभांगी संतोष
६१. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६२. मा.सावळे सिमा रविंद्र
६३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६४. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६५. मा.पालांडे सुजाता सुनिल
६६. मा.बहल योगेश मंगलसेन
६७. मा.कदम सदगुरु महादेव
६८. मा.गिता सुशील मंचरकर
६९. मा.कैलास महादेव कदम
७०. मा.छाया जगन्नाथ साबळे
७१. मा.आसवाणी सविता धनराज
७२. मा.वाघेरे सुनिता राजेश
७३. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७४. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७५. मा.पाडाळे निता विलास
७६. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
७७. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
७८. मा.विमलताई सुरेश जगताप
७९. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८०. मा.बारणे निलेश हिरामण
८१. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८२. मा.बारणे माया संतोष
८३. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८४. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८५. मा.कलाटे स्वाती मयुर
८६. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८७. मा.चौंधे आरती सुरेश
८८. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
८९. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
९०. मा.जवळकर वैशाली राहुल
९१. मा.जगताप राजेंद्र गणपत
९२. मा.शितोळे शैलजा बाबुराव
९३. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
९४. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
९५. मा.जम सोनाली पोपट
९६. मा.प्रशांत शितोळे
९७. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी
९८. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
९९. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१००. मा.शेंडगे आशा सुखदेव
१०१. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०२. मा.संजय केशवराव काटे

१०३. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१०४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१०५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, डॉ.अनिल रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण-सह शहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.दंडवते, मा.दुरगूडे, मा.खोसे, मा.कडूसकर - सहा.आयुक्त, मा.पवार - अति.कायदा सल्लागार, मा.साळुंखे- मुख्य उदयान अधिक्षक मा.दुधेकर, मा.सवणे, मा.इंगळे, मा.साळवी, मा.गट्टूवार-कार्य.अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.नगरसेवक, नगरसेविका, पत्रकार, आर.आर.पाटील उर्फ आबा-माजी उपमुख्यमंत्री व गृहमंत्री, दत्तात्रय नामदे-मोहननगर येथील सामाजिक कार्यकर्ते यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करुन आजची सभा गुरुवार दि.२६/२/२०१५ पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.नगरसेवक, नगरसेविका, पत्रकार, सर्व पक्षाचे गटनेते. मी आपल्या सर्वांना नंम्रपणे सांगू इच्छितो की, आर.आर.पाटील यांच्या दु:खद निधनानिमीत्त उदया पिंपरी चिंचवड सर्व पक्षाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर पिंपरी चौकाच्या प्रांगणामध्ये दुपारी ४.३० वा. सर्वपक्षीय शोकसभा घेणार आहोत आपण सर्वांनी उपस्थित रहावे. सर्व पक्षाच्या गटनेत्यांनी आपआपल्या नगरसेवकांना, सर्व कार्यकर्त्यांना सुचना कराव्यात. तसेच आर.आर.पाटिल यांचे अस्थिकलश दुपारी १२ ते ४ पर्यंत राष्ट्रवादी पक्षाच्या खराळवाडी कार्यालयात ठेवण्यात येणार आहेत. तद्नंतर शोकसभा घेणार आहोत त्याठिकाणी सुध्दा अस्थिकलश दर्शनासाठी ठेवणार आहोत.

**मा.जितेंद्र ननावरे -** मा.महापौर साहब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.महापौर -** सर्वांच्या संमतीप्रमाणे गुरुवार दिनांक २६/२/२०१५ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ४०.**

**सभावृत्तांत**

**(दि.२०/२/२०१५ ची तहकूब सभा )**

दिनांक - २६.२.२०१५ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे फेब्रूवारी-२०१५) दि.२०.२.२०१५ ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दि.२६.२.२०१५ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१७. मा.जगदीश शेट्टी
१८. मा.बाबर शारदा प्रकाश
१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
२०. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२१. मा.उल्हास शेट्टी
२२. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२३. मा.पवार संगीता शाम
२४. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२५. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२६. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२८. मा.भारती फरांदे
२९. मा.आर.एस.कुमार
३०. मा.जावेद रमजान शेख
३१. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३२. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३३. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३४. मा.राजू मिसाळ
३५. मा.नंदा विकास ताकवणे
३६. मा.नेटके सुमन राजेंद्र
३७. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३८. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३९. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
४०. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
४१. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४२. मा.लोंढे गणेश नारायण
४३. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
४४. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
४५. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४६. मा.अपर्णा निलेश डोके
४७. मा.अनंत सुभाष को-हाळे
४८. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४९. मा.जयश्री वसंत गावडे
५०. मा.पवार मनीषा काळूराम
५१. मा.प्रसाद शेट्टी
५२. मा.काळभोर वैशाली जालिंदर
५३. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
५४. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५६. मा.वाबळे संजय मल्हारराव
५७. मा.मडिगेरी वर्षा विलास
५८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५९. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६०. मा.सुपे आशा रविंद्र
६१. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
६२. मा.मोहिनीताई विलास लांडे

६३. मा.गोफणे अनुराधा देविदास
६४. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६५. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६६. मा.महेशदादा किसन लांडगे
६७. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
६८. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६९. मा.लोंढे शुभांगी संतोष
७०. मा.ननवरे जितेंद्र बाबा
७१. मा.सावळे सिमा रविंद्र
७२. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७३. मा.भोसले राहूल हनुमंतराव
७४. मा.पालांडे सुजाता सुनिल
७५. मा.बहल योगेश मंगलसेन
७६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७७. मा.कदम सदगुरु महादेव
७८. मा.गिता सुशील मंचरकर
७९. मा.कैलास महादेव कदम
८०. मा.छाया जगन्नाथ साबळे
८१. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
८२. मा.टाक अरुण मदन
८३. मा.आसवाणी सविता धनराज
८४. मा.वाघेरे सुनिता राजेश
८५. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
८६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८७. मा .ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
८८. मा.काळे विमल रमेश
८९. मा.पाडाळे निता विलास
९०. मा.विनोद जयवंत नढे
९१. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
९२. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
९३. मा.विमलताई सुरेश जगताप
९४. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
९५. मा.बारणे निलेश हिरामण
९६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९७. मा.बारणे माया संतोष
९८. मा.ओव्हाळ शेखर अशोक
९९. मा.यमुनाताई रमणनाना पवार

१००. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
१०१. मा.कलाटे स्वाती मयुर
१०२. मा.चौंधे आरती सुरेश
१०३. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१०४. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
१०५. मा.बोकड रामदास गेणभाऊ
१०६. मा.जवळकर वैशाली राहुल
१०७. मा.जगताप राजेंद्र गणपत
१०८. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०९. मा.जगताप नवनाथ दत्तु
११०. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१११. मा.जम सोनाली पोपट
११२. मा.प्रशांत शितोळे
११३. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी
११४. मा.गायकवाड संध्या सुरदास
११५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११६. मा.शेंडगे आशा सुखदेव
११७. मा.मोटे किरण बाळासाहेब
११८. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
११९. मा.संजय केशवराव काटे
१२०. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१२१. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१२२. मा.पाटील सुजित वसंत
१२३. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१२४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, डॉ.अनिल रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण-सह शहर अभियंता,मा.डोईफोडे,मा.कडुसकर, मा.गायकवाड, मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.दुरगूडे, खोसे - सहा.आयुक्त, मा.पवार - अति. कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.उबाळे- प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.पठाण, मा.कुलकर्णी,मा.घोडे,मा.कांबळे,मा.गद्दूवार-कार्य.अभियंता, मा.प्रविण आष्टीकर-सह.व्यवस्थापकीय संचालक (पीएमपीएमएल), मा.बोदडे - प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, लोणावळा येथील हॉटेलमध्ये सात वर्षीय मुलीच्या झालेल्या निर्घृण हत्येचा निषेध तसेच गोविंद पानसरे उर्फ अण्णा-ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते, पुरोगामी विचारवंत, दत्तु बबन बारणे-थेरगांव यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.अपर्णा डोके-**मा.महापौर साहेब, आजची सभा श्रध्दांजली वाहून दुपारी २.४५ पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर -** सर्वांच्या संमतीप्रमाणे गुरुवार दिनांक २६/२/२०१५ रोजी दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ४०</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**(दि.२०/२/२०१५, दि.२६/२/२०१५ (दु.२.००) ची तहकूब सभा)**

<u>दिनांक - २६.२.२०१५</u> <u>वेळ - दुपारी २.४५ वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे फेब्रूवारी-२०१५) दि.२६.२.२०१५ (दु.२.००) ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दि.२६.२.२०१५ रोजी दुपारी २.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१७. मा.जगदीश शेट्टी
१८. मा.बाबर शारदा प्रकाश
१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

२०. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२१. मा.उल्हास शेट्टी

२२. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२३. मा.पवार संगीता शाम

२४. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२५. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२६. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२८. मा.भारती फरांदे

२९. मा.आर.एस.कुमार

३०. मा.जावेद रमजान शेख

३१. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३२. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३३. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३४. मा.राजू मिसाळ

३५. मा.नंदा विकास ताकवणे

३६. मा.नेटके सुमन राजेंद्र

३७. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३८. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३९. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४०. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

४१. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

४२. मा.लोंढे गणेश नारायण

४३. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४४. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

४५. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४६. मा.अपर्णा निलेश डोके

४७. मा.अनंत सुभाष को-हाळे

४८. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४९. मा.जयश्री वसंत गावडे

५०. मा.पवार मनीषा काळूराम

५१. मा.प्रसाद शेट्टी

५२. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५३. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५४. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५६. मा.वाबळे संजय मल्हारराव

५७. मा.मडिगेरी वर्षा विलास

५८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५९. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

६०. मा.सुपे आशा रविंद्र

६१. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

६२. मा.मोहिनीताई विलास लांडे

६३. मा.गोफणे अनुराधा देविदास

६४. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६५. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६६. मा.महेशदादा किसन लांडगे

६७. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६८. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६९. मा.लोंढे शुभांगी संतोष

७०. मा.ननवरे जितेंद्र बाबा

७१. मा.सावळे सिमा रविंद्र

७२. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

७३. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७४. मा.पालांडे सुजाता सुनिल

७५. मा.बहल योगेश मंगलसेन

७६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७७. मा.कदम सदगुरु महादेव

७८. मा.गिता सुशील मंचरकर

७९. मा.कैलास महादेव कदम

८०. मा.छाया जगन्नाथ साबळे

८१. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

८२. मा.टाक अरुण मदन

८३. मा.आसवाणी सविता धनराज

८४. मा.वाघेरे सुनिता राजेश

८५. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८७. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८८. मा.काळे विमल रमेश

८९. मा.पाडाळे निता विलास

९०. मा.विनोद जयवंत नढे

९१. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

९२. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

९३. मा.विमलताई सुरेश जगताप

९४. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९५. मा.बारणे निलेश हिरामण

९६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९७. मा.बारणे माया संतोष

९८. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९९. मा.यमुनाताई रमणनाना पवार

१००. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

१०१. मा.कलाटे स्वाती मयुर

१०२. मा.चौंधे आरती सुरेश

१०३. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०४. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०५. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०६. मा.जवळकर वैशाली राहुल

१०७. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०८. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०९. मा.जगताप नवनाथ दत्तु

११०. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१११. मा.जम सोनाली पोपट

११२. मा.प्रशांत शितोळे

११३. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

११४. मा.गायकवाड संध्या सुरदास

११५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११६. मा.शेंडगे आशा सुखदेव

११७. मा.मोटे किरण बाळासाहेब

११८. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११९. मा.संजय केशवराव काटे

१२०. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१२१. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१२२. मा.पाटील सुजित वसंत

१२३. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.चव्हाण, मा.पाटील- सह शहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड,मा.माने, मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.दुरगूडे, मा.खोसे, मा.कडूसकर-सहा.आयुक्त, मा.पवार-अति.कायदा सल्लागार, मा.साळुके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.उबाळे-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.साळवी,मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.गढूवास-कार्य.अभियंता, मा.प्रविण आष्टीकर-सह.व्यवस्थापकीय संचालक (पीएमपीएमएल), मा.बोदडे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) मा.महापालिका सभा क्रमांक - ३८ दिनांक २०/१२/२०१४ व २३/१२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

## <u>नियुक्त्या</u>

**विषय क्रमांक १)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या कलम ३१अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे.

**मा.नगरसचिव -** विषय क्रमांक १ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे करीता सदर कलमा अन्वये महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली. तसेच रिक्त होणा-या जागांवर निवृत्त झालेला मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा गटाचा आघाडीचा किंवा फ्रंटचा आहे त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या/ नोंदणीकृत पक्षाच्या/गटाच्या/ आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास नामनिर्देशित करावयाचे असून विद्यमान मा.स्थायी समितीचे दिनांक १ मार्च २०१५ रोजी दुपारी निवृत्त होणारे सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे-

१) मा.वाघेरे सुनिता राजेश - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी २) मा.महेशदादा किसन लांडगे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ३) मा.बारणे माया संतोष - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ४) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ५) मा.लोंढे गणेश नारायण - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी ६) मा.कदम सदगुरु महादेव - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी ७) मा.भोंडवे संगिता राजेंद्र - शिवसेना आर.पी.आय. महायुती (आघाडी) ८) मा.शेंडगे आशा सुखदेव - शिवसेना आर.पी.आय.महायुती (आघाडी).

यािप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉग्रेस आघाडी - ४, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित अपक्ष (आघाडी) - २, आणि शिवसेना व आर.पी.आय.महायुती (आघाडी) - २ या पक्षियबलाप्रमाणे नियुक्त्या करणे करीता.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचे गटनेते मा.मंगलाताई अशोक कदम यांनी त्यांच्या पक्षाचे ४ सदस्यांची नांवे बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावीत. (बंद लखोटा देणेत आला.)

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित अपक्ष (आघाडी) गटनेते मा.विनोद जयवंत नढे यांनी त्यांच्या पक्षाच्या २ सदस्यांची नांवे बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी महापौरांकडे द्यावीत. (बंद लखोटा देणेत आला.)

शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) यांचे गटनेत्या मा.उबाळे सुलभा रामभाऊ यांनी त्यांच्या पक्षाच्या २ सदस्यांची नांवे बंद लखोटयातून द्यावीत (बंद लखोटा देणेत आला.)

**मा.कैलास कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच नगरसचिवांनी याठिकाणी सांगीतले की स्थायी समिती सदस्यांची निवड करावयाची त्यासाठी प्रत्येक पक्षाकडे आपआपले नावे मागवले आहेत. नगरसचिव यांनी मला आता पत्र दिलेले आहे ते पत्र असं दिलेले आहे, ही बाब भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रीवादी प्रणीत आघाडी. आमची बाब ही उच्च न्यायालयामध्ये असल्याकारणाने, हायकोर्टात ही बाब असल्यामुळे सन्मा.महापौर, मला तुम्हांला विनंती करायची आहे की हायकोर्टाने स्टे दिलेला आहे. सन्मा.सदस्य काँग्रेस पक्षाचे विनोद नढे हायकोर्टात गेले असल्या कारणाने त्यास स्टे दिलेला आहे. स्टे म्हणजे त्याठिकाणी माझी केस कुठेतरी डिसमीस केली असा त्याचा अर्थ होत नाही. हायकोर्टाचे कुठेही लेखी आदेश याठिकाणी प्राप्त झालेले नाहीत. हायकोर्टाचे असणारे आदेश हे वेगळे असतात. हे फक्त वकीलांनी  मेलव्दारे पाठविलेले आदेश आहेत. जरी पालिकेचे अधिकारी व विभागीय आयुक्तांचे अधिकारी त्याठिकाणी उपस्थित असतीलतरी सन्मा.महापालिकेला किंबहूना मला लेखी स्वरुपात असे कुठलेही आदेश आलेले नाहीत किंवा महापालिकेला हायकोर्टाचे असे कुठलेही आदेश आलेले नाहीत. महापौर साहेब, मला विनंती करायची आहे की २८ तारखेच्या आतमध्ये आपल्याला महापालिकेमध्ये हे सदस्य स्थायी समितीसाठी निवड करायचे आहेत. जर माझा स्टे असताना आणि पुढील निकाल तसा माझ्या बाजूने लागलातर त्यावेळेस आपण काय निर्णय देणार याची मला माहिती दिली गेली पाहिजे. किंबहूना जर तसं नसेलतर माझी आपल्याला आणि सभागृहाला विनंती आहे की जोपर्यंत हायकोर्टाचा निकाल लागत नाही तोपर्यंत स्थायी समितीचा हा सगळा कारभार प्रशासनाच्या ताब्यात दयावा.  आणि ज्या वेळेस हायकोर्टाचा निकाल लागेल त्यावेळेस स्थायी समिती सदस्यांची निवड करावी ही आपल्याला विनंती आहे. जरुर माझा आक्षेप आपण नोंदवून घ्यावा आणि त्याच्यावर मला प्रतिक्रिया दयावी ही विनंती.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सर्व नगरसेवक, नगरसेविका, पत्रकार मित्र. आमचे सहकारी मित्र कैलास कदम यांनी जो मुद्दा उपस्थित केला, वास्तविक पाहता तो मुद्दा, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे रास्त आहे. कायदासल्लागार यांनी याबाबतचा खुलासा सभागृहाला देणे उचित वाटते. कायदा सल्लागारांनी याबद्दल आपले मत काय आहे हे सांगावे कारण ही न्यायालयीन बाब आहे. न्यायालयीन बाब असताना माझ्या माहितीप्रमाणे आपल्या महापालिकेच्या वतीने आपले लीगल †›व्हायजर, मुंबईला अपॉईंट केलेले †›व्हायजर, आपले अधिकारी, विभागीय आयुक्तांचे अधिकारी असे सर्वजण तेथे उपस्थित होते नेमके काय झालेले आहे याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सतीष पवार (अति.कायदा सल्लागार) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.उच्च न्यायालयात परवाच्या दिवशी दोन रिटपिटीशन दाखल झालेले आहेत. १) मा.सुरेश म्हेत्रे यांनी दाखल केलेले १९८५/२०१५ व २) मा.विनोद नढे यांनी दाखल केलेले १९८६/२०१५  या दोन्ही रिटपिटीशनमध्ये महापालिकेला परवाच्या दिवशी संध्याकाळी सर्व्हिस प्राप्त झाली व त्या अनुषंगाने मी हजर होतो, मे.कोर्टासमोर या याचिका सुनावणीला आल्या असता महापालिकेतर्फे **†›.** दिपक मोरे व विभागीय आयुक्त यांच्यावतीने त्यांचे †›व्होकेट

हजर झाले. त्यानंतर मे. कोर्टाने बाजू ऐकूण मा.विभागीय आयुक्त यांनी दिलेल्या पत्राचे अवलोकन करुन आदेश पारित केलेले आहेत. त्यानुसार रिटपिटीशन नं.१९८५/२०१५ मध्ये मा.विभागीय आयुक्त यांचा दि.२८/१/२०१५ रोजी आदेश प्राप्त केला होता त्याला स्थगीती दिलेली आहे. आणि रिटपिटीशन नं. १९८६/२०१५ मध्ये मा.विनोद नढे यांनी मा.विभागीय आयुक्त यांच्याकडे केलेल्या अर्जावर त्यांनी दि.१८/२/२०१५ रोजी केलेल्या आदेशाला स्थगीती दिलेली आहे. हे दोन्ही आदेश मे.कोर्टाने ओपन कोर्टात डिक्टेड केलेले आहेत. त्या संदर्भात महानगरपालिकेच्या वकीलांकडून प्राप्त झालेली ईमेल तसेच पिटीशनरच्या वकीलांनी दिलेली दोन्ही पत्रे महापालिकेला प्राप्त झालेली आहेत आणि ती मा.नगरसचिव यांच्याकडे दिलेली आहेत. कोर्टाची ऑर्डर अदयाप वेबसाईटवर आलेली नाही. वकीलांनी दिलेली पत्र आहेत.

**मा.कैलास कदम -** मा.महापौर साहेब, आपण निर्णय तसाच घ्यावा कारण की ही न्यायालयीन बाब आहे, न्यायालयीन बाब असल्यामुळे आताच याच्यावर निर्णय घेवू नये ज्यावेळेस न्यायालयाचा निकाल होईल त्यावेळेस आपण यावर निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, वास्तविक पाहता आपली ही जी सर्व निवडणूक आहे ही सर्व निवडणूक विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली आपण पार पाडत असतो आणि त्यांच्याकडून सविस्तर आपल्याला पत्र येतात. की कोणत्या गटाचे किती सदस्य आहेत त्यांची नोंद कधी झालेली आहे आणि त्या पध्दतीने त्यांचे पत्र प्राप्त झाल्यानंतरच आपण निवडणूकीची प्रक्रिया सुरु करतो. मा.आयुक्त साहेब, याठिकाणी प्रशासनाच्या वतीने निवडणूक प्रक्रिया ही सुरु झालेली आहे आणि निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्यानंतर कैलास कदम यांचे म्हणणे आहे हायकोर्टाने जे आदेश पारीत केलेले आहेत ते स्पष्ट नसतील किंवा त्याचा अंतर्बोध आपल्याला करता येत नसेल तरी निवडणूक प्रक्रिया सुरु करण्यापुर्वी आपण ही काळजी घेणे गरजेचे होते आणि कायदयान्वये बरोबर होतं. परंतु निवडणूक प्रक्रिया आता सुरु केलेली आहे. एका बाजूला मे.कोर्टाने असे कसे म्हणले आणि हे दोन ठराव विखंडीत केलेले आहेत मग कोणत्या आधारे निवडणूक घ्यायची असा कदम यांचा प्रश्न आहे आणि विभागीय आयुक्तांचे काय निर्देश आहेत हा एक प्रश्न आहे. आता सुरु झालेली निवडणूक प्रक्रिया ती थांबविता येते का हे नगरसचिवांनी सांगावे.

**मा.नगरसचिव -** मा.महापौर मॅडम, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की दि.२५/२/२०१५ रोजी मे.उच्च न्यायालयामध्ये याबाबतीत केस दाखल करण्यात आल्यानंतर मा.कायदा सल्लागार आणि मी दोघेही त्याठिकाणी उपस्थित होतो. मे.न्यायालयाने त्याठिकाणी निकाल दिल्यानंतर पक्षकाराच्या वतीने उदया महापालिका सभेमध्ये सदस्यांची नेमणूक असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यावेळी मे.न्यायालयाने अशा सूचना दिलेल्या आहेत की, मा.विभागीय आयुक्त कार्यालयाचे आणि संबंधीत विभागाचे अधिकारी याठिकाणी उपस्थित आहेत त्यांनी याची नोंद घ्यावी आणि त्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी अन्यथा मे. न्यायालयाचा अवमान झाल्याचे समजण्यात येईल. आज ही निवडणूक प्रक्रिया आता सुरु झालेली असल्यामुळे ती आपल्याला

पुर्ण करावी लागणार आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) नुसार मार्च महिन्याच्या पहिल्या दिवशी म्हणजे १ मार्चला आठ मा.स्थायी समिती सदस्य निवृत्त होत असल्यामुळे त्याच्या अगोदरच्या महिन्यामध्ये कायदयानुसार आपल्याला आठ सदस्यांच्या नेमणुका करणे बंधनकारक आहे. त्यामुळे मा.महापालिका सभेला याच्यावर आजच निर्णय घ्यावा लागेल. तरी मी मा.महापौर मॅडम यांच्या आदेशानुसार या निवडणुकीचे पुढील कामकाज सुरु करत आहे.

**मा.कैलास कदम -** मा.महापौर साहेब, न्यायालयाचा निकाल माझ्या बाजूने लागलातर काय करणार?

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.न्यायालयाचा निर्णय तुम्हाला कधीही मान्य करावा लागेल ते तुम्हांला सांगायला काय हरकत आहे. कायदा सल्लागार यांनी खुलासा करावा.

**मा.सतीष पवार (अति.कायदा सल्लागार) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मे.कोर्टाने दोन आदेश पारीत केलेले आहेत ते आपल्यावर बंधनकारक आहेत, क्रमप्राप्त आहेत व मा.कदम साहेब म्हणतात त्याप्रमाणे त्यांनी भविष्यात काही मॅटर केले आणि त्याच्यामध्ये काही ऑर्डर झालीतर निश्चित हया बाबी विचारात घेवून ज्या ऑर्डर होतील त्या ऑर्डरही महापालिकेवर बंधनकारक राहतील.

**मा.नगरसचिव** - मा.महापौर मॅडम, सन्मा.आयुक्त साहेब व सन्मा.सभागृह. मा.गटनेत्यांना विनंती करण्यात येते, आज दिनांक २६/२/२०१५ रोजी पूर्वीचे पत्र रद्द करुन नवीन पत्र मा.गटनेत्यांना देण्यात आलेले आहे. माझी सन्मा.गटनेत्यांना विनंती आहे की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या वतीने चार सन्मा.सदस्यांची नांवे, त्याचप्रमाणे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी प्रणीत (अपक्ष) आघाडीच्या वतीने दोन सन्मा. सदस्यांची नांवे आणि शिवसेना व आरपीआय महायुती (आघाडी) च्या वतीने दोन सन्मा.सदस्यांची नांवे याठिकाणी नामनिर्देशित करावित अशी विनंती आहे.

**मा.अनंत को-हाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विभागीय आयुक्त यांचे पत्र आम्हांला दाखवावे. जर संख्याबलाचा विचार केलातर आम्हांला सुध्दा संधी मिळते.

(मा.नगरसचिव यांनी मा.विभागीय आयुक्तांकडून आलेल्या पक्षीय बलाबलानुसारचे पत्राचे तसेच मुळ पत्रांचे व दि.२३/२/२०१५ रोजी प्राप्त झालेल्या पत्राचे वाचन केले.)

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, मा.सभागृह. आम्हांला उल्हास जगताप नगरसचिव यांनी आठ दिवसापुर्वी पत्र देवून कळवल होतं की आम्ही अनोंदीत तीन्ही सदस्य आहोत. मी- सिमा सावळे, शारदा बाबर आणि आशाताई शेंडगे. एकतर अधिकार नसताना आम्हांला तुम्ही अनोंदीत ठरवलेले आहे. आम्ही अनोंदीत आहोत, तुमच अज्ञान तुमच्यापाशी.

आमच स्टेटस काय आहे ते कळवायला आम्ही विभागीय आयुक्तांकडे धाव घेतली. यांनी कायदा सल्लागारांचे मत घ्यायला पाहिजे होते. आता का सांगत नाहीत आम्ही तीघीजणी शिवसेनेतच आहोत म्हणून. तुम्ही आम्हांला अनोंदीत ठरवलेले आहे, त्यांना अधिकार आहे का. अनोंदीत म्हणजे काय. विभागीय आयुक्तांनी स्पष्टपणे पत्र दिलेल आहे की २०१२ रोजी निवडून आलेले पहिले गट आहे जे पहिला नोंदवलेला आहे तोच गट ग्राहय धरण्यात येईल असे विभागीय आयुक्तांनी स्पष्टपणे बजावलेले आहे. मग आम्हांला अनोंदीत तुम्ही कसे काय ठरवले आहे.

**मा.नगरसचिव -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,नगरसचिव कार्यालयाकडील दि.४/२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा.विभागीय आयुक्तांना विनंती केलेली होती की मा.स्थायी समितीच्या आठ सन्मा.सदस्यांच्या नियुक्त्या या मा.महापालिका सभेमध्ये करावयाच्या आहेत. तरी नव्याने जे काही बदल झालेले आहेत किंवा जी काही स्थिती आहे त्याबाबतीत या कार्यालयास कळविणेत यावे. त्यानंतर मा.विभागीय आयुक्त साहेबांनी कळवलेल आहे. (मा.विभागीय आयुक्तांकडून प्राप्त झालेल्या पत्राचे वाचन केले.)

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, विभागीय आयुक्तांनी आम्हांला अनोंदीत कळवले होते का? तुम्ही आम्हांला अनोंदीत ठरवले आहे. कायदा माहीती नसेलतर माहिती करुन घ्यावा. कारण नसताना आम्हांला अनोंदीत ठरवलेले आहे. आम्हांला विभागीय आयुक्तांनी शिवसेना गटात सामील केलेले आहे. आम्हांला त्यांनी सांगीतलेल आहे, त्यांच्या पत्राचं नीट वाचन कराव. गटनेता बदलला, गट बदललेला नाही.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,मा.सभागृह,महापालिकेमध्ये कुठलीही निवडणूक प्रक्रिया जेंव्हा चालू होते त्यावेळेस कुठलेही ऑब्जेक्शन आपल्याला येथे अडथळा आणू शकत नाही. विभागीय आयुक्तांनी ज्याप्रकारे पत्रव्यवहार केलेला आहे, ज्याप्रमाणे तुमचा प्रत्येक पक्षाचा रेशो ठरवलेला आहे त्याप्रमाणे माहिती आपल्याला प्राप्त झालेली आहे. दहा मिनीटांपुर्वी तुम्ही निवडणूक प्रक्रिया चालू केल्यानंतर ज्याला कोणाला न्याय मागायचा असेल सन्मा.न्यायालयात ते जाऊ शकतात. आता कुठल्याहीप्रकारे येथे अडथळा करायचा नाही. त्यामुळे ज्याला त्याला ज्या त्या पक्षाचे बलाबल दिलेल आहे त्या बलाबलाप्रमाणे करावे. आणि तुम्हांला कोर्टाचे काही आदेश असतीलतर महापालिकेला आणून दया. त्याप्रमाणे तुमच्या पक्षाप्रमाणे निर्णय घेतला जाईल. आमच्या पक्षाची सत्ता आहे याचा अर्थ तुमची नाव घेणार नाहीत किंवा ती टाळली जातील असं अजीबात होणार नाही. ज्याप्रमाणे आम्हांला कायदेशिररीत्या कळवल त्याप्रमाणे ही प्रक्रिया व्हावी. मा.महापौर साहेब, निवडणुक प्रक्रिया पुर्ण करावी.

त्यानंतर -

मा.महापौर यांनी बंद लखोटे सर्वासमक्ष उघडले आणि त्यामध्ये असणारी नांवे मा.आण्णा बोदडे, प्रशासन अधिकारी, जनसंपर्क विभाग यांनी सभागृहात वाचून दाखविली ती पुढीलप्रमाणे

१) मा.सौ.साळुंके सविता सुरेश - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी

२) मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराव - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ३) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ४) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ५) मा.जालिंदर किसनराव शिंदे-भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रस प्रणित (अपक्ष) आघाडी ६) मा.सौ.विमल रमेश काळे - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रस प्रणित (अपक्ष) आघाडी ७) मा.संपत ज्ञानोबा पवार - शिवसेना व आर.पी.आय.महायुती (आघाडी) ८) मा.धनंजय मुरलीधर आल्हाट- शिवसेना व आर.पी.आय.महायुती (आघाडी)

ठराव क्रमांक - ६३६ विषय क्रमांक - १

दिनांक - २६/२/२०१५ विभाग - नगरसचिव

## स्थायी समिती सदस्य

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देवून नामनिर्देशनाव्दारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळांच्या प्रमाणात १) मा.सौ.साळुंके सविता सुरेश - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी २) मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराव - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ३) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ४) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी ५) मा.जालिंदर किसनराव शिंदे-भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रस प्रणित (अपक्ष) आघाडी ६) मा.सौ.विमल रमेश काळे - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रस प्रणित (अपक्ष) आघाडी ७) मा.संपत ज्ञानोबा पवार - शिवसेना व आर.पी.आय.महायुती (आघाडी) ८) मा.धनंजय मुरलीधर आल्हाट- शिवसेना व आर.पी.आय.महायुती (आघाडी)

या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मास्थायी समितीचे मा.सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहिर करणेत येत आहे.

**महापौर**
**पिंपरी चिंचवड महानगसालिका**

------

(नियुक्त मा.स्थायी समिती सदस्यांचा पुष्पगुच्छ देवून सन्मान करणेत आला)

**मा.नगरसचिव -** प्रश्नोत्तरे- माहे फेब्रूवारी-२०१५ चे मा.महापालिका सभेमध्ये मा.जावेद शेख, मा.विनोंद जयवंत नढे, मा.किरण बाळासाहेब मोटे व मा.अनंत सुभाष को-हाळे यांना विचारावयाचे प्रश्न.

**(मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, हे प्रश्न पुढील महिन्यामध्ये घेणेत यावेत.)

(मा.सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित असताना प्रश्न न विचारल्यामुळे सदर प्रश्न वगळण्यात आले)

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २

दिनांक - २६/२/२०१५ विभाग - आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/६/कावि/२०४४/१५ दि.१२/१/२०१५

२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०४७२ दि. १३/०१/२०१५

शिक्षण मंडळाचे सन २०१४-२०१५ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.१०९,९८,९९,०००/- चे व सन २०१५-२०१६ चे मूळ अंदाजपत्रक र.रु.११०,९६,५०,०००/- मान्यतेकामी सादर केलेले असल्याने त्यास तसेच शिक्षण मंडळासाठी पुढीलप्रमाणे तरतुदीमध्ये वाढ करणेबाबत विनंती आहे.

शिक्षण मंडळाचे सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रक - तरतुदीमध्ये वाढ करावयाचा तपशिल

| अ.क्र. | लेखाशिर्ष | वाढ र.रु. |
|---|---|---|
| १) | विद्यार्थी गणवेश | १.२०,००,००० |
| २) | खेळ शाळा गणवेश | ५०,००,००० |
| ३) | पी.टी.गणवेश | ५०,००,००० |
| ४) | सर्वांगिण शैक्षणिक गुणवत्ता व विकास | ५,००,००० |
| ५) | विजरोधक यंत्रणा | १,००,००,००० |
| ६) | शिष्यवृत्ती | ५,००,००० |
| ७) | शालेय स्वेटर | ५०,००,००० |
| | एकूण वाढ र.रु. | ३,८०,००,००० |

शिक्षण मंडळाचे सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक - तरतुदीमध्ये वाढ करावयाचा तपशिल

| अ.क्र. | लेखाशिर्ष | वाढ र.रु. | कारण |
|---|---|---|---|
| १) | शिक्षक वेतन | ६,००,००,००० | सध्या १०० रिक्त पदे असून जून २०१५ पासून शासनाकडून जादा शिक्षक वर्ग होऊन/नविन नेमणूका होतील, त्यांचे वेतनासाठी व मनपा कर्मचा-यांप्रमाणे शिक्षकांनाही महागाई भत्ता फरक देणेकामी |
| २) | कार्यालय फर्निचर | १,००,००,००० | शिक्षण मंडळ कार्यालयाचे नूतनीकरण करणेकामी |
| ३) | शालेय फर्निचर | १,५०,००,००० | इ.१ली ते ४थी करीता शाळांमध्ये बेंचेस घेणेकामी |
| ४) | शारिरीक शिक्षण व साहित्य | १०,००,००० | उडी मारण्याची दोरी, डंबेल्स, रबरी रिंग इ. घेणेकामी |
| ५) | विद्यार्थी गणवेश | १,००,००,००० | गणवेश खरेदीकामी |
| ६) | पाट्या व दप्तरे | २०,००,००० | पाट्या व दप्तरे खरेदीकामी |
| ७) | विद्यार्थी कला,क्रिडा व नाट्य स्पर्धा | १०,००,००० | दरवर्षीप्रमाणे स्पर्धा भरविणेकामी |
| ८) | पी.टी.गणवेश | २५,००,००० | पी.टी.गणवेश खरेदीकामी |
| ९) | शालेय स्वेटर | ५०,००,००० | स्वेटर खरेदीकामी |
| १०) | ई-लर्निंग | १,००,००,००० | लॅब तयार करणे, संगणक खरेदी ऑनलाईन कामकाज |
| ११) | विज्ञान प्रदर्शन (सायन्स पार्क) भेट | २०,००,००० | विद्यार्थी सायन्स पार्क भेटीचा खर्च मनपास अदा करणेकामी |
| १२) | विजरोधक यंत्रणा | २,००,००,००० | विज अटकाव यंत्रणा शाळा इमारतींवर बसविणेकामी |
| १३) | घरबांधणी कर्ज | ५,००,००,००० | मनपा कर्मचा-यांप्रमाणे प्राथ. शिक्षकांना घरबांधणी कर्ज देणे |
| १४) | वाहन कर्ज | १,००,००,००० | मनपा कर्मचा-यांप्रमाणे प्राथ.शिक्षकांना वाहन कर्ज देणे. |
| | एकूण वाढ र.रु. | १९,८५,००,००० | |

तसेच शिक्षण मंडळातील शिक्षकांना गृहकर्ज देणेसाठी र.रु.१५ कोटी व वाहनकर्ज देणेसाठी र.रु.१ कोटी तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.जितेंद्र ननावरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज याठिकाणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे बजेट आपल्यासमोर सादर झालेले आहे. महापौर साहेब आणि आयुक्त साहेब मला खेद वाटतो की, आपण या शिक्षण मंडळाच्या बजेटमध्ये फक्त बुट, कपडे आणि इतर साहित्य खरेदी करण्यासाठी भरमसाठ तरतूद करण्यात आलेली आहे. इतर बाबीकडे पुर्णपणे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. मी आपणास सांगु इच्छितो की, जे शिक्षक विदयार्थ्यानां घडवतात त्या शिक्षकांसाठी आपण प्रशिक्षण वर्ग व मार्गदर्शन कार्यक्रमासाठी आपण काहीच म्हणजे .१% च्या हिशोबात सुध्दा खर्च करत नाहीत. आपण फक्त २०११ मध्ये ९० हजार, २०१२-१३ ला १५ हजार, २०१३-१४ ला ५१ हजार अशी नॉमीनल तरतूद केली जाते. शिक्षक लोक त्यांचे शिक्षण झाल्यानंतर, शाळेत आल्यानंतर ते विदयार्थ्यासाठी एक विश्व निर्माण करत असतात. मी तुम्हांला सांगू इच्छितो की माती ज्यावेळेस मृदु असते त्यावेळेस ती घडते. जेव्हा घट्ट होते तेव्हा तीला आकार येत नाही तसंच शिक्षकांच आहे. शिक्षकाना हे मुलं घडवत असतात. त्यांच्यासाठी विवीध मार्गदर्शन शिबीरं घेतले पाहिजेत त्यासाठी अजीबात तरतूद केली जात नाही. मला खेद वाटतो की, शिक्षकांच्या कामाचे ठिकाण आणि शिक्षकांच्या नियुक्तीचे ठिकाण यामध्ये बरीच तफावत असते. हे शिक्षक जे विदयार्थी घडवत असतात त्यांना आपल्या नोकरीच्या कामाच्या बाबतीत मानसीक त्रास खुप असतो. माझी अशी विनंती आहे की, शिक्षण मंडळाने त्यांना त्यांच्या घराच्या जवळच्या शाळेत नियुक्त केले पाहिजे. मी त्यांच्या मानसीकते बाबत सांगू इच्छितो की, हे शिक्षक लोक प्रचंड मानसीक दबावाखाली असतात. हे लोक कसेकाय विदयार्थी घडवणार. केवळ मोठे पैसे खरेदीसाठी ठेवले जातात, पण पटसंख्या वाढविण्यासाठी काहीच केले जात नाही. मोठमोठया गोष्टीची घोषणा केली जाते. मी स्वत: महापालिकेच्या शाळेत शिकलेलो आहे. मला सांगावेसे वाटते की ७ वी पर्यंत विदयार्थ्यांना आपल्याला भविष्यात काय करायचे हे सुध्दा शिकवले जात नाही. वास्तविक त्यांच काही स्वप्न असेलतर त्यांना तुम्ही सांगीतले पाहिजे. डॉक्टर, इंजिनीअर होण्यासाठी काय करावे लागेल याबाबतीत प्रशिक्षण दिले जात नाही. आता नवीन कायदा आलेला आहे सरसकट पास करायचे ते चालूच राहत. शिक्षक त्यांच काम करत राहतात आणि विदयार्थी पास होत राहतात. परंतु त्यांना सातवी आठवी नंतर भविष्यात काय करायचे त्याचे मार्गदर्शन नसते. मी तुम्हांला सांगू इच्छितो की श्रावण हार्डीकरांनी नांदेडमध्ये त्यांनी जिल्हाधिकारी असताना विवीध उपक्रम राबविलेले आहेत. आपल्या महापालिकेत तसे उपक्रम अजीबात राबविले जात नाहीत. मला या गोष्टीचा खेद वाटतो की, आपण आरोग्य शिबीरावर लसी देणेबाबतीत काही तरतूद केलेली नाही. खाजगी शाळेमध्ये पालकांच्या महिन्याला बैठका होतात त्या नगरपालिकेच्या शाळेत अजीबात होत नाहीत. मी तर म्हणतो आज आपण बजेट मंजूर करतो काही वर्षानी अशी स्थिती होईल आपल्या शाळेत मुलं सुध्दा येणार नाहीत कारण आरटीईचा कायदा लागू झालेला आहे. झोपडपट्टीतला गरीबातला गरीब मुलगा सुध्दा हायफाय शाळेत जाऊ शकतो. तुम्ही त्या पध्दतीने नगरपालिकेच्या शाळेसाठी चांगले उपक्रम अजीबात राबवले जात नाहीत. मी तुम्हांला विनंती करतो की या बजेटमध्ये याबाबीचा आपण समावेश करावा. क्रिडा विषयक ज्ञान असेल किंवा खेळाच्या बाबतीत माहिती असे वर्ग सुध्दा आपण

ठेवले पाहिजेत एवढी विनंती करतो. मी मांडलेल्या या सूचनांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करावा अशी मी विनंती करतो.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शिक्षणमंडळ चालविले जाते. परंतु शिक्षणमंडळाचे बाबत आमचे सहकारी जितेंद्र ननावरे यांनी काही खेद व्यक्त केलेला आहे. मी सुध्दा प्रथमतः या बजेटचा निषेध करतो. कारण महापालिकेची शाळा त्यामधील शिक्षणाचा दर्जा खालावत चाललेला आहे. मला काही गोष्टीची माहिती हवी आहे की आपल्या शिक्षणमंडळाच्या महापालिकेच्या शाळेमधील विदयार्थ्यांची संख्या घटत चाललेली आहे व बजेट वाढत चाललेले आहे. शिक्षणावर कमी खर्च आहे आणि फक्त उपयोगी वस्तू व खरेदीवर जास्तीत जास्त बजेट केलेले आहे. महापालिकेच्या शाळेत शिकणारे जे विदयार्थी आहेत ते झोपडपट्टीमधील, स्लम भागामधील मुले असतात. त्यांना चांगले शिक्षण मिळाव भविष्यात कॉलेज जीवनात जात असताना डॉक्टर, इंजिनीअर होणे गरजेचे आहे परंतु आज शाळेत जावून पाहिलेतर चौथी, पाचवी पर्यंतच्या विदयार्थ्यांना लिहीता, वाचता येत नाही. आपण शिक्षकांना जो पगार देतो, प्रायव्हेट शाळेमध्ये बघा, इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत त्या शाळेमधील शिक्षकांचे पगार आणि आपल्या शिक्षकांचे पगार बघा. आपल्या शिक्षकांचे पगार जास्त मात्र शिक्षणाचा दर्जा हा कमी आहे. त्यांनी मुलांना शिकवल पाहिजेत, लिहीता वाचता आलं पाहिजे. माझ्या भावाची मुलं इंग्रजी शाळेमध्ये आहेत आणि माझी मुलं महापालिकेच्या शाळेत शिकले. भावाचा मुलगा पहिलीमध्ये आहे तो इंग्रजीमध्ये स्वतःचे नाव लिहीतो आणि महापालिकेच्या शाळेतील पाचवीच्या विदयार्थ्यास विचारलेतर नाव लिहीता येत नाही अशी शोकांतीका आहे. माझ्या प्रभागामध्ये शाळा क्रं.२/१ मुलामुलींची शाळा आहे तेथे दिड हजार विदयार्थी आहेत. शाळा क्रं. २/२ मुलामुलींची शाळा याठिकाणी १५०० विदयार्थी व उर्दू शाळेमध्ये कमीत कमी ५०० ते ७०० मुलं, माध्यमिक शाळेमध्ये ७०० ते ८०० मुल एवढे मुलं माझ्या प्रभागामध्ये शाळा शिकतात. ज्या-ज्या वेळी मी शाळेवर जातो, पाहतोतर मला ज्या काही गोष्टी दिसतात त्या मी हमेशा निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करतो शिक्षक कमी आहेत. ६०-६० मुलांमध्ये एक शिक्षक आहे. ते कसे विदयार्थी शिकवणार. मुलांना बसण्यासाठी बेंचेस नाहीत, मुलं खाली बसतात. सतरंज्या व्यवस्थित नाहीत. या शाळेवर लक्ष दिले पाहिजे. विदयार्थ्यांना शाळेमध्ये येण्याचा लळा लागला पाहिजे. आपण पुस्तक देतो, वहया देतो सगळ देतो. आपण पावसाळयामध्ये स्वेटर, उन्हाळयामध्ये रेनकोट देतो अशी आपली महापालिका. बजेट आल्यानंतरच आपण भेटतो नंतर भेटत नाहीत. माझ्या शाळेवर शिक्षक कमी आहेत. शिक्षण मंडळाला फोन केलातर शिक्षक सुध्दा देत नाहीत. मुलांना शाळेत येण्यासाठी पुस्तक, वहया दिल्या पाहिजेत या मताशी मी सहमत आहे. रेनकोटच्या मी ठाम विरोधात आहे. रेनकोट हा विषय आपल्या बजेटमधुन वगळून टाकावा अशी सूचना करतो. याचे कारण असे आहे की इतक्या वर्षामध्ये गेली पंधरा वर्षे मी नगरसेवक म्हणून काम करतो. माझ्या समोरची शाळा माझ्या नजरेखाली आहे परंतु आजपर्यंत एकाही मुलाला रेनकोट घातलेला पाहिला नाही. आपण त्यासाठी एक ते दिड कोटी रुपये तरतूद करतो परंतु ती तरतूद जाते कुठे हेच समजत नाही. ब-याचशा ठिकाणी रेनकोटचा उपयोग होत नाही. पावसाळी साधन दयायचे असतीलतर छत्री दया. जर छत्रीचं बजेट जास्त

होत असेलतर दोन वर्षात एकच छत्री दया परंतु रेनकोट कॅन्सल करावा. थंडी सुरु होण्याच्या अगोदर स्वेटर मिळाले पाहिजे ते उशिरा मिळते. कापडाचा दर्जा पाहिलातर साधे व हालके कापड आहे ते सुध्दा चांगल्या दर्जाचे मिळाले पाहिजे. आपण पैसे देतो याकडे लक्ष दिले पाहिजे. महापालिकेच्या शाळेतील एखादा विदयार्थी डॉक्टर, इंजिनीअर झाला पाहिजे. जास्तीत जास्त विदयार्थी शाळेत आले पाहिजेत आणि आलेल्या विदयार्थ्यांना चांगले शिक्षण दिले गेले पाहिजे. आपल्या झोपडपट्टी परिसरातील जे मुल सातवी नंतर चुकीच्या मार्गाला लागतात, व्यसनी होतात त्याचे कारण आपल्या शाळेचा दर्जा सुधारला पाहिजे एवढेच सांगतो आणि रेनकोट हे बजेटमधुन वगळावे अशी मी सूचना करतो.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण रेनकोट, स्वेटर, कपडे वाटप करतो ते देण्याबद्दल काही म्हणायचे नाही. परंतु आपल्या शाळेचा दर्जा, क्वॉलीटी ही वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आपली काही शाळा दहावी पर्यंत, काही सातवी पर्यंत आहेत त्या सातवी पर्यंतच्या ज्या शाळा आहेत त्या आपण दहावी पर्यंत का करत नाहीत. पुर्वी डॉ.श्रीकर परदेशी साहेबांना सुध्दा मी हा विषय सांगीतलेला होता. सातवी पर्यंत शिक्षण झाले की मुले शाळा सोडून देतात नंतर कुठल्याही मार्गाला लागू शकतात. या मुलांना दहावी पर्यंत जर तेथे शिक्षण मिळालेतर दहावीला मुलांना समज येते, मीतर म्हणेन की आकरावी, बारावी पर्यंत महापालिकेची शाळा झाली पाहिजे त्यामुळे अभ्यासाची ओढ लागते आणि त्यांना समजते की अभ्यासाला किती महत्व आहे. यादृष्टिने केले पाहिजे. त्याचप्रमाणे शाळां शाळांमध्ये स्पर्धा लावली पाहिजे, किती मुलांना किती वाचता येते, त्यांच्यासाठी इंग्रजी स्पिकींगचे क्लासेस झाले पाहिजेत म्हणजे त्याच्यामुळे शिक्षणाचा दर्जा वाढेल. काही काही शाळेची पटसंख्या कमी व्हायला लागलेली आहे. कारण या मुलांना जाण्यायेण्यासाठी व्यवस्था नसते. शिक्षण मंडळाला पत्र देवून सुध्दा बसची व्यवस्था करण्यात येत नाही. बाकीच्या सर्व शाळांना परवडत. आपल्या शिक्षणमंडळाचे एवढे बजेट असेलतर आपण बसेस का सुरु करत नाहीत. महापालिकेतर्फे या मुलांना जेथे जेथे झोपडपट्टी आहे जेथे जेथे स्लम ऐरीया आहे त्या मुलांना सुध्दा शिकायची इच्छा असते, त्यांच्या आईवडीलांना सुध्दा शाळेत पाठवण्याची इच्छा असते परंतु आई वडील दोघही कामाला जातात. त्यांनाही प्रश्न पडतो शिकण्यासाठी त्यांना आणायचं कसं आणि सोडवायचं कसं, त्यांना अशा ठिकाणाहून येण्याजाण्यासाठी बसची व्यवस्था केली पाहिजे. बाकीच्या शाळेमध्ये पालक फॉर्म घेण्यासाठी रात्रभर उभे राहतात, आपल्याकडे असे काही होत नाही. तसे लोक ऍट्रॅक्ट करण्यासाठी त्याप्रमाणे विचार करा. त्याप्रमाणे आपल्या शाळेच्या सुविधा, पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, धन्यवाद.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सहकारी, अधिकारी, पत्रकार मित्रानो. हा अतीशय महत्वाचा विषय आहे. नेहमी आपल्याकडे बजेट येते, ते मंजूरही होते. अनेक माझ्या सिनीअर सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त करत असताना त्यांना काय वाटल ते त्यांनी सांगीतलं. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारताचे संविधान लिहीत असताना अनेक कलमे त्यात समाविष्ट करण्यात आली त्यामध्ये कलम ४५ अत्यंत महत्वाचे आहे. त्या संविधानकर्त्यांनी एक उदात्त दृष्टिकोन समोर ठेवून भारताच्या ३९५ कलमापैकी ते अतीशय

महत्वाच कलम आहे ते कलम असं सांगत की एज्यूकेशन हे कम्पलसरी आहे. शिक्षण हे सक्तिचे आणि मोफत असाव हा उदात्त दृष्टिकोन भारतीय संविधानामध्ये संविधानकर्त्यांनी समाविष्ट केला. ते उद्दिष्ट सफल होताना दिसतयं का? त्या उद्दिष्टाच्या जवळपास आपण कुठेतरी आहोत का? कोटयावधी रुपये आपण शिक्षणमंडळाच्या बजेटवर खर्च करतो अगदी स्वच्छ पणानं बोलायचे झालेतर कुठेतरी टक्केवारीपासून दुर गेले पाहिजे कुठेतरी या महापालिकेला लागलेला हा शाप आहे. अनेक प्रकरण चवीनं रस्त्यानी लोक चघळतात, आपआपसात लोक चर्चा करतात आपल्या बजेटची, आपल्या बुटाची आणि आपल्या स्वेटरची आणि आपल्या छत्र्यांची हे कुठतरी थांबल पाहिजे हे लाजीरवानं आहे. आज आपण त्यांना पैसे देतो पण मॉनेटरींग करत असताना अनेक प्रायव्हेट स्कुल त्याठिकाणी उभ्या राहतात. हे वाढते शहर आहे, लोकसंख्या वाढते आहे, वाढत्या गरजा आहेत. राहायला हरकत नाही, एज्यूकेशन हब् आहे पण आपल्या शिक्षण मंडळाच्या ज्यूरीडीक्शनमध्ये उभ्या राहत असणा-या ज्या मायनॉरिटी स्कूल आहेत त्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत त्याठिकाणी सर्वसामान्य माणसाना उभे करत नाहीत. राईट टू एज्यूकेशन ॲक्ट आला. ते मॉनेटरींग करत असताना आम्ही काही शिक्षणमंडळातील अधिका-यांना, पदाधिका-यांना सांगायला गेलोतर या सभागृहाचा फारसा तिथं काही उपयोग होत नाही. आपले मॉनेटरींग होत नसेल अनेक कोटयावधी रुपये घेवून प्रायव्हेट स्कूलमध्ये ॲडमीशन दिले जातात. त्याच मॉनेटरींग आपल्या ज्युरिडिक्शनमध्ये असल्यामुळे त्याच मॉनेटरींग होणे आवश्यक आहे, काय करतात आपले शिक्षणाधिकारी, काय करतात तिथले पदाधिकारी. आणि म्हणुन कुठेतरी या इन्क्वॉयरी आपण आपल्या मॉनेटरींगच्या माध्यमातून केल्या गेल्या पाहिजेत. आज काही स्कूल आपण प्रायव्हेट एज्यूकेशनला ताब्यात दिले. काही ग्रूपला शाळा चालवायला दिलेल्या आहेत लिमीटेड कंपनी आहे. त्यांच अब्जावधी रुपयाच फंडीग आहे, मोठी संस्था आहे. खरं म्हणजे दयायला हरकत नाही पण आपल्याच स्कुलमध्ये आपण काही गुणात्मक बदल करु शकतो का ? प्रायव्हेट स्कुलला ॲडमीशन घेताना रात्ररात्र फॉर्म दयायला लागतात, रात्र जागून काढावी लागते असं आताच ताईनी सांगीतल आणि आपली पटसंख्या कमी व्हायला लागलेली आहे. याच कारण काय, आपले शिक्षक शिकवतात कमी आणि राजकारण जास्त करतात. या सगळया गोष्टीकडे प्रशासकीय प्रमुख म्हणून आपण याकडं लक्ष देणे गरजेचे आहे. लहानपणामध्ये झालेले संस्कार काळया दगडावर पडलेली रेघ असते. आज या शहरामध्ये श्रीमंत लोक राहत असलेतरी तीतक्याच मोठया प्रमाणात गरीब सुध्दा लोक राहतात. त्यांना शाळेची फि परवडत नाही. त्यांना ख-या अर्थानं दिवसभर काम करणा-या अशा पाल्यांनाही मोठया शाळेमध्ये घालनं परवडत नाही. म्हणून महानगरपालिकेनं शिक्षण मोफत, जवळपास गोरगरीब आणि सर्वसामान्य माणसाना आपण देतो आहोत त्याची गुणवत्ता वाढली पाहिजे. जास्तीत जास्त विदयार्थी आपल्या स्कुल बोर्डाकडे आला पाहिजे त्यातून चांगले संस्कार घडले पाहिजेत आणि त्यातूनच उदयाच्या उन्नतीचा विचार आणि संविधानामध्ये संविधान केलेले ४५ वे कलम हे ख-या अर्थान सक्सेस होईल यात काही वाद नाही. याचा आपण प्रशासकीय प्रमुख म्हणुन नक्कीच विचार करावा, धन्यवाद.

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. हा विषय मला वाटते, महापालिका आयुक्तांचे पत्रान्वये मांडलेला आहे. मी आयुक्तांना सांगू इच्छितो की, आपल्याला एक वर्ष झाले आहे एक वर्षा पासून मी आपल्याला या विषयाबद्दल बोलतो. आपल्याला शिक्षणमंडळाच्या कारभाराबद्दल अनेक पत्रे लिहीलेले आहेत त्याबद्दल आपण अनेक उत्तर दिले आहेत, वेतन रिपोर्ट सुध्दा घेतलेला आहे त्या वेतन रिपोर्ट मध्ये आपण जे काही मार्कींग केले त्या आधारावर एक हायकोर्टामध्ये केस केलेली आहे. मा.आयुक्त साहेब, हायकोर्टाने आपल्याला विचारणा केलेली आहे. आपल्याला या संदर्भात उत्तर मागीतले आहे पण अजून आपण त्याच उत्तर का देवू शकला नाहीत. आयुक्त साहेब उत्तर का देवू शकला नाहीत काय गौडबंगाल आहे. असे असताना सुध्दा तुम्ही २०१३-१४, २०१५-२०१७ चे सुध्दा विषय घ्या. मा.आयुक्त साहेब मी तुमच्या निदर्शनास आणून दिलेल आहे गेली दहा वर्षे एकाच कंपनीचे तीन नात्याची मंडळी मुलगा असु दया, मुलगी असु दया, वडील असू दया तिघांनी याठिकाणी शिक्षणमंडळाला लुटलेल आहे. कुठही गटाची स्थापना झालेली नाही असं असताना सुध्दा प्रत्येकवेळा टेंडर मध्ये रेमण्ड (तिरुपती टेक्सटाईल), बॉम्बे डाईंग (तिरुपती टेक्सटाईल), तिरुपती आहे तरी कोण ? तुम्ही टेंडर काढता बॉम्बे डाईंगचे, बॉम्बे डाईंगच शर्ट, रेमण्डची पॅण्ट. कुठल्याही शाळेतील शिक्षकांना, मुलांना, पालकाना विचारा. फक्त शाळेच्या ड्रेसवर मुल पाठवत नाहीत. स्वत:ची कपडे खरेदी करतात, स्वत: मुलांबाळाना कपडे खरेदी करतात त्यांना बॉम्बे डाईंगचा कपडा माहित आहे, रेमण्डचा कपडा माहित असताना सुध्दा हा फक्त रेमण्डचा रे, बॉम्बे डाईंगचा रे आणि झिरो प्रतीचा कपडा इतक्या खालच्या प्रतीचा कापड वापरतो याबद्दल हायकोर्टात केस दाखल केलेली असताना सुध्दा आपण त्याचे रिपोर्टींग अजून दिलेलं नाही. असं असताना सुध्दा मी असे विचारु इच्छितो की फेब्रूवारी महिना आला आहे तुम्ही गेल्या वर्षाच बजेट येथे नोंदवलेल आहे आणि आता फेब्रूवारीमध्ये माध्यमिकच्या मुलांना नऊ हजार ड्रेस पुरवलेत. मुलं वर्षभर बिगर ड्रेसचे फिरले तुम्ही त्यांना टेंडर दिले आणि आता ड्रेस फेब्रूवारीत देतोयं. आता बुट सुध्दा दिलेले आहेत फेब्रूवारीमध्ये हे सगळ डिटेलमध्ये मी हायकोर्टात दिलेले आहे. मा.आयुक्त साहेब, आपण दिलेल्या रिपोर्ट मध्ये क्लेअरकट लिहीले होते अतिरीक्त आयुक्तांनी याठिकाणी सावळागोंधळ केलेला आहे. का उत्तर देवू शकत नाहीत. नगरपालिकेचा भ्रष्टाचार झालेला आहे शिक्षणाधिकारी यांना याचे उत्तर दयायला सांगा. त्यांना येथे बोलवा. गेल्यावेळेस मी बोललो होतो या मॅडमला परत पाठवा म्हणून. आतापर्यात मॅडमने सगळयाना उलटी उत्तर दिलेले आहेत, चुकीची माहिती दिलेली आहे. असे असताना त्यांना का ठेवले त्यानां परत का पाठवत नाहीत. आयुक्त साहेब, खेळ गणवेश आणि पीटी गणवेश वेगळा आहे. या मुलांच्या पीटी गणवेश, खेळ गणवेश यामधील फरक सांगावा. खेळ गणवेश मध्ये काय आहे आणि पीटी गणवेश मध्ये काय आहे ? आता खाडेंनी सांगीतले आहे मुलगा दुसरीला आणि त्याला रेनकोट चार नंबरचा सहा फुटी दिलेला आहे. त्याचे वडील तो रेनकोट घालतात. साईजप्रमाणे रेनकोट दयायला नको का ? त्याच्या वडीलांला रेनकोट येतो. तो सुध्दा रेनकोट खालच्या प्रतीचा. टेंडरमध्ये आयएसओ रेनकोट दिलेले आहेत आणि प्रत्यक्षात एएसओ रेनकोट दिलेले आहेत टेंडरमध्ये आयएसओ दिलेल आहे आणि पेमेंट आयएसओचे देतो. फेब्रूवारी २०१५ मध्ये नऊ हजार ड्रेस का दिलेले आहेत ते आता कसेकाय दिलेले आहेत त्याचे उत्तर दयावे. आतापर्यंत मॅडम कुठल्या शाळेत गेल्या का, मुलांना ड्रेस किती दिले हे सुध्दा मॅडमला माहिती

नाही. मी आणि आमचे नगरसेवक शाळेमध्ये गेलो व तेथे माहिती घेतली. तेथील हेडमास्तरबाईला दमदाटी करायला तेथे कॉन्ट्रॅक्टरचा मुलगा. तुम्ही लिहून दया म्हणतो माल मिळाला म्हणून. अरे, मालच मिळाला नाहीतर लिहून दयायच काय. त्या मॅडम म्हणाल्या आम्हांला मालच मिळाला नाहीतर खोटं कसं लिहून देवू अशी परिस्थिती चाललेली आहे. आपण याठिकाणी कुठल्या कुठल्या महिन्यात किती किती गणवेश दिले, रेनकोट, दप्तर, कंपास बॉक्स किती दिले याची माहिती दयावी.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. बजेटच्या संदर्भात दरवर्षी चर्चा होते. सर्वांचे लक्ष खरेदीवर असते. जितेंद्र ननावरे, लोखंडे यांनी चांगल्या सूचना दिलेल्या आहेत. आयुक्त साहेब, शिक्षण मंडळाची सर्व जबाबदारी तुमच्याकडे आलेली आहे असे समजले. शिक्षण मंडळ सदस्यांवर नेहमी आरोप-प्रत्यारोप होत असतात. काही माजी सदस्य ज्यांच या शिक्षणमंडळावर मनापासून प्रेम आहे ते लोक भेटत असतात. आम्ही तुमच्या केबीनमध्ये पाहत असतो. ते तुम्हांला म्हणत असतात की मागे चर्चा झाली काय झाल. परंतु ते महाशय तुमच्याकडे येवून कधी बोलत नाहीत की एज्यूकेशन संदर्भात काही चांगले बोलले पाहिजे का. ते महाशय सदस्य तुमच्याकडे येणार खरेदी या पध्दतीने झाली खरेदी त्या पध्दतीने झाली हे म्हणणार. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, गरीब झोपडपट्टीच्या विदयार्थ्यांना एक शर्ट, पॅण्ट, रेनकोटचे महत्व काय आहे हे त्यानांच माहिती आहे. आपण याठिकाणी कितीही बोललतरी गरीबांना या वस्तू मिळत असताना त्यांना त्याचा आनंद होत असतो. याच्यामध्ये भ्रष्टाचार होत असेलतर तो थांबला पाहिजे, खालच्या दर्जाचे रेनकोट मिळणे हे चुकीचे आहे. अतिरीक्त आयुक्तांनी असं केल तसं केल म्हणण्यापेक्षा आपले प्रशासन अधिकारी तेथे आहेत. शिक्षणमंडळ सदस्य आहेत खरेदी करतील, जातील, प्रशासन अधिकारी आहेत किंवा परत जातील. त्याठिकाणी सक्षम अधिकारी पाहिजे. मी कोणावर आरोप करत नाही. आपले सध्याचे शिक्षणाधिकारी आहेत त्यांचा इम्पॅक्ट असेल असे मला वाटत नाही, या शाळेवर या शिक्षकांवर किंवा या स्टाफवर. कारण ते नेहमी प्रेशरमध्ये, घाबरल्यासारखे असतात, त्यांचा पॉझिटीव्ह ॲप्रोच नहीयं. ब-याच लोकांनी सांगीतलेल आहे एज्युकेशन संदर्भात प्रायव्हेट संस्था कशा चालतात आणि आपल्या येथे विदयार्थ्यांची गळती होते ती का होते. आज याठिकाणी प्रायव्हेट शाळेमध्ये लोकांची लाईन लागलेली आहे. महापालिकेत सर्व फुकट मिळत असताना लोक यायला तयार नाहीत. याच कारण काय आहे. त्याठिकाणी कंट्रोल नाही. रविवारी सुध्दा तुम्ही शिक्षकांसाठी ट्रेनिंग घेता कसली ट्रेनिंग घेतात काय माहिती नाही. कशा पध्दतीचे हे ट्रेनिंग देतात, कसे ट्रेनिंग देतात. काहीतरी शासनाला दाखवायचे. पिंपरी चिंचवड महापालिकेला काहीतरी करण्याचा प्रयत्न करतो हे असे करुन होणार का. आपल्याला आपल्या मुलांना घडवायचे, झोपडपट्टी मधील मुलांना तयार करायचे आहे. दहावीमध्ये असलेल्या विदयार्थ्यांनी माझ्या वॉर्डामध्ये सुसायट केले. त्याच्यावर किती प्रेशर आहे. पालकांचे, शिक्षकांचे, समाजाचे असे असताना किती सिरीअस घ्यायला पाहिजे. आयुक्त साहेब, तुमच्याकडे शिक्षणमंडळ आलेले आहे. तुम्ही कोणाचे ऐकू नका. खरेदी करायची असेलतर तुमच्या कंट्रोलमध्ये करा. साडेतीन हजार कोटीचे बजेट करत असताना हे थोडे बजेट आहे, हा फुगा आहे याच्यामध्ये अस्थापना खर्च ५० टक्के आहे बाकी खरेदी आहे. लोकांना माहिती पडले

पाहिजे. याच्यामध्ये प्रत्यक्षात किती खर्च होतो. लोकांना माहिती पडलं पाहिजे रेनकोटला किती खर्च होतो, युनिफॉर्मला किती खर्च होतो ते कोणाला दयायचं, रेमण्ड आहे का, आयएसओ आहे का, एएसओ आहे. गरीबांना शिक्षण देणे आवश्यक आहे. मला आज सकाळी फोन आलेला होता, आपल्या येथील शाळेची पटसंख्या कमी झालेली आहे. पठाणताईच्या ऐरीयातून एक बस आपल्या शाळेसाठी सोडतो बसची सोय आपण करतो. आज शिक्षण मंडळात दोन-दोन संघटना आहेत त्यांचे वाद आहेत. आपल्या येथील सहा.प्रशासन अधिकारी मुंढे म्हणून आहेत त्यांनी शिक्षकांना "चौकात नेऊन बढवलं पाहिजे" असे खालच्या लेव्हलचे अपशब्द वापरले. याबद्दल शिक्षक तुमच्याकडे येवून सांगतील यांना असे बोलण्याचे अधिकार कोणी दिलेले आहेत, किती वाईट परिस्थिती आहे. आयुक्त साहेब तुम्ही हे मुंढेंना विचारावे. ७० ते ७५ मुख्यध्यापकांची मिटींग होती त्या मिटींग मध्ये मुंढे यांनी असे बोलले आहेत. हे योग्य नाही. आरोग्याच्या संदर्भात सांगीतलेल आहे की सहया करायला प्रेशर टाकतात, हे बरोबर आहे. तुम्ही मुख्याध्यापकांवर कारवाई करणार. त्याठिकाणी टेंडर मागवून बाकीच्यांना काम देतात, हे लोक कामच करत नाहीत. त्यांच्यावर आरोग्य विभागाची देखरेख आहे का, आम्हीच फोन करणार, त्यांच काम नाही का. कॉन्ट्रॅक्ट दिलेले एकही माणूस त्याठिकाणी काम करत नाहीत. एवढे गलिच्छ परिस्थितीत त्याठिकाणी टॉयलेट आहेत. शेजारुन गेलेतर वास मारतं. आपणच ही सिस्टीम लावलेली आहे. आरोग्य आणि क्रिडा विभागाची. क्रिडा विभागाचे एवढे मोठे बजेट आहे. शाळेच्या विदयार्थ्यांना फुटबॉल सुध्दा खेळायला मिळत नाही. किती वेळा तक्रार केलेली आहे या मुलांना आमच्याकडे खेळण्यासाठी काही नाही. १८५६ सालची खेळणी बसवलेली आहे ती तशीच आहे याच्यावर कसेकाय कंट्रोल करणार. आपण येणार याठिकाणी बोलणार या गोष्टीला अर्थच नाही. बजेट करायचे आणि आम्ही विसरुन जायचे असे चाललेले आहे. याच्यापुढे काय ? परत विसरणार. शहरात तुम्हांला भरपूर काम आहेत ५० हजार विदयार्थी आहेत १०००-१२०० शिक्षक आहेत. अनेक प्रश्न आहेत. यासाठी प्रशासन अधिकारी सक्षम पाहिजेत. आताच्या प्रशासन अधिका-यांकडून कामच होत नाहीत. महिला शिक्षकांसाठी घरा शेजारी शाळा दयायला पाहिजे हा नियम आहे, तरतूद आहे कातर पावसाळयामध्ये त्यांना प्रॉब्लेम होतो गाडीमधुन जाता येत नाही. ते सुध्दा करत नाहीत मेडीकलमध्येही मदत करत नाहीत. या सर्व गोष्टी करत असताना आपण काय करतो. कॉम्प्युटरच्या शिक्षणाबद्दल काय. कॉम्प्यूटरचे नॉलेज नाही. इंग्रजी मेडीयमचा बट्टयाबोळ झालेला आहे. फक्त खरेदी, खरेदी, खरेदी असे चाललेले आहे. माजी सदस्य जे आहेत त्यांनी काय काय केलेले आहे हे शहराला माहिती आहे. तुम्ही कुठल्याही पत्रकाराला विचारा कुठल्याही सदस्यांना विचारा. माजी सदस्यांना विचारा. त्या कमिटीच्या लोकांना विचारा. त्या माणसाने किती शिक्षणमंडळात गडबड केलेली आहे तुम्ही कशाला त्याला घाबरायच, त्याची चौकशी करा. पांढरेशुभ्र कपडे घालून येतो, दिसायला गोरागोरापाण आहे. झोपडपट्टीच्या विदयार्थ्याचा तुम्हांलाही अशिर्वाद मिळेल. तुम्ही चांगले सक्षम अधिकारी आणावेत. गरीब लोक आहेत त्यांना चांगले केले पाहिजे. आम्ही आमच्या पध्दतीने सुध्दा त्यांना मदत करतो. आम्ही कार्यक्रमासाठी गेलोतर खाऊ वाटप करत असतो. याच्यावर दोन तीन दिवस स्टडी करावा आणि चांगली माणसे ठेवावीत. या खरेदीवर तुमचे कंट्रोल ठेवावे. धुमाळ साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे दोन गणवेश दिलेले आहेत हे बरोबर आहे. तुम्ही बजेट फुगवता, युनिफॉर्म बरोबर आहे, रेनकोट बरोबर आहे. पेटीगणवेश, खेळ

गणवेश  हे बरोबर आहे. वस्तू चांगली मिळाली पाहिजे. वर्षभर ते टिकले पाहिजे हे वेळेवर का देत नाहीत. दरवर्षी तुम्हांला माहिती आहे, दरवर्षाला टेंडर आले नाही, दोन टेंडर आले, रिकॉल करतो. एकदाच कोणाला दयायच ते दया. एकदा तुम्ही ठरवून टाका की आपल्याला मे मध्ये सर्व साहित्य देवून टाकायचं आहे, चांगले दया. पुढच्या मिटींगला हा विषय चर्चेला आला नाही पाहिजे. एवढं बोलून थांबतो.

**मा.शारदा बाबर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पत्रकार आणि अधिकारी. माझ्या प्रभागातील शाळेविषयी जागा दाखवली होती. आता सर्व सदस्यांचे रिपोर्ट, गणवेश या विषयावर बोलणे झाले. ब-याच वेळा आयुक्तांना दाखवले. त्यांनी मान्य केले परंतु आतापर्यंत त्याच्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही. अनधिकृत बांधकाम सुध्दा काढलेले नाही. शाळेच्या जागेवर अनधिकृत बांधकाम आहे त्या जागेवर पहिली ते सातवी पर्यंत शाळा बांधावी. स्लम ऐरीया असल्यामुळे सर्व महिला घरकाम करण्यासाठी जातात. त्यांना मुलांना सोडण्यासाठी रोड क्रॉस करुन जावे लागते. मोहननगरमध्ये पहिली ते सातवी पर्यंत त्याठिकाणी शाळा बांधुन होईल एवढे बजेट दयावे अशी विनंती आहे.

**मा.अनंत को-हाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह.  मागील वर्षी सुध्दा २०१३-१४ चे अंदाजपत्रक सादर झाले होते त्यावेळेस अशाच कळकळीने उल्हास शेट्टी बोलले. एक वर्षात काहीच फरक झालेला नाही. या गोष्टी घडत नसतीलतर बोलायचे कशाला. सर्व सदस्यांनी चांगले बोलले. आपण प्रायव्हेट शाळा आणि महापालिकेच्या शाळेचे कॉम्पीटेशन करावे. आपण खर्च जास्त करतो परंतु विदयार्थी घडत नाहीत. आपल्या शाळेत शिकविणा-या किती शिक्षकांचे मुले महापालिकेच्या शाळेत आहेत किंवा नगरसेवकांचे किती मुले महापालिकेच्या शाळेत आहेत. नाहीत, का नाहीत त्याचा आपण विचार करत नाहीत. शिक्षकांना इलेक्शन डयुटी आहे. मुख्याध्यापक दर आठवडयाला महापालिकेत असतात तीथं कोणीही नसतं. त्यांना वेगळे काम देतो ते थांबले पाहिजे. शिक्षण हा उद्देश ठेवून बघितलेतर आणि तशी यंत्रणा राबवलीतर चांगले शिक्षण मिळणार आहे. परिस्थिती जर सुधारलीतर महापालिकेच्या शाळा आम्ही नागरीकांना सुचवू ही ही शाळा चांगली आहे. माझा बजेटला विरोध नाही परंतु व्यवस्थितपणे त्याचा फायदा झाला पाहिजे आणि विदयार्थी घडले पाहिजेत. मुलं प्रचंड हुशार आहेत. आपल्या शिक्षकांनी जबाबदारीने लक्ष घातलेतर ते घडतील. गणवेश वेळेवर दयावेत त्याचा फायदा होऊ दया एवढीच माझी मागणी आहे.

**मा.आशा शेंडगे -**  मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधु. खरंतर शिक्षणमंडळाचे बजेट आणि कोणी गणवेशावर बोलले नाही खरेदीवर बोलले नाही असे होतच नाही. वर्षानुवर्ष बोलण्याची अशी परंपरा आहे म्हणजे आम्ही बोलायला चुकत नाहीत आणि तुम्ही करायला चुकत नाहीत असं म्हणाव लागेल. आयुक्त कोणीही असो परंतु त्या चुका पुन्हा पुन्हा का घडतात या शहरामध्ये हा खरंतर संशोधनाचा विषय आहे. श्रीकर परदेशी साहेबांनी चांगला पायंडा पाडला होता त्यांनी एकाच वेळेला दोन बाजूचं बजेट सादर केलेले होते. परंतु कायदयाच्या बाबतीत कोणी ॲक्शन घेतली आणि खरेदी उशिरा उशिरा होत गेली त्यामुळे

मुलांना वाटप सुध्दा उशिरा होत गेलं. तुम्ही कोणालाही काम दया, तुम्हांला वाटलतर टेंडरींग करा नाही वाटलतर यालाच काम दयायच तर तसं करा परंतु त्या माणसाला सांगीतल पाहिजे मला असा असा दर्जा पाहिजे, या या प्रकारचे काम पाहिजे, या या प्रकारचे कापड, वस्तू पाहिजे ती क्वॉलीटी आणि टाईमपिरीअड हे फायनल करावे. जसं उन्हाळयात रेनकोट देतो, पावसाळयात स्वेटर देतो, त्यामुळे लेन्दी लेन्दी होत जात. आताच सांगीतल की, पी.टी. गणवेश सारखे कपडे पण आपण जानेवारीमध्ये वाटतो तर कशासाठी आपण कपडे वाटायचे मुलांना. कॉन्ट्रॅक्टरचा दर्जा किंवा रेट कमी नाहीत असे मला वाटत नाही. जो रेट आहे तो देताना सुध्दा त्यांच्याकडून इतक्या फालतू क्वॉलीटीच्या वस्तू का येतात. हे बघीतल पाहिजे, कितीवेळेस त्याच त्या चुका आपण करायच्या. पुन्हा त्याच गोष्टीवर बोलायचे, खरेदीचा दर्जा पुर्णपणे खालावलेला असतो. परंतु शैक्षणिक दर्जा सुध्दा खालावलेला आहे. शिक्षणमंडळ म्हणलं की सगळ एकदम रबीष, खराब झालेले आहे, दर्जात्मक काहीच नाही. आमच्या कासारवाडीत थरमॅक्सची शाळा आहे ती अर्ध्या परीसरामध्ये चालते आणि उरलेल्या अर्ध्या परीसरामध्ये आपली प्राथमीक विभागाची शाळा चालते. तेथील मुल सुध्दा मिडल क्लास आणि झोपडपट्टी मधुन येणारीच मुलं आहेत. त्या मुलाना वळण लागतं मग आमच्या शिक्षकांवर का दबाव नाही, आमच्या शिक्षकांना का त्या पध्दतीने काम करता येत नाही ती माहिती घ्या. ती मुलं इंग्रजी वाचू लागली पण आमचे मुल मराठी सुध्दा वाचू शकत नाहीत म्हणजे आम्ही त्यांच्याकडून करुन घेण्यात कुठेतरी मागे पडतो. आम्ही दर्जाला मागे पडतो, आम्ही त्यांच्याकडून करुन घेण्यात मागे पडतो मग हे कशासाठी करतो, खासगीकरण करुन टाका. त्याठिकाणी इंग्रजी कसं वाचायचं हे पालकांना सुध्दा शिकवले जाते, मुलांशी काही कॉमन वर्ड कसे बोलायचे. त्याच सुध्दा मार्गदर्शन केल जातं. आपल्याकडे पालकसभा घेतली पाहिजे. आपण आपल्या शाळेत फुकट वस्तु देतो तरी गळती का लागलेली आहे याचा शोध घ्यावा व येत्या पुढील शैक्षणिक वर्षामध्ये हे निकाली काढा. तुम्ही कुठल्याही खाजगी शाळेत जा ती स्वच्छ असते आपल्याकडे महापालिकेच्या शाळेत प्रचंड दुर्गंधी, प्रचंड घाणेरडेपणा, अत्यंत खराब फरशा त्याच्या मागचे कारण शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे का ? खाजगी शाळेत मानधनावर अत्यंत कमी पगारात शिक्षक काम करतात. आपल्याकडे चांगले पगार सुविधा असताना आपण आपल्या शाळेची माती करुन घेतो. महापालिकेमध्ये काही स्वच्छता कर्मचारी मानधनावर घेतलेले होते पंधरा वर्षापुर्वी त्यांना तेंव्हा दोन हजार रुपये मानधन होते व आज सुध्दा दोन हजारच मानधन आहे. ते सुध्दा मुख्याध्यापकांच्या अकौंटवर जाते ते काढतील तेव्हा ते त्यांना मिळते. त्यांच्या मानधनात का वाढ करावीशी वाटली नाही, हा विषय कोणी कसा बोलत नाही. शाळेची स्वच्छता महत्वाची आहे. आपल्या शाळेच्या स्वच्छतागृहा विषयी अनेकवेळा अतिरीक्त आयुक्तांनी कारवाई करण्याचा शो केलेला आहे परंतु स्वच्छतागृह कधीही स्वच्छ होऊ शकलेले नाहीत. त्याचे कारण काय तर आपल्या शाळेला गेट असतं गेटवर प्रायव्हेट सिक्यूरीटीवाले आहेत त्याला दोन थोबाडीत दिल्या की तो निघून जातो. तो एकतर ६० वर्षाचा असतो त्याला स्वत:ला पिल्याशिवाय काम होत नाही असा सिक्यूरीटी माणुस जर ठेवलातर तो दुस-यावर काय दबाव निर्माण करु शकणार. शाळा सुटल्यानंतर सुध्दा शाळेच्या गेटमध्ये इतर लोक जातात आणि मग ते आपल्या परीसराची नासधुस करतात. त्याठिकाणी सुध्दा आपण किमान मध्यंतरी सुरक्षारक्षकांची जी भरती केलेली होती त्यातील सुरक्षारक्षक घ्या

बोलावून आणि ते सर्व शाळेवर देवून टाका. किंमान त्याठिकाणी आपला पगारी माणूस असेलतर तोही काळजीने काम करेल. आपल्या शाळेमध्ये बघा व खाजगी शाळेमध्ये बघा तेथे संगणक शिकवतात पहिलीचा मुलगा सुध्दा संगणक पाहतो, वापरतो हॅण्डल करतो. आपल्या शाळेतील मुलांना का जमत नाही. का आपण त्यांना ती सुविधा उपलब्ध करुन देवू शकत नाहीत. आपल्या शाळेमध्ये संगणक सुध्दा असतात परंतु ते कुलूपाच्या आतमध्ये ठेवलेले असतात आणि आम्ही शोकेसमधून सगळया गोष्टी पहायच्या. सर्व शिक्षकांना सांगावे त्यांच्याकडून हे करुन घेणं गरजेच आहे त्यांना मार्गदर्शन करायला सांगावे हे केलेतरच सुधारणा होऊ शकेल. त्यांना इन्सेन्टीव्ह दया, शाबासकी म्हणून प्रमाणपत्र दया. खरंतर सांगताना आनंदही वाटतो आणि खेदही वाटतो तोही लक्षात घ्या की माझ माहेर असेल, सासर असेल खेडेगावचे मुलं जिल्हापरिषद, नगरपालिकेच्या शाळेत शिकतात खेडेगावातील मुलं आयएएस/युपीएस पास होणारे मुलं आहेत, जेवढी शहरातून ही मुलं आयएएस/युपीएस पास होतात तीतक्याच प्रमाणात खेडयातूनही येतात याचे कारण काय आहे. तेथील मुलांना हे जमते आम्हांला का जमत नाही. आमचा दहावीतून बाहेर पडलेला मुलगा ९० ते ९२ टक्के घेवून माध्यमीक मधुन बाहेर पडतो, पण पुढे त्या मुलाच काय होतं हे आपल्या शिक्षकांनाही कळत नाही आणि मुलांनाही कळत नाही. बजेटवर मी अजीबात बोलणार नाही कारण आपले आकडे कसे फुगवले कसे कमी झाले कारण ते सगळे परंपरेनी चालू आहे. यावर्षी सांगावे पुढच्या वर्षाच्या खरेदीमध्ये वेळेमध्ये कोणतेही बदल होणार नाहीत. त्या गोष्टी आपण कशा काटेकोरपणे पाळू हे पाहावे. स्वच्छतेचा दर्जा कसा राखला जाईल हे पाहिले पाहिजे. मागच्या वर्षी बीव्हीजीचे कॉन्ट्रॅक्ट काढले परंतु ज्यांना दिले ते चांगले काम करतात का, नाही, पुन्हा जैसे थी परिस्थिती आहे. ज्यांना हे काम दिले त्यांना सुध्दा सांगीतले पाहिजे की तूझ्याकडून चांगल काम दिसल नाहीतर आम्ही वेगळी ॲक्शन घेवू. स्थायी समितीमध्ये ठराव केलेला होता, जी.बी.ने मान्यता दिलेली आहे दहावी, बारावी मधील विदयार्थ्यांना, खाजगी शाळेतील विदयार्थ्यांना सुध्दा आपण बक्षीस देण्याबद्दल ठराव केलेला होता पुढे काय झाले, अधिका-यांचा निष्काळजीपणा आहे. अधिका-यांनी किती तत्पर असलं पाहिजे. हे पैसे सदस्यांच्या घरी जाणार नव्हते. जी.बी.ने मंजूरी दिलेली होती त्याचा पाठपुरावा सुध्दा आमच्या अधिका-यांना करता आला नाही. काम कोणी करायचे तुम्ही करायचे का मी करायचे म्हणतात. याच्यावर साहेब तुमचा अंकुश नाही हे मी निश्चितपणे खेदाने सांगेल. सुधारीत बजेटमध्ये सुध्दा कोणत्याही अधिका-यांना हा विषय मांडता आला नाही म्हणून बक्षीस देवू शकत नाहीत. निकाल लागल्यानंतर, आमदारांच्या इलेक्शनच्या अगोदर तो विषय स्थायीला मंजूर केला होता. ज्या दिवशी जीबीत विषय आला त्या दिवशी जीबीने सुध्दा मान्यता दिली होती. अधिका-यांच्या मागे लागण्याचे आमचे काम आहे का. आतातरी हा विषय करुन घ्या, मुलांच हित आहे, मुल चांगल्या प्रकारे अभ्यास करतील, शहराचा विकास होईल. ही कुठेतरी गुंडागर्दी थांबली पाहिजे. बक्षीस दिलेतर मुलांना आनंद होईल हा त्या मागचा हेतू आहे. अनेक वर्षाची जी परंपरा आहे त्या परंपरेला तुम्ही छेद दयावा. येणारे २०१६-१७ चे बजेट असेल त्यात या पध्दतीने काम करावेत.

**मा.अरुण बो-हाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तानाजी खाडे, आशा शेंडगे मॅडम या प्रत्येकांनी शिक्षण मंडळा विषयी मते व्यक्त केलेली आहेत. खरोखर शिक्षण हा विषय जेवढा गांभीर्याने घ्यायला पाहिजे तेवढा आपण घेतो का ? बालशिक्षण कायदा सरकार काढतं, उदयाच्या पिढीची गरज जर आपण या वयामध्ये आपण हे करणार आहोत त्या विषयी आपण किती गांभीर्याने घेतो. आपले फक्त फुगलेले आकडे, बजेटवर जेवढे लक्ष देतो तेवढे त्या विदयार्थ्यांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले जात नाही. ज्या संवेदशनशीलतेने या पिढीकडे पाहिले पाहिजे त्या संवेदनशीलतेने पाहिले जात नाही आणि मग शेवटी केलेला खर्च झालेली चर्चा आताच शेडगे मॅडमने सांगीतल की दहावी नंतर आमचे विदयार्थी कुठे असतात हे सापडत नाही म्हणजे शेवटची बेरीज ही शुन्य. असं जर होणार असेलतर हे कुठेतरी चुकतंय आणि चुकणाऱ्या या गोष्टी सुधारल्या पाहिजेत. भारतीय शिक्षणाची परंपरा फार मोठी आहे. केवळ पैशाने शिक्षण होते असे नाही. आपल्याकडे पैसे आहेत म्हणून आपण गणवेश देतो. पीटी गणवेश परत दयायचा त्याला खेळाचा गणवेश म्हणतो खर्च करायचा म्हणल्यास काय आपण आहोतच मंजूर करणारे. परंतु त्याच्यापर्यंत मुरायला पाहिजे त्याच्यापर्यंत झीरपायला पाहिजे ज्या कारणासाठी ते झीरपल पाहिजे ते कारण सक्सेस होत नाही याची खंत आहे, याचं दुःख आहे. शिक्षणमंडळाच बजेट किती याच्यापेक्षा आपण कसं शिक्षण देतोय हे आम्ही पाहिल पाहिजे. पर्यावरणावर तरतूद काही नाही. पर्यावरण शिक्षणाला महत्व नाही, संगीताला महत्व नाही. मुलांना वाचण्याची आवड वाटायला नको का. मराठीमध्ये साहित्य उपलब्ध नाही का ? इंग्रजीमध्ये, बालसाहित्य उपलब्ध नाही का ? याची पाहिजे ती संवेदना आपल्याकडे नाही. पश्चिम बंगालमध्ये सर्व जगात प्रसिध्द असलेल्या शांती निकेतन शाळेला आम्ही भेट दिली. उघडया रानावर ती शाळा रविंद्रनाथ टागोर यांनी सुरु केली मोठया वृक्षाखाली ती शाळा भरते तो शिक्षक त्या मातीवर बसतो ते विदयार्थी त्या मातीवर बसतात. आजूबाजूला एखाद हारणांच टोळक पळत जातं आणि त्यामध्ये एक गुंडाळलेला फलक त्या झाडाला बांधलेला असतो आणि त्याठिकाणी शाळा चालवली जाते. सांगायच तात्पर्य काय आपल्या देशामध्ये रविंद्रनाथ टागोर यांनी सुरु केलेल्या त्या विद्यापिठाचे कुलपती हे देशाचे मा.पंतप्रधान असतात. त्याची आकडेवारी पाहिली, जगाच्या पाठीवरती अनेक नामवंत देशात परदेशामध्ये वेगवेगळया क्षेत्रामध्ये त्याठिकाणाहून गेलेले आहेत. अनेक मोठमोठे सायंन्टीस्ट गेलेले आहेत. याचे कारण असे आहे की त्या ठिकाणच्या विदयार्थ्यांना काय दिले जाते त्याठिकाणी गणवेश किती दिले जातात, रेनकोट किती दिले जातात, छऱ्या किती दिल्या जातात याला महत्व नाहीतर त्यांच्या डोक्यामध्ये काय गेले याला महत्व दिल गेलेल आहे. अनेक खेडयात छोटेछोटे कार्यकर्ते शाळा चालवतात त्यांच्या शाळेतील विदयार्थी पहा. आपल्या चाकणजवळ एक छोटी विदयार्थीनी अनाथ मुलांची शाळा चालवते ती पंचवीस वर्षाचीच छोटी मुलगी आहे. मी उदाहरण याच्यासाठी देतो की आमच्या शिक्षण मंडळान जे कोणी तेथील प्रशासकीय अधिकार असतील, तज्ञ शिक्षक असतील त्यांनी त्या ठिकाणी जाऊन पाहाव. पऱ्याच्या शेडमध्ये ते सव्हीस सत्तावीस मुल वेगवेगळया परीक्षामध्ये नावलौकीक कमवतात व शिष्यवृत्ती मिळवतात. माझ्या महापालिकेचा विदयार्थी याच पध्दतीने घडला पाहिजे, महापालिकेमध्ये आम्ही किती बजेट दिल हे पाहण्यापेक्षा आम्ही त्यांना काय ज्ञान दिलं हे पाहिल गेल पाहिजे. आम्ही त्यांना वेगवेगळी पुस्तक वाचण्याची आवड लावली पाहिजे. ही आवड शिक्षकांनी नाही लावायची तर कोण

लावणार. एका जिल्हयात, कॉलेजमध्ये शिकलेले दहा विदयार्थी दहा शिक्षक म्हणून महापालिकेत येत असतील, दहा शिक्षक जिल्हापरिषदेच्या शाळेमध्ये जात असतील. मला शिक्षकांना दोष दयायचा नाही. ईथे काय झालेलं आहे भौतीक सुखावरती सर्व आधारीत चाललेले आहे त्याच्यासाठी आमच्या प्रशासनाने चांगल्या तज्ञांचे सल्ले घेतले पाहिजेत. याठिकाणी अनेक प्रोजेक्टवर सल्लागार नेमण्याची पध्दत मी पाहतो. करोडो रुपये त्याच्यामध्ये गेलेले असतील मग शिक्षणासारख्या ठिकाणी नेमानां सल्लागार. पुण्यामध्ये सुध्दा काही प्रयोग करणा-या संस्था आहेत, भारतीय शिक्षण संस्था अत्यंत चांगल्या पध्दतीची संस्था आहे ती गेल्या चाळीस पन्नास वर्षापासून त्याठिकाणी काम करते. त्यांचे प्रोजेक्ट नॅशनल लेव्हलला घेतले गेलेले आहेत, युनो मध्ये घेतले गेलेले आहेत. अशा ठिकाणी आपण जावे, अशा ठिकाणची माहिती घ्यावी. अनेक चांगले शिक्षण तज्ञ पुण्यामध्ये बसलेले आहेत, चिपळूणकर, गावडे सारखे शिक्षकतज्ञ होते हे सगळे लोक पुण्यामध्ये घडलेले आहेत त्यांच साहित्य आहे. खरोखरच शिक्षक प्रशिक्षीत होत असेलतर त्या शिक्षकांना या लोकांच्या विचाराच्या ओळखी देखील करुन दिल्या पाहिजेत. माझ्या सारख्या कार्यकर्त्यानी बो-हाडेवाडीच्या शाळेमध्ये, महापालिकेच्या शाळेमध्ये असे काही प्रयोग राबवले होते. दर आठवडयाला एखादा चांगला व्याख्याता घेवून यायचं आणि त्यांनी विदयार्थ्यांना त्यांच्या सोप्या भाषेमध्ये सांगायचं, त्याची सांस्कृतीक जडणघडण कशी होती हे आम्ही पाहत होतो. जुने काही अधिकारी असतील त्यांना ते आठवत असेल, चांगल्या पध्दतीचे वातावरण आम्ही त्याठिकाणी केलेले होते. अलीकडच्या काळात आम्हांला या सभागृहात येवून देखील अशा पध्दतीचे कार्यक्रम घेता येत नाहीत त्याच कारण आम्हांला संबंधीतांकडून पाहिजे तसा रिस्पॉन्स मिळत नाही. आम्ही नुसते म्हणायचे झोपडपट्टीमधील मुल आहेत, गरीब कामगारांचे मुल आहेत ते कसे शिकणार. त्यांचे पालक आलेले आहेत, नाही, ते झोपडपट्टीतील असतील, ते शेतक-यांच्या घरातील असतील, ते अतीशय गरीब कामगारांच्या घरातील असतील. पण महापालिकेच्या शाळेत आल्यानंतर त्यांना घडविण्याचे मीशन आम्ही राबविले पाहिजे. हा विदयार्थी घडला पाहिजे, उदयाचा नागरीक घडला पाहिजे. तानाजी खाडे यांनी सांगीतले मुल व्यसनी होतात मुल अमुक होतात माझ्या माहितीतले शिक्षक स्वत: व्यसनी आहेत शिक्षकांचा अवमान करण्याचा माझा हेतू नाही परंतु ही वस्तुस्थिती नाकारुनही चालणार नाही. महानगरपालिकेमध्ये कदाचित प्रशासनाचा एखादा अधिकारी कमी पडत असेलतर त्याच्या सेवेला दोन चार अधिकारी लोक दयावेत. खरोखर आयुक्त साहेब, जर आपल्याला अधिकार असेलतर आपण शिक्षणमंडळामध्ये अशा पध्दतीचे लोक आणा. एक प्रयोग म्हणून हा प्रयोग तुम्ही राबवा. येथे शिक्षण मंडळ म्हणायचं का बजेट पुढे आल्यानंतर खरेदीचे बजेट म्हणायचे हा प्रश्न पडतो. याच्यामध्ये दिले पाहिजे ते काहीच नाही. रेनकोट, शुज, गणवेशसाठी  भांडण होतील या गोष्टी नक्की दया, करप्शनचा हा पार्ट वेगळा आहे त्याचा तुम्ही जरुर शोध घ्या. परंतु शिक्षण घडवण्यामध्ये आम्ही येथे काम करतोय का हे पाहिले पाहिजे. या सभागृहात जेवढे छायाचित्र लावले आहेतनां त्यातील प्रत्येकजण शिक्षणतज्ञ होता. मग यशवंतराव चव्हाण घ्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकर घ्या, महात्मा ज्योतीबा फुले घ्या, सावित्रीबाई फुले घ्या, महात्मा गांधी घ्या. त्यांचे शिक्षणावरचे विचार काय आहेत हे मुलांपर्यंत जाण्या अगोदर त्या शिक्षकांपर्यंत जाण्याची गरज आहे. सुरवातीला सांगीतलेले आहे आपल्या देशामध्ये शिक्षणाची परंपरा चांगली आहे परंतु पिंपरी

चिंचवड महापालिकेत भौतीक सुखात सगळ आडकलं. त्यामुळे त्यांच्या मेंदुच्या कोषामध्ये कही पडतयं का नाही ही शंका आहे. कधीतरी महानगरपालिच्या शाळेचे विदयार्थी चमकत होते, मला माहिती आहे शांती निकेतन सारखी शाळा आहे त्याठिकाणी महापालिकेच्या चमकणा-या मुलांना नेल पाहिजे. त्याठिकाणी काही बालशिक्षणावर काम करणारे लोक आहेत त्यांच्यापर्यंत आम्हांला पोहचल पाहिजे. त्याच्या पलीकडे जाऊन काही करता येते का ते केल पाहिजे. आणि म्हणून या बाकीच्या आकडेवारीमध्ये प्रत्येकानी याठिकाणी समाचार घेतलेला आहे. सानेगुरुजी सारखे महान शिक्षणतज्ञ आपल्या येथून होवुन गेले, त्यांनी मुलांसाठी इतक साहित्य लिहीलेल आहे, वसंत बापटांनी लिहीलेल आहे. अनेक असे लोक आहेत की त्यांनी बालसाहित्यावर भरपूर लिहीलेल आहे ते मुलांवरती संस्कार झाले पाहिजेत आपल्या वादग्रस्त तरतूदी असतील उदा. मगाशी तानाजीभाऊनी सांगीतलेल आहे आपण खरोखर दरवर्षी रेनकोट देतो का. प्रत्येकानी विचार करा. गरीब असो किंवा श्रीमंत असो आपल्या मुलांना दरवर्षी रेनकोट देतो का ? दरवर्षी आपण देत नसुतर तरतूद का करायची. या पालकांनी त्यांची मुल आपल्या शाळेत आणण्यासाठी, उदया त्या शाळेमध्ये चांगल्या पध्दतीने मुलं घडविण्याच्या दृष्टिने, उदयाची पिढी घडवण्याच्या दृष्टिने विशेष असे आपण आपल्या शाळेत चांगल्या पध्दतीचे उपक्रम राबविलेतर निश्चितपणे याची पटसंख्या वाढणार आहे. जे संबंधीत शिक्षणाधिकारी आहेत त्यांनी खुलासा करावा. गेल्या दहा वर्षात किती पध्दतीने आपल्या येथील पटसंख्या वाढली किंवा घटलेली आहे याचा खुलासा करावा. सर्व नगरसेवक प्रतिनीधीनां माझी विनंती आहे की आपण आपल्या वॉर्डमध्ये याबाबतीतलं काम करण्याची खरंज गरज आहे. हा समाज घडवायचा असेलतर आपल्याला ही मुलं घडवावी लागतील. ही मुल जर घडलीतर या शहराची शान वाढेल. ही मुलजर बिघडलीतर या शहराचं भविष्यामध्ये काय होईल माहित नाही. गरीबी आणि दारिद्रय, गरीबी आणि अज्ञान या दोन्ही गोष्टी समाजाला कोणत्या दिशेला नेऊ शकतात भविष्यामध्ये या न्यायच्या नसतीलतर आपल्याला या गरीबीला ज्ञानाचा प्रकाश दयावा लागेल. इंग्रजी माध्यमाच्या श्रीमंत शाळेत गेले म्हणजे ते मुलं संस्कारीत घडतील असाही माझा दावा नाही पण हे घडवण्याच काम आपल्याला कराव लागेल. पुर्वी जिल्हापरिषदा होत्या त्यावेळेला याला जीवन शिक्षण मंदीर म्हणायचे, जीवन शिक्षण मंदीर म्हणजे जीवनातल शिक्षण देणार मंदीर असे म्हणत. हे मंदीरं आज मंदीर म्हणून राहीलीत का, हे मंदीर घडविण्याचा आपण सर्वजण मिळून प्रयत्न करु यात. शिक्षण मंडळात खरेदी विक्री पेक्षा दर्जेदार आणि संवेदनशील शिक्षण देण्याच्या दृष्टिने आपण काम कराव एवढी अपेक्षा मी याठिकाणी व्यक्त करतो आणि थांबतो.

**मा.राजेंद्र काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ख-या अर्थाने माझ्या सहकार्यानी अत्यंत चांगले मुद्दे मांडलेले आहेत शिक्षणाच्या दृष्टिकोनातून विवीध योजना या शाळेत पाहिजेत. परंतु आयुक्त साहेब आपल्याला सर्वात मोठ आवाहन असं आहे की विदयार्थी शाळेकडे कसे वळतील हे मोठं आवाहन आपल्यापुढं निर्माण झालेल आहे. त्याच कारण पण तसंच आहे आपण जर आपली संस्था पाहिल्यातर निश्चितपणे आपल्याला या संस्था आजारी अवस्थेमध्ये दिसतील. त्याठिकाणी गेलेतर अक्षरशः त्या शिक्षणमंडळात तर उत्साह नसतोच परंतु त्या विदयार्थ्यांचाही त्यांनी त्याच्या जवळ असलेला उत्साह असतो तो सुध्दा कमी

करण्याच काम याठिकाणी झालेल आहे. प्रायव्हेट शाळा आणि महापालिकेच्या शाळा या बघीतल्यातर विसंगती आहे. प्रायव्हेट शाळेमध्ये नर्सरीला एक एक लाख देवून ॲडमीशन कसं मिळेल म्हणून पालकवर्ग धडपडतात. त्यांचे पैसे वर आलेले नाहीत. त्यांनाही असे वाटते की या शाळेत आपला पाल्य गेल्यानंतर एक चांगले दर्जेदार शिक्षण मिळेल आणि मुल या समाजामध्ये ठामपणे उभे राहू शकतील. त्याला फक्त त्याच्या पाल्याचा विचार असतो, त्याचे पैसे वर आले नाहीत. परंतु ती जी शाश्वती आहे ती शाश्वती आपल्या महापालिकेकडून अजीबात मिळत नाही. प्रायव्हेट शाळेमध्ये गेलेतर त्याठिकाणी एलो हाऊस, रेड हाऊस, ब्ल्यू हाऊस असे विवीध प्रकारच्या गणवेशाच्या मुलांचे ग्रूप बनवतात. अशा मुलांमध्ये त्यांच्या त्या हाऊसमध्ये स्पर्धा निर्माण केली जाते. त्यांचा उत्साह वाढावा, त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांच्यात स्पर्धा निर्माण केली जाते. सगळया प्रकारच्या स्पर्धा घेतल्या जातात. आशा आपल्या शाळेमध्ये स्पर्धा निर्माण केल्यातर त्यामुळे मुलामध्ये उत्साह वाढेल. खर्च काही नाही गणवेश आपण त्यांना देतोच परंतु एकाच प्रकारचे गणवेश देण्यापेक्षा चार प्रकारच्या कलरचे गणवेश दिले आणि तशाप्रकारच वातावरण निर्माण केलतर काही हरकत नाही. त्याठिकाणचे शाळेचा रंग वेगवेगळा असेल. प्रॅक्टीकली नॉलेज आवश्यक आहे. त्याठिकाणी जाता येताना त्या लहान मुलांना चित्रामध्ये, त्या भींतीवर बघीतल्यानंतर तो विदयार्थी शिकू शकेल असं आपण कुठल्याही प्रकारचे नियोजन करत नाहीत. आपण सरसकट एकच कलर मारतो. त्या शाळेची चांगल्याप्रकारे रंगरंगोटी केली पाहिजे. स्वच्छतेच्या बाबतीत कोणीही बोललेतर काही फरक पडणार नाही कारण त्याठिकाणी नियंत्रण नाही. झेंडावंदनाच्या दिवशी एक महिला याठिकाणी आली तीने जाळून घेण्याचा प्रयत्न केला होता हे जीवंत उदाहारण आपल्या समोर आहे. महापालिका ही एक लोकोपयोगी संस्था आहे याठिकाणी काम करतो. त्यांना आपण चेकपेमेंट करु शकत नाहीत का. तुम्ही ठेकेदारांना सक्ती करा की तुम्ही त्यांना चेकपेमेंट दया म्हणून किंवा त्यांच्या अकौंटला जाऊ दयावे म्हणून, का जात नाही. त्याठिकाणी अशी परिस्थिती आहे की त्यांना पगार देताना चार रविवारच्या ज्या सुट्टया येतात त्या सुध्दा कट केल्या जातात. त्यात महिण्याला एखादी सुट्टी आलीतर तीही कट केली जाते. महिन्याला दिड ते दोन हजार पगार त्यांच्या हातात येतो. काय त्यात ते संसार करणार. एवढी मोठी शाळा साफ करायची त्यासाठी दोन ते तीन महिला दिल्या जातात. त्यांच्यावर कोणाचतरी नियंत्रण आहे का, कोणाचही नियंत्रण नाही. फुगेवाडीसाठी नवीन शाळा पाडून बांधतो. फुगेवाडीच्या शाळेचे ड्रॉईंग काढून बघा. त्याठिकाणच वातावरण वगैरे किती चांगल पाहिजे ती शाळा पाडुन बांधायची म्हणल्यावर किती चांगल्या प्रकारे व्हायला पाहिजे. कारण एवढा खर्च आपण करतो त्याचा उपयोग काही होणार नाही. शिक्षणमंडळावर बोलले नाही पाहिजे परंतु परिस्थिती तशीच आहे. कुठलाही मुलगा शिक्षणापासून वंचीत राहीला नाही पाहिजे तळापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. फक्त या नियमाच पालन करण्याकरिता आपण या गोष्टी करतो का. या शिक्षकांना आवर्जून त्यांनी बोलावून घेतले का. शिक्षणप्रमुखानी त्याठिकाणी जावुन काही प्रश्न विचारले का ? तीथली परिस्थिती काय आहे हे त्यांना सांगता येत नाही. ब-याचशा ठिकाणी पाहिले खरोखर लाज वाटण्यासारखे प्रकार होतात. एका मुलाला सुध्दा उत्तर देता येत नव्हते मुलाच सोडून दया शिक्षकांना काही प्रश्न विचारले होतेतर त्यांनाही सांगता येत नव्हतं इतकी वाईट परिस्थिती आपल्या महानगरपालिकेच्या शाळेची आहे. या शिक्षकांना चांगल्या *प्रकारचे* प्रशिक्षण

देण्यासाठी पुढाकार घेतलातर, प्रायव्हेट शाळेमध्ये या शिक्षकांस प्रशिक्षक म्हणून पाठवलतर काही हरकत नाही. त्याठिकाणी बघुनतरी याव व त्याप्रमाणे आपल्या शाळेत डेव्हलपमेंट केलेतर बरे होईल. शाळेच रिझर्व्हेशन आपण टाकतो, त्याठिकाणी आहे त्या शाळा आपल्याला बघायला जमत नाहीत मग त्याचा उपयोग काय. आज आपण पाहिलतर देशाचे पंतप्रधान सुध्दा त्यांच्या कार्यकालाचे प्रगतीपुस्तक निघते तसे आपल्या शिक्षणाचे प्रगतीपुस्तक कुठे आहे. वर्षभरात काय डेव्हलपमेंट केली, काय काय मुलांना शिक्षण दिले याच प्रगतीपुस्तक पाहिजे. त्यामुळे शालेय स्पर्धा वाढविता येतील. आपण बजेट पाहिलतर आपण एवढा मोठा खर्च करतो. मी दरवर्षी ऐकतो गणवेश उशिरा मिळतात, असे का होते. काही सहकारी आता म्हणाले काही लोक कोर्टात गेलेले आहेत त्यामुळे ऑर्डर दयायला उशिर झाला हे आता समजलेले आहे. मी विनंती करतो की यापुढच्या तरी सर्व ऑर्डर वेळेवर जाव्यात. सर्व मुलं शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेशावर यावीत. गणवेशच्या बाबतीत ऑर्डर दिल्यातर हा बदल आपल्यामध्ये घडवता आलातर बरं होईल, पैसे तेवढेच जातात. त्या प्रभागात सर्व गोष्टी व्हाव्यात. स्पर्धात्मक त्याठिकाणी व्हावे त्यामुळे शाळेचे वातावरण बदलेल. शाळा तंदुरुस्त करण्याचे काम करावे, धन्यवाद.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शिक्षणमंडळ आणि त्याच्या मागची बजेटची चर्चा. एकुण मगापासून ऐकतो चर्चा तीच गेंडयाच कातड ओढलेली शिक्षणमंडळ विभागातील सर्व अधिकारी, पदाधिकारी त्याच्यामध्ये काही फरक करतात का ? हा महत्वाचा प्रश्न आहे. आयुक्त साहेब तुम्ही सुध्दा फक्त ऐकतात, पण तुमच्याकडून उत्तर अपेक्षीत आहे. सदस्यांनी ज्या तळमळीने भावना मांडल्या, त्यांना काही घरी काम नाही का ? जे आम्ही बोलले, वर्तमानपत्रामध्ये नाव यावे म्हणून सभासद याठिकाणी बोलत नाहीत. यामध्ये शिक्षणमंडळ महापालिकेच्या दुसऱ्या मजल्यावर आहे आणि आपल सभागृह तीसऱ्या मजल्यावर आहे. फक्त एकच दिवस या दुस-या मजल्याचा संबंध या तीस-या मजल्याशी असतो. त्याच्यानंतर हे सदस्य, हे अधिकारी हे कोणीही आपल्या सन्मा.सदस्यांचा सुध्दा याठिकाणी मान ठेवत नाहीत. कुठलेही काम सांगीतलेतर एखादी बदली किंवा काही गरजेची वस्तू सांगीतली ती करा, अशा अडचणी आहेत कि तीकड शाळेची भींत पडलीतरी त्याकडे कोणीही लक्ष देत नाही. श्रीरंग आप्पा बारणे नेहमी म्हणायचे ज्याप्रमाणे त्या गाण्यामध्ये मुन्नी बदनाम होते त्याप्रमाणे महानगरपालिका या शिक्षणमंडळा मुळे बदनाम झालेली आहे. कायम आरोप-प्रत्यारोप याच्या पलीकडे काहीही केलेले नाही. माझ्या दोन सूचना आहेत हे सर्व सभागृह बोलल्यानुसार जर तुम्ही त्यातील १० टक्के जरी घेतल आणि केलतरी पुढच्या वर्षीच्या आमच्या बोलण्यामध्ये काही फरक आपल्याला जाणवेल. ती अशी सूचना आहे की, आपल्याकडे मुलांचा जो क्रिडा विभाग आहे त्याच्यातल्या प्राथमीकला आपण काही गोष्टी वापरतो. आता येथे दिले ते उडी मारण्याची दोरी, डंबेल्स आणि रबरी रींग हे सगळया कालबाहय गोष्टी आहेत, मैदानी खेळ. आपल्याकडे पाचवी ते दहावीसाठी नेहरुनगरमध्ये क्रिडा प्रबोधनी आपण तयार केलेली आहे. त्या क्रिडा प्रबोधनीमध्ये विदयार्थी जात नाहीत. ही सुरु केली तेव्हा त्याची जी परिस्थिती होती आणि आताची परिस्थिती बघा. आपले जे पहिली ते चौथीचे प्राथमीक विभागाचे वर्ग आहेत त्याठिकाणी जर आपण क्रिडा प्रबोधनीचा प्रचार केला, प्रसार केलातर निश्चितपणे आपले काही विदयार्थी हे त्या शाळेमध्ये प्रवेश घेवू शकतात. परंतु पुढची

परिस्थिती अशी आहे त्याची दरवर्षी पटसंख्या कमी होते. त्याठिकाणच्या ग्राऊंडची परिस्थिती बघा खेळताना विदयार्थी पडलातरी जखमी होतो. क्रिडाला ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या गोष्टी तेथे उपलब्ध नाहीत. क्रिडा प्रबोधनी ही शहराची आहे. परंतु शहरामधुन त्याठिकाणी पोहचण्यासाठी कुठलीही वाहतूक व्यवस्था आपल्याकडून होत नाही. जे शिक्षक नेमलेले आहेत ते मानधनावरचे असतात एक- एका वर्गावर शिक्षकही नसतो. मग चालू करण्याची घाई, तो थाट तो खर्च, ते बजेट याकडेच फक्त आपण लक्ष देतोय का ? आपल्याकडे गलेलठ्ठ पगार शिक्षकांना आहेत, आठवडयातून सहा दिवस काम आहे. ३६५ दिवसामधील १५० दिवस सुध्दा पुर्ण वेळ शिक्षकांना काम नसते. परंतु निवडणूकीचे काम, जे काही त्यांना शासनाने दिलेले काम असते ते अधिक असते. त्यामुळे त्याचा परिणाम हा आपल्या सगळया शैक्षणिक विभागावर होतो. आपण विचार केलातर शिक्षकांमध्ये, शाळेमध्ये काही कॉम्पीटिशन ठेवल्या की या शाळेची गुणवत्ता चांगली आलेली आहे, हे विदयार्थी चांगल्या मार्काने पास होतात किंवा त्यांच्याकडे अजून काही एक्स्ट्रा ऍक्सेसरीज आहेत अशा शाळांना तुम्ही आदर्श शाळा म्हणून बक्षीस ठेवावेत. याठिकाणी शांताराम भालेकर यांच्या एक नंबर वॉर्डातील शाळा जी होती त्याठिकाणी सिन्टेल आणि कॅपजेमीनच्या लोकांनी कॉम्प्युटरच प्रशिक्षण त्या मुलांना येवून मोफत दिलेले आहे ती मुल अत्यंत चांगल्या प्रकारे कॉम्प्युटर ऑपरेट करतात. तीथं त्यांनी काही औषधी वनस्पतीचा विभाग केलेला होता. वृक्षारोपण केलेले होतं. खुप मोठया औषधी वनस्पती त्याठिकाणी तयार होतात. हे एक्स्ट्रॉ ऑर्डनरी वर्क आहे. यासाठी त्यांना दुसरा पगार दिला जात नाही. ब-याचशा लोकांनी सांगीतले, चांगल्या सूचना केलेल्या आहेत. पण आशा शाळेमध्ये कॉम्पीटेशन ठेवले. त्याच्या विरुध्द ज्या शाळेमध्ये विदयार्थ्याची पटसंख्या कमी होते त्या शाळेतील जे मुख्याध्यापक असतील, शिक्षक असतील त्यांच्यावर कारवाई व्हावी याला कुठंतरी चाप लागला पाहिजे. काही करा, नका करु काहीही फरक पडत नाही. शिक्षण मंडळाचे सदस्य हे आमचेच असतात ते पदाधिका-यांना सांगतात आमचे बजेट आहे स्टॅण्डींगला आम्ही वाढवून घेतल तरी तुम्ही मंजूर कराव. मुळ बजेट नाही, आम्हांला जास्त पाहिजे. आम्ही त्यांचे सहकारी असल्यामुळे आम्ही त्यांच्या विरुध्द न जाता सांगतो. महापालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या दोन शाळा भोसरी आणि थेरगांवला आहेत. त्या शाळेची परिस्थिती काय आहे हे बघावे. तेथील जे मुख्याध्यापक आहेत त्यांचे कुठल्या प्रकारे प्रमोशन कसे झाले, त्यांचे इंग्रजीचे नॉलेज बघा, त्यांची माहिती बघा काय आहे ती आणि तीकडची ऍडमीशनची प्रोसेस काय आहे. मी म्हणणार नाही, परंतु ८० ते ९० टक्के युपी, बिहार मधुन आलेले त्या सगळयांची मुल त्या शाळेमध्ये जास्त आहेत. आमच्या शहरातील गरीबांचा मुलगा त्या इंग्रजी शाळेत ऍडमीशन घ्यायला जातो त्यावेळेला त्याला तेथे जागा नसते. काहीतरी ठरवा ज्यामुळे दहावीच्या मुलांना परसेन्टेज मिळाल पाहिजे. आपण प्रमोशन कसे करतोय. इंग्रजी माध्यमासाठी बजेट किती वापरतोय. इंग्रजी माध्यमाच्या शाळेची संख्या वाढविता आलीतर खुप चांगल होईल. शाळेसाठी आरक्षण ठेवलेले आहेत त्यासाठी काही संस्थेकडून काही जागेसाठी अर्ज मागविलेले होते. जसं शासनाने काही अनुदानीत शाळांना कम्पलसरी केलेले आहे की २५ टक्के शाळा अदिवासीसाठी ठेवल्या पाहिजे. जर आपल्या काही जागा प्रायव्हेट संस्था डेव्हलप करुन त्याठिकाणी उच्च दर्जाच्या शाळा आणत असतीलतर आपण सुध्दा त्यांना काही अटि घातल्या पाहिजेत. जे झोपडपट्टी मधील मुले आहेत, जे आर्थीकदृष्टया दुर्बल मुले आहेत त्यांना तुम्ही कमीत कमी २०

ते ४० टक्के मोफत ॲडमीशन दयायला पाहिजेत. आपल्याला उदयाचा नागरीक घडवायचा आहे. विदयार्थी घडणं हा जर आपला मुळ हेतू असेलतर या सगळया गोष्टीकडे आपण लक्ष देणे अत्यंत गरजेच आहे. मॅडमला जर कामाच जास्त टेन्शन येत असेल किंवा त्यांच्यावर दबाव येत असेलतर किंवा त्यांच्या कपॅसिटीच्या बाहेर जात असेलतर त्यावरही निर्णय घ्यावा लागेल. कारण पुन्हा पुन्हा या गोष्टी घडतात आणि त्याची जबाबदारी एचओडी म्हणून जातेच आता आयुक्त साहेब तुमच्याकडे हे खाते ट्रान्सफर झाले आहे असे म्हणतात परंतु काही होतंय असं काही दिसत नाही. त्याचाही खुलासा आपण करावा की शिक्षणमंडळ कारभाराची पध्दत काय आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, कोरम नाही, बजेटचा विषय आहे.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दोनदा तहकूब झाली मिटींग कोरमची आवश्यकता नाही. मा.तानाजी खाडे यांनी त्यांचे अनुभवाचे बोल चांगल्याप्रकारे मांडलेले आहेत. त्यानंतर सर्वानीच व उल्हास शेट्टी यांनीही आपले विचार दरवर्षी प्रमाणे उत्तम प्रकारे मांडलेले आहेत. “नेहमीची येतो पावसाळा” तसं “नेहमीची येते शिक्षण मंडळाचं बजेट”. शिक्षणमंडळाचं बजेट कसं पास होईल याच्यावरच शिक्षणमंडळाची नजर असते. कितीही बोलू देत, बजेट कसं पास होतयं यावर त्यांची नजर. ते होणारच आहे, कारण आम्हीच त्यांना निवडून दिलेलं असतं. आपल्याच या बिल्डींगमध्ये शिक्षणमंडळ विभाग आहे त्यामुळे बजेट मंजूर होणार आहे हे त्यांना माहिती आहे आणि प्रशासनाला सुध्दा माहिती आहे. मा.आयुक्त साहेब, मला एकच विनंती करायची आहे की, मागच्या वर्षीचे मिनीटस काढून पाहीलेतर त्यावेळेस सभासद जे बोलले आहे आणि यावर्षी जे बोलले आहेत यात फारसा फरक नाही. याचा अर्थ असा की, आता शिक्षणमंडळामध्ये विदयार्थ्यांच्या परीक्षा घेतल्या जात नाहीत तर फक्त श्रेण्या दिल्या जातात. आपल्या शिक्षणमंडळाला जर तुम्ही श्रेणी दिलीतर किंवा बाहेरुन येऊन कोणी श्रेणी दिलीतर अस्तित्वात नसलेली "ढ" ही श्रेणी आपल्या शिक्षणमंडळाला मिळेल. आणि म्हणून त्या ढ शाळेत त्या ढ शिक्षणमंडळात बरेचसे पालक आपल्या विदयार्थ्यांना घालून आपल्या मुलांच आयुष्य बरबाद करु इच्छित नाहीत. आम्ही नगरपालीकेच्या शाळेतच शिकलेलो आहोत परंतु त्यावेळेस शिक्षणाची जी तडप होती जी आपुलकी होती ती आम्ही आता आपल्या मनपाच्या शाळेत गेल्यानंतर शोधतो. मा.बो-हाडे यांनी आताच सांगीतलं की आपल्या येथे भौतीक सुविधा एवढया दिल्या आहेत व त्याच सुविधा आपण कशा देता येतील हेच आपण पाहतो त्यात ज्ञानाचीही भर पडेल का ? या मुलांना आपण काही भविष्यामध्ये घडवू शकू का ? याच्यातून एक चांगला नागरीक निर्माण होईल का ? याचा विचार करत नाहीत. मला येथे सांगाव वाटत की, आमच्यातूनच काही नेते मंडळी शिक्षणमंडळावर सभासद म्हणून बसलेली आहेत. त्यांनी याचा कधी विचार केला का ? काय केलयं त्यांनी. त्यांचे बरेचसे अधिकार आता कमी झालेले आहेत असं मला वाटतयं. त्यांना बोलून काही फायदा नाहीय, अधिकार आपल्याकडे आलेले आहेत. याचा आपण विचार केला पाहिजे, याकडे थोडे जास्त लक्ष दिले पाहिजे. या शिक्षणमंडळाकडे तुमचं लक्ष नाहीयं. तुम्ही मा.पंतप्रधानांचं "मन की बात" ऐकत असाल. अशी तुमची कधीतरी "मन की बात" त्या विदयार्थ्यांना ऐकवत जा, साहेब.

आपण आयटी हब शहरामध्ये राहतो, या बजेटमध्ये फक्त एक लाख तरतूद केली आहे ही आपल्यासाठी लाजीरवाणी गोष्ट आहे. पालकांनी आपल्या शाळेत विदयार्थी का पाठवावेत. ज्याठिकाणी शैक्षणिक साहित्य नाही, प्रत्येक शाळेत आपण एक संगणक देवू शकत नाहीतर, कोटयावधीच बजेट काय कामाच आहे. तुमच्यापर्यंत बजेट आलंय, तुम्ही पाहिल नाही का. मी मागच्या वर्षी बोललेली आहे त्याच्यावर विचार नाही का झाला. तुम्ही करत नसालतर बोलण्याचा काहीही उपयोग नाही. खरं म्हणजे आपल्या सभासदांनी या योजना राबवायला पाहिजे होत्या. मी त्यांचा निषेध करते की, संगणक शिक्षणाच्या बाबतीत त्यांनी कुठल्याही प्रकारच लक्ष दिलेलं नाही. प्रत्येक शाळेत संगणक पाहिजे त्या मुख्याध्यापकांना काही पत्र टाईप करायचे असतीलतर स्वत:च्या खीशातले पैसे देतात आणि बाहेरुन टाईप करुन आणतात. संगणक, टिव्ही वगैरे दिलेले आहेत ते सगळं बंद आहे काहीही चालू नाहीत आणि ते अडगळीत टाकलेले आहेत. म्हणजे इतकं दुर्लक्ष करनं हे अत्यंत चुकीच आहे. जग कुठं चाललेल आहे, त्यामुळे किती जवळ जग आलेल आहे आणि आपण, हे सगळजर असेलतरच पालक तुमच्याकडे वळतील तरच आपल्या शाळेला आपण शाळा म्हणू शकू. शाळा म्हणजे एक, दोन, तीन, चार, दहा पर्यंत शिकवायचं. मी यांना चालेंज देते सातवीच्या मुलांना वीसपर्यंत पाढे म्हणता येणार नाहीत. आता या शिक्षणापेक्षा लीखानाचंच काम जास्त वाढलेल आहे आपण जर त्यांना संगणक दिलातर आणि त्याठिकाणी एखादा ऑपरेटर दिलातर त्यांची काम कमी होतील. कोरे कागद आणायचे आणि दररोज तक्ते तयार करायचे. सगळया जगात पेपरलेस वर्क चाललेल आहे आणि आपण कुठे आहोत. एखादया ग्रामपंचायतीमध्ये जा तेथे सुध्दा संगणक आहे. तेथेही ग्रामसेवक आहे तो स्वत: शिकलेला आहे, आपल्या येथे किती शिक्षकांना संगणक येतं, किती मुख्याध्यापकांना संगणक येतं. त्यांना प्रशिक्षण दिलयं का ? नाही दिलं, आणि दिलं असेलतर त्यांच्याकडे संगणकच नाही. साहेब, परत एकदा सांगते येथे तरतूद असो किंवा नसो एक महिन्याच्या आत संगणक फक्त शिक्षकांसाठीच नाहीतर मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी एक हॉल आणि त्यामध्ये संगणक ठेवा. इतर विषया बरोबर तुमच्या शाळेच्या टाईमटेबलमध्ये संगणकाचे दोन तास किंवा एक तास त्याच्यासाठी दया. मी याठिकाणी तुम्हांला सूचना दिलेली आहे, मागच्या वर्षी जसं झाल तसंच पुन्हा होणार आहे. आता राहीला शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा विषय. फक्त शासनाकडून आलं की तेवढेच प्रशिक्षणाला शिक्षक पाठवायचे, आपल्याकडून काय होतयं? जोपर्यंत शिक्षकांना तुम्ही अद्यावत असे प्रशिक्षण देत नाहीत तोपर्यंत तेही विदयार्थ्यांना नवनवीन ज्ञान देवू शकणार नाहीत आणि मुलांना ते हवंहवंस वाटणार नाही. तरी त्या प्रशिक्षणांकडे आपण लक्ष दयायचं आहे. बे एके बे चे गेले ते दिवस, खेळा मुळ मुलांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो, त्याबद्दल मी जास्त काही सांगत नाही. आपले क्रिडा शिक्षक कुठं आहेत हे जरा शोधा. मी मागच्या वेळेस सांगीतलेल आहे, तुम्हांला मिनीटस आणून दाखवते, क्रिडा शिक्षकांना स्विमींग टँकवर तिकीट फाडण्यासाठी ठेवलेलं आहे याची कृपया नोंद घ्यावी आणि कृपा करुन त्यांना शाळेमध्ये रुजू होवू दयावं ते आता विसरले असतील पण मुलांचे खेळतरी ते घेतील मुलांना नुसतं खेळायला तरी त्यांनी सोडावं. क्रिडाच्या बाबतीत आपण अदयावत क्रिडा प्रबोधीनी काढली, मीतर सुरवातीला पाहीलं काही काही नगरसेवकांनी आपल्याच मुलांना तेथे घातले होते. "आंधळं नगरी आणि चौपट राजा" तिथं बघतयं कोण, कोणाला शिष्यवृत्ती देतायं त्यापेक्षा गावातले इतर जे लोक क्रिडामध्ये प्राविण्य मिळवतात, जे राज्य

लेव्हलपर्यंत जातात, नॅशनल लेव्हलला जातात अशा मुलांना तुम्ही दत्तक म्हणून घ्या अनेक बॉक्सर आहेत त्यांनी स्टेट लेव्हलला, नॅशनल लेव्हलला अनेक बक्षीस आणलेली आहेत. त्यांना आपण काय देतो. का त्यांनी आपल्या शहराच नांव कराव. महापालिकेच नांव का दयाव त्यांनी. अशा लोकांसाठी तुम्ही काही वेगळ धोरण आखा. त्यांना आपण काही देण्यासारख असेलतर थोडीशी जास्त मदत देवू यात. मग ती कुठल्याही रुपाने दया परंतु अपल्या महापालिकेचं, आपल्या शहराचं नाव कसं होईल यदृष्टिने काम केलं पाहिजे. मी ज्या महापालिकेच्या शाळेत जाते तिथं सांगत असते, सांस्कृतीक कार्यक्रम काय घेता. विदयार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी काही सांस्कृतीक कार्यक्रम घेतले पाहिजेत परंतु आपल्याकडे शुन्य, शुन्य. जयंत्या, पुण्यतिथ्याची मुलांनी तयारी करुन येवू दयातनां प्रायव्हेट शाळेमध्ये हे सगळं बाजूला केलं जात. चार मुलं असू दयात किंवा शंभर मुलं असू दयात त्यांच्यातल्या मुलांना बोलू दयातनां. शाळेमध्ये पहिलीचा मुलगा जर स्पिकरवर बोललातर तो आयुष्यभर लक्षात ठेवतो की मी त्यावेळेस शाळेत भाषण केलं होतं. या मुलांना सांस्कृतीक कार्यक्रमात भाग घेवून त्यांच्या या सुप्त गुणांना वाव दिलातरच ती मुलं पुढे जातील व त्यांच्यामध्ये नेतृत्व गुण निर्माण होईल. मला याठिकाणी सांगायला अभीमान वाटतो, जरी मी नेहमीच विरोधात असलेतरी नगरसेवक भाऊसाहेब हे पाचवी पासून मंत्रीमंडळात काम करत होता नंतर नववीला मी शाळेतला पंतप्रधान केलं. आमच्याकडे एकाच वेळेस दहा-दहा हजार विदयार्थी ध्वजवंदनासाठी असायचे. एक भाऊसाहेब स्टेजवर उभा राहीला की सगळे विदयार्थी शांत राहायचे असं आमच मंत्रीमंडळ काम करत होतं. काहीतरी अशा ॲक्टीव्हीटी सुरु करा की जे मुलांच्या नेतृत्वामध्ये वाढ होईल, मुलांच्या नेतृत्वगुणांना वाव मिळेल त्यात कोणी गायक असतात, कोणी कलाकार असतात त्यांचे गुणं कधी पुढं येणार आहेत. आणि तुम्ही त्या सांस्कृतीक कार्यक्रमाला आवर्जून पालकांना बोलवा. पालकांना आवडेल, ते सगळी तयारी करुन पाठवतात. त्याला फार खर्च येत नाही की बजेटमध्ये तरतूद करावी लागत नाही. ज्यावेळेस आपली मुलगी स्टेजवर नाचते, आपला मुलगा स्टेजवर नाटकात काम करतो त्यावेळेस केवढं हृदय त्या गरीब मातेच, अशिक्षीत, झोपडपट्टीमधील पालकांच भरुन येतंय. यासाठी शिक्षणाधिका-याना मला विनंती करायची आहे की तुम्ही काहीतरी छोटासा कार्यक्रम होवू दयात मुलं नक्की आपल्या शाळेकडे आकर्षीत होतील. मला आणखीन एक सांगायचे आहे की शिक्षक आणि पालकांचा समन्वय वाढवा. जे पालक आपल्या शाळेत आपल्या पल्यासाठी येवू शकत नसतीलतर शिक्षकांनी त्यांच्या घरी जावे. त्या विदयार्थ्याची काय अडचण आहे ती त्या शिक्षकांनी पालकाला विचारायची, असा संवाद पालकांशी साधलातर त्यांना खुप बरं वाटतं. मुलांना शाळेमध्ये काय कमी आहे, कुठल्या विषयात कमी आहे, काय केलं पाहिजे हे सांगण्यासाठी शिक्षकांना घरोघरी जाऊ दयात आणि तेही शाळेच्या वेळे व्यतिरीक्त. जर आपली पटसंख्या कमी झालीतर बाबानों, तुम्हांलाही कमी व्हाव लागेल हे आपण शिक्षणमंडळातील शिक्षकांच्या डोक्यात बिंबवावे. शिक्षणमंडळाची पटसंख्या वाढवायची असेलतर तुम्ही पालकांशी सुसंवाद वाढवा, त्यांच्याशी जवळीक साधा आणि मुलांना कसं येता येईल हे बघा. आणखीन एक महत्वाची माझी विनंती आहे, साहेब तुम्ही शासनाचे प्रतिनीधी आहात, तुमच्या रुपाने शासन आमच्या समोर आहे. आपल्या महापालिका क्षेत्रामध्ये झेडपीने काम करायच काही कारण नाही, महापालिका सक्षम आहे. झेडपीच्या आंगणवाडयासाठी आपल्या झोपडपट्टयातील ज्या आपल्या

जागा आहेत त्या आंगणवाडीचे लोक वापरतात. झोपडपट्टीतील मुलं झोपडपट्टीच्या आंगणवाडीमध्येच जातात आपल्या बालवाडीमध्ये ते कशाला येतील. सकाळी दहाच्या दरम्यान त्या आंगणवाडीच्या मॅडम येतात, खाऊ वाटतात रांगेत मुलं असतात खाऊ घेतात आणि जातात. त्या दिवसाच त्यांच काम संपलं. खरं म्हणजे झोपडपट्टी मध्ये ज्या ज्या ठिकाणी आपल्या जागा आहेत त्या आपल्या ताब्यात आहेत, आपण बांधलेल्या आहेत अशा खोल्यामध्ये आपल्या बालवाडी शिक्षीकेना जाऊ दया. कोणी सांगीतल तुम्हांला दहा हजार आणि वीस हजार पगार दया त्यांना. तीन हजारात सुध्दा आपल्या कॉलेजचे शिक्षक काम करतात, त्यांना वर्षासाठी नेमा. तरी अशा ज्या ज्या ठिकाणी आंगणवाडया आहेत त्याठिकाणी आपल्या बालवाडया सुरु करा म्हणजे आपल्याला पहिलीसाठी विदयार्थी संख्या मिळेल. आपल्या बालवाडया ओस पडलेल्या आहेत आणि त्या शाळेला जोडलेल्या आहेत. एवढी छोटी छोटी मुलं शाळेमध्ये आणण्यापेक्षा घरी त्यांच्या वस्तीमध्ये जा आणि तिथं आपल्या बालवाडया सुरु करा. झोपडपट्टयात चारही ठिकाणी आपल्याकडे जागा आहेत त्या मी तुम्हांला निदर्शनास आणून देते. शहरातील सर्व झोपडपट्टयामध्ये सुरु करा, जे लोक बाहेर राहण्यासाठी गेलेले आहेत ते सुध्दा आपली झोपडी आनंदाने यासाठी देतात. तरी अशा झोपडपट्टीमध्ये बालवाडया सुरु करा. स्वच्छतेच्या बाबतीत सर्वच बोललेले आहेत. कोणालाही नाक दाबुन, रुमाल लावून जावं लागू नये एवढी स्वच्छता आपल्या शाळेमध्ये असावी अशी विनंती करते आणि थांबते.

**मा.संजय काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृह, पत्रकार मित्र. शिक्षण मंडाळाच अंदाजपत्रक याठिकाणी आलेले आहे. याठिकाणी सर्व सन्मा.सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. खुप चांगल्या चांगल्या सूचना याठिकाणी केलेल्या आहेत. मला सांगायचे आहे की हे पैसे आपण देणारच आहोत ज्या कारणासाठी आपण पैसे देतो तो हेतू साध्य होतो का हा खरा प्रश्न आहे. आपण दिलेल्या पैशाचा योग्य वापर झाला पाहिजे आणि त्या त्या कारणासाठी तो पैसा लागला पाहिजे ही जबाबदारी आपली सर्वांचीच आहे. आपण त्या विदयार्थ्यांसाठी पैसे घेतो पण त्यांना सुविधा देतो का त्यांचा छळ करतो असा एक प्रश्न माझ्या समोर पडतो. कारण आता प्रत्येकांनीच सांगीतलेल आहे की, स्वेटर, रेनकोट, बुट कधी मिळतो. एखाद मांजर एखादया उंदराचा जसा छळ करतं त्याला खेळून खेळून मारतं तसे आपले प्रशासन, शिक्षणमंडळ या विदयार्थ्याच्या बाबतीत करते. ते वेळेवर दयायचंच नाही, पावसाळयात रेनकोट दयायचाच नाही, पावसाळयात ती मुलं भीजून भीजून आजारी पडतील पावसाळा संपल्यानंतर त्यांना रेनकोट दयायचा. हिवाळयात सुध्दा ती मुलं थंडीन कुडकुडत शाळेत जातात, आजारी पडतात त्यांच आरोग्य धोक्यात येतं आणि नंतर आपण त्यांना हे देतो. त्यांचा आपण असा छळ का मांडला हा अधिकार तुम्हांला कोणी दिला. माझ एकच सांगण आहे की हे सर्व वेळेत मिळाले पाहिजे आणि सर्व सभासदांनी तेच सांगीतलेल आहे. महापौर साहेब, मी सर्व सभागृहाला विनंती करतो की आपण आज एक ठराव पारीत करुयात की शिक्षण मंडळाने दरवर्षी १ मे या तारखेपर्यंत सर्व रेनकोट, गणवेश, बुट, स्वेटर ही सर्व खरेदी करावी आणि १ मे पर्यंत जर त्यांनी ती खरेदी केली नाहीतर २ मे ला आयुक्तांनी त्यांचे अधिकारात किंवा सभागृहाने त्यांना अधिकार दयावेत २ मे ला आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात पुढील प्रोसिजर चालू करुन ७ जून पर्यंत या सगळया विदयार्थ्यांना सगळया वस्तू मिळतील

याची आपण दक्षता घ्यावी अशाप्रकारची याठिकाणी सूचना मांडतो. माझा प्रभाग दापोडी बोपखेल आहे त्याठिकाणी प्राथमिक शाळा आहे, माध्यमिक शाळा तेथे नाही. आम्ही गेली दोन-तीन वर्ष त्यासाठी पाठपुरावा करतो. परंतु त्याठिकाणी अदयाप संमती मिळालेली नाही. माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी जेवढे वर्ग, संख्या आवश्यक आहे ते तेथे उपलब्ध आहे. त्याठिकाणी प्राथमिक शाळेची इमारत आहे त्या प्राथमिक शाळेच्या इमारतीमध्येच माध्यमिक शाळा सुरु करता येते एवढया मोठया तेथे खोल्या आहेत. त्याठिकाणी माध्यमिक शाळा लवकरात लवकर सुरु करावी अशी मी विनंती करतो त्याचे कारण असं आहे की, त्या गावामध्ये माध्यमिक शाळा नाही दोन-पाच किली मीटर अंतरावरती विदयार्थ्यांना जावं लागतं. तरी या येत्या वर्षापासून माध्यमिक शाळा सुरु होईल अशा पध्दतीचे आपण प्रयत्न करावेत, एवढच याठिकाणी सांगतो.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आत्ताच मा.नाना काटे यांनी शिक्षण मंडळाच्या विषयावर सूचना मांडली आहे, त्याला माझे अनुमोदन आहे. खरेतर महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थी अत्यंत गरीब परिस्थितीतून,वाईट परिस्थितीतून याठिकाणी येतात. आम्ही सुद्धा झोपडपट्टी भागाचे प्रतिनिधित्व करतो. जरी त्यांची आर्थिक परिस्थिती खराब असलीतरी त्यांच्याकडे सुद्धा बुद्धिमत्ता आहे. आपण लक्ष देण्याची गरज आहे. सर्वांगीण विकासाकरीता आपण कोणताही कार्यक्रम राबवित नाही. मी व्हॉटस् अपवर एक मेसेज वाचला होता त्यात लिहिले होते, मेरिटमध्ये आलेला विद्यार्थी आय.ए.एस होतो, त्यानंतर असणारा इंजिनिअर होतो, शाळेत शेवटच्या बाकावर बसतो तो राजकारणी होतो. आम्हीही राजकारणी आहोत. आमचा सर्वांचा विकास झाला आहे. आम्ही सगळ्या प्रकारचा त्रास, सगळ्या प्रकारचा अनुभव घेतलेला आहे. म्हणून खरेतर आमचा विकास झाला आहे. हा विकास होत असताना आमचे शिक्षक आमच्या घरी येत होते. ते आई-वडीलांना सांगायचे तुमचा मुलगा आज शाळेत आला नाही. त्याच्याकडे लक्ष द्या. आपल्या मनपाच्या शाळेच्या बाहेर विद्यार्थी, विद्यार्थीनी असतात. आपले शाळेतले शिक्षक बाहेर यायला घाबरतात ही सत्य परिस्थिती आहे. एकिकडे मुलींवरील अत्याचाराचे प्रमाण वाढत असताना, शासनाने वेगवेगळी पाऊले उचलली असताना, आपण त्यांना सजा घडवायला पाहिजे तर मात्र मुकाभिनय करतो. पोलिस यंत्रणा देशात असताना त्यांचा आपण वापर करत नाही. भितीपोटी मुलींना शाळेत पाठवणे बंद होत चालले आहे. काही काही शाळांमध्ये २२, १२, २० असे १ली ते ५वीला विद्यार्थी आहेत. पुढे त्यांची पटसंख्या काय असणार आहे. मग या अतिरिक्त शिक्षकांना काय काम देणार आहोत. जसा शिक्षणावर भर देतो, पुस्तके दिलीच पाहीजेत, ड्रेस दिलाच पाहीजे, बुट दिलेच पाहीजे. परंतू ते वेळेत द्या. भ्रष्टाचार होतो आहे का किंवा होणार नाही याची खात्री झाली आहे. परंतू त्यांच्यावर कोणतीही कडक कारवाई झालेली नाही. यावर काय करता येईल ते सुद्धा बघा विद्यार्थ्यांना सगळ्या गोष्टी वेळेत पुरवा. त्यांना पुस्तक द्या, विद्यार्थी वर्गात का मागे पडतो. त्या शिक्षकांना सुद्धा घरी पाठवा. क्लासमधील वातावरण कसे आहे. आपण पाहिले तर प्रायव्हेट शाळांच्या आता सगळीकडे जाहिराती लागलेल्या आहेत. त्या जाहीरातीत शाळेची सुंदर इमारत दाखवतात, ते विद्यार्थी/विद्यार्थीनी छान ड्रेसमध्ये दाखवतात. मग मुलांना वाटते, मला त्या शाळेत जायचे आहे. मला त्या शाळेत जायचे आहे असे पोस्टर आपली एकही शाळा लावू शकत

नाही का? एक आदर्श शिक्षक विद्यार्थी घडवायचे काम का करु शकत नाही? १००/१२५ कोटींचे बजेट पास करताना एकही पोस्टर लावू शकत नाही ही आपल्यासाठी शरमेची बाब आहे. का करु शकत नाही? हे करता आले पाहीजे. ही मानसिकता आपल्याकडे नाही. ती निर्माण करायची गरज आहे. कारण पाट्या टाकायचे काम चाललेले असते. मी आलो, विद्यार्थ्यांना काहीतरी शिकवले. दोन लोकांना चांगले काय दोन विद्यार्थ्यांना वाईट बोललो. विषय संपला. शिक्षकांचीसुद्धा क्षमता बांधणी करा. प्रायव्हेट शाळेत गेल्यानंतर पहिला नंबर काय असावा. दुसरा नंबर काय असावा ते बघतात, केस धुतलेली आहेत का ते बघतात, नख कापलेली आहेत का ते बघतात, शूजला लेस बांधली आहे का हे सुद्धा बघतात. आपल्या मनपाच्या शाळांतली गरीबांची मुले आपण सगळ्या दिलेल्या वस्तु, त्यांचा तो ढगळा ड्रेस, पायाखाली चाललेले बुट,गुडघ्याच्या वर आलेले सॉक्स अशा गबाळ्या अवतारांत ते शाळेत जातात. जेव्हा तुमचा स्वतःचा कॉन्फिडन्स लूज असतो, ती तर लहान मुले आहेत. त्यांना चांगले, स्वच्छ नीटनेटके कपडे दिलेतर त्यांचा शिकण्याचा उत्साह वाढेल. शाळेच्या बाहेर मुतारीचा वास. डबा खायला बसलो तरी तो वास जात नाही. आपल्या महापालिकेच्या फर्स्ट, सेकण्ड व ग्राऊंड फ्लोअरवरील महिला स्वच्छतागृहांची अवस्था काय आहे ते एकदा बघा. हिच अवस्था मनपाच्या शाळांतील विद्यार्थ्यांची आहे. तेच प्रायव्हेट शाळांतली स्वच्छतागृहे बघा. तिथे जायला सुद्धा उत्साह वाटतो. आमच्याकडे जायची इच्छा होत नाही. आपण बघू शकता. जशी शाळेतील स्वच्छतागृहे सुद्धा बघितली पाहीजेत. वयात आलेल्या मुलींना शारिरीक स्वच्छतेबाबतीत व्याख्यान देतात. मुलांना मुलींना प्रशिक्षण देतात तसे आपण देत नाही. त्यांच्या मनातली भिती घालवून शिक्षणाबद्दलची ओढ वाढवली पाहीजे. भिती कमी करुन ओढ वाढवायचे काम शिक्षकांचे आहे. आपण म्हणतो, शिक्षक उद्याचा भारत घडवतात. आपल्याकडे सगळ्या सुविधा देऊन सुद्धा विद्यार्थी घडत नाहीत. सिंगींग कॉम्पेटिशनमध्ये कोण फस्ट आले तर कोणत्यातरी चिंचवडच्या शाळेतील मुलाचे नाव असते. योगासनामध्ये कोण फस्ट आले तर कोणत्यातरी प्रायव्हेट शाळेतील मुलाचे नाव असते. कारण तिथल्या शिक्षकांचा शिकवण्याचा दर्जा आहे. आपल्याकडे काय केले, काय केले नाहीतरी पगार तरी मिळणार आहे. ज्ञानप्रबोधिनीतील काही विद्यार्थी माझ्या वॉर्डातले स्टेट लेवलवर कबड्डी खेळायला जात होते. पुढे जसे वय वाढतेय तशी त्यांची सुविधा नंतर बंद होते आहे. त्यांच्याकडे लक्ष का दिले नाही. खेळाडू जपले पाहीजेत. ते शहराच्या सौंदर्यात भर घालतात, शहराचे नाव उंचावतात. त्यामुळे त्यांच्याकडे लक्ष द्या. बरेचवेळा प्रश्न पडतो, कोणताही कार्यक्रम घ्या प्रा.रामकृष्ण मोरे सभागृह महिन्याचे ३० दिवस बुक असते. कै.अंकुशराव लांडगे सभागृह बुक असते, आचार्य अत्रे सभागृह बुक असते. सगळ्या प्रायव्हेट शाळांचे स्नेहसंमेलन. आपल्या शाळांमध्ये विद्यार्थी नाहीत का, त्यांची इच्छा नाही का. त्यांच्यात कलागुण नाहीत का. प्रायव्हेट शाळेत शिक्षकांना सगळ्यांना टार्गेट आहे. कोणी नाच करायचे, कोणी नाटक करायचे. आत्ता मा.शमिम पठाणताई बोलल्या, त्यांच्यातील शिक्षक बघितला. त्यांनी खूप सुंदर भाषण केले. २००१ ला आय.एफ.एस. नावाची संस्था आली होती. त्यांचे कॉम्प्यूटर अर्धवट सोडून ते निघून गेले पळून गेले, त्याची परत वाच्यता नाही. कोणी विचारले नाही. प्रशासक म्हणून आपली काय भूमिका आहे? किमान त्या सूचना घेऊन विद्यार्थी संख्या बघून कॉम्प्यूटर्स घ्या. कॉम्प्यूटरसाठी स्पेशल रुम असली पाहीजे. विद्यार्थ्यांना गोडी लागण्यासाठी बालपणापासून योगासने शिकवली जातात. विद्यार्थ्यांसाठी

योगासन वर्ग असले पाहीजेत. मेडीटेशन शिकवा. गरीबाची झालीतरी मुलेच आहेत. त्यांना शिकवायला पाहीजे. मुलांना चांगला मार्ग दाखवायचे वळण लावायचे काम मनपाच्या शाळांतून झाले पाहीजे. आज आपण बघतोय, जे वेगवेगळे गुन्हे घडत आहेत. त्यामध्ये इनव्हॉल्व्ह असणारी वय वर्षे संख्या ही भितीदायक आहे. वय वर्षे १३/१४ अल्पवयीन मुले गुन्हेगारीत अडकत चालली आहेत. अल्पवयीन असल्यामुळे त्यांना कायद्यात शिक्षा नाही. मग एक चांगला नागरीक घडवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. माझी विनंती असेल, आहे त्या बजेटला मंजूरी द्या आणि वेळेत खरेदी करा. ठेकेदाराला एकदा बदला. प्रशासनाने ठरवले तर शंभर टक्के करु शकतो.

**मा.आर.एस.कुमार**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सगळ्या सदस्यांनी चांगल्या सूचना दिल्या आहेत. मनपाच्या शाळांतील तुकड्या कमी होत आहेत. शिक्षण कमी होते आहे. बजेट मात्र वाढत चालले आहे ते कसे काय समजत नाही. प्राधिकरणात ३ शाळेच्या बिल्डींगज् बांधल्या आहेत. एक बिल्डींग बांधली. तिथे मुले मिळाली नाही म्हणून शिक्षण मंडळाला ब्लेम करतो. दुसरी बिल्डींग ५० लाख खर्च करुन मोठी बिल्डींग बांधली. मुले मिळत नाही म्हणून ती ही शाळा बंद केली. मधल्या मजल्यावर हॉस्पिटल चालू आहे. त्यामुळे आजूबाजूच्या लोकांना अडचण होते आहे. तिसरी शाळा निगडी गावठाणातली इमारत आहे. १९८६ मध्ये तिथे १२०० मुले १२०० मुली अशी २४०० मुले शिकत होती. आता दोन्ही इमारतींचे मिळून फक्त १५० मुले मुली ३०० मुले एका इमारतीमध्ये आहेत. झोपडपट्टी आहे तिथे मात्र मुलेमुली आहेत, पण बाकी ठिकाणी मुले मुली कमी होत चालली आहेत. का कमी होत चालली आहेत ते वर्क आऊट करा. इंग्लिश मिडीयम शाळेच्या बजेटसाठी रु.५१ लाख ठेवले आहेत. १० वर्षांपूर्वी मंजूर करायला पाहिजे होते. प्रत्येक वर्षी २/३ शाळा वाढवू म्हणजे १० वर्षांत कमीत कमी २०/२५ इंग्लिश मिडीयम शाळा चालू करायला पाहीजे होत्या. ५१ लाख म्हणजे एक किंवा दोन शाळा चालू होतील. आपण जरी मराठी भाषेचा विकास करायचे म्हटले तरी आपण मुलांना इंग्लिश मिडीयम शाळेत पाठवतो. मोठेमोठे पुढा-यांपासून इंग्लिश मिडीयमच्या शाळांत पाठवतो. आपण इंग्लिश मिडीयमची महापालिकेची शाळा सुरु करत नाही. इंग्लिश मिडीयमची शाळा सुरु का करत नाही याचे उत्तर द्या. बजेटमध्ये जास्त इंग्लिश मिडीयम शाळा सुरु झाल्या पाहीजेत. कारण तसेच डिमाण्ड आहे ते पूर्ण करा अशी विनंती करतो. इतर संस्थांमध्ये मुलांना शिक्षणाबरोबर म्युझिक, डान्स, सिंगिंग स्पोर्टस् क्राफ्ट अशा अनेक गोष्टी शिकवतात. आपल्याकडे म्युझिक,डान्स स्पोर्टस् इतर गोष्टी शिकवण्यासाठी किती शिक्षक आहेत. त्याची प्रोव्हिजन बजेटमध्ये कुठे आहे. तुम्ही शिक्षक देत नाही. इतर ॲक्टीव्हीटीज नाहीत. मग तुमच्याकडे मुले कशी येणार त्यामुळे माझी विनंती आहे, इतर ॲक्टीव्हीटीजसुद्धा शिकवल्या पाहीजेत. म्युझिक, डान्स,स्पोर्टस् घ्या त्यासाठी शिक्षक अपॉईंट करा. गेले ३ वर्षांपूर्वी या सभागृहात आपण मंजूर केले होते. गार्डन विभागासाठी गार्डन स्थापत्य म्हणून एक विभाग आहे. त्याप्रमाणे मनपाच्या इमारतींच्या शाळांच्या इमारतींच्या मेटेनन्ससाठी एक स्थापत्य विभाग सुरु करावा. परंतू अजूनही तो विभाग सुरु झालेला नाही. कारण बाकी इंजिनिअर यांना खूप काम असते. शाळेत पेंटींग करण्यासाठी शाळेची इमारती मेंटेन करण्यासाठी त्यांना वेळ कमी असतो. त्यामुळे बिल्डींगचा मेंटेनन्स बरोबर केला जात नाही. आणि यासाठी मी विनंती

करतो, जसे गार्डनचे स्थापत्य विभाग केला आहे. तसा बिल्डीगसाठी वेगळा स्थापत्य विभाग ठेवा. नाहीतर हे काम होणार असे वाटत नाही. बजेटमध्ये मोरल शिक्षण देण्यासाठी काही प्रोव्हिजन केलेली नाही. इतर प्रायव्हेट शाळेत जाऊन बघा. तिथे प्रोजेक्टर आहे व्हिडिओ क्लिपिंग आहे. व्हिडिओ चित्रिकरणासाठी कॅमेरा आहे. स्क्रिनवर व्हिडिओ दाखवून चांगल्या प्रकारे शिकवतात. ते सुद्धा फॉलो केले नाही ते फॉलो केले पाहीजे. एखादा कॉम्प्यूटर असेलतरी मुलांना नेट ऑपरेट करायला येत नाही, कॉम्प्यूटर ऑपरेट करायला येत नाही. प्रायव्हेट शाळांतील पहिली दुसरीच्या मुलांना नेट ऑपरेट करायला येतो, कॉम्प्यूटर ऑपरेट करायला येतो. तुम्ही शाळांत एक/दोन कॉम्प्यूटर पाठवता. काही ठिकाणी शाळेत व्हिजिट करा. कुठे कुठे कॉम्प्यूटर बंद पडलेले आहेत. ते सुरु करण्यासाठी प्रयत्न करायला पाहीजे. कॉम्प्यूटरमध्ये बदल होत चालला आहे. शिक्षकांना कोचिंग ज्या पद्धतीने दिले पाहीजे ते देत नाही. शिक्षकांना शिकवायचे कसे ते माहित नसेल तर ते मुलांना काय शिकवणार? त्यामुळे शिक्षकांना कोचिंग दयायला ट्रेनिंग वेळोवेळी व्हायला पाहीजे. एका सभासदाने सांगितले ते मी रिपीट करतो. पालकांबरोबर शिक्षकांची मिटींग होतच नाही. शिक्षकांना विचारले तर ते म्हणतात, पालक येत नाहीत. एकाने सोल्युशन दिले, शिक्षक क्लासमध्ये कशी तयारी करतो याची माहिती पालकांना द्या. त्यांना इनव्हॉल्व्ह करुन घ्या. शिक्षकांना शिक्षण देण्यासाठी ठेवले आहे. त्यांना पोलिओ ड्युटी, इलेक्शन ड्युटी देत असाल तर तसे करु नये. प्राधिकरणात राहणा-या शिक्षकाला संत तुकाराम नगरची शाळा दिली जाते. त्यांना ज्या भागातली माहिती आहे त्या भागातली शाळा द्या. शिक्षकांना शिकवण्याचे काम देण्याशिवाय अन्य कोणतेही काम दिले नाही पाहीजे. शिक्षक क्लेरिकल कामसुद्धा करत असतात. प्रत्येक शाळेत एक क्लार्क अपॉईंट करा. हे मी पूर्वीसुद्धा सांगितले होते. त्याचे इम्पलिमेंटेशन आजपर्यंत केलेले नाही. युनिफॉर्म, बूट, सगळे साहित्य या मुलांना शाळा सुरु होते त्याच दिवशी मिळाले पाहीजे पण तसे होत नाही. दरवर्षी मा.महापालिका सभेमध्ये यावर चर्चा होते. मात्र शिक्षण मंडळ हे वेळेवर देत नाही. आमचे अधिकारी लवकर सँक्शन करत नाहीत. We can do it. मॉनिटरींग केले तर हे काम होऊ शकते.

**मा.शांताराम भालेकर**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शाळेच्या बजेटबद्दल बोलायचे म्हटलेतर खरेतर माझी मनपाची शाळा असूनसुद्धा अतिशय आंतरीक तळमळीने बोलत असताना एकदा मंगलाताई म्हणाल्या होत्या काय माझी शाळा म्हणतो. मा.सुलभाताईंनी माझे कौतुक केले. मी त्यांचे अभिनंदन करतो. चांगल्या कामाचे कौतुक केले पाहीजे. शाळेच्या बाबतीत बोलत असताना आयुक्त साहेबांनी माझ्या शाळेला भेट दिली होती. आपण बजेट मंजूर करणारच आहोत. पण ख-या अर्थाने तळवडेची शाळा हा डेमो माझा आहे, याचा आम्हाला अभिमान आहे. प्रत्येक नगरसेवकांनी बोलण्यापेक्षा प्रॅक्टीकलमध्ये काम केलेतर मला कोणाच्याच बाबतीत वाईट बोलायचे नाही. पण वॉर्डात बिल्डर असतात, चांगले लोक असतात. थोडेसे त्यांना प्रेमाने जवळ घ्या. विद्यार्थ्यांसाठी तळमळीने करा. आपली मुले आहेत. माझ्या शाळेत ३४२ मातंग बौद्धांची मुले आहेत. नवोदय योजनेखाली प्रत्येक वर्षी ४ मुले निवडली जातात. मघाशी सावळे ताई म्हणाल्या होत्या, मेरीटशिवाय माणूस पुढे येत नाही. मेरटीमध्ये येण्यासाठी स्पर्धेमध्ये दर्जा लागतो. ही मुले मातंग बौद्ध समाजातली असून सुद्धा माझ्या

वॉर्डात आय.टी. कंपन्या आहेत सिनटेल असेल. त्यांनी या शाळेच्या माध्यमातून वेगवेगळे प्रोजेक्ट राबवले आहेत. माझ्या शाळेत पाऊस मोजायचे पर्जन्यमान मापक आहे. अद्ययावत सायन्स लॅब आहे. मुलांना सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून शिवाजी महाराजांचे पेंटींग करतात, वस्तू बनवतात, गांडूळ खत प्रकल्प आहे. इथे गांडूळांची शेती सुद्धा होते इथे औषधी वनस्पतींची झाडे आहेत. जे चांगले आहे ते सांगू द्या जे प्रॅक्टीकली काम करत नाहीत पण गप्पा मारतात अशांचे तुम्ही ऐकून घेता. माझी विनंती आहे, माझी शाळा म्हणून प्रत्येक नगरसेवकाने त्याच्या वॉर्डातल्या शाळेला जीव लावावा. प्रॅक्टीकली काम करावे. भारत देश घडवायचा असेल तर प्रशासन आणि पदाधिकारी यांनी नीट काम केले तर देश महासत्ता व्हायला वेळ लागणार नाही. भविष्य काळात चांगल्या प्रकारचे टॉयलेट झाले पाहीजेत. माझ्या शाळेतली मुले गार्डनमध्ये जेवायला बसतात. माझ्या वॉर्डात ६ बसस्टॉप बसवायची तयारी करतोय. भविष्यकाळात मोठा आर्च तयार करणार आहे. एकच कंपनी जवळपास दीड करोड खर्च करतेय मदत करतेय. बाकी इतरांनीही याचा आदर्श ठेवावा. आपल्या परिसरातील ज्यांच्याकडे पैसा आहे त्यांचे नाव देऊन काम करायला शहराच्या सौंदर्यात भर पाडायला हरकत नाही. निश्चितपणे चांगली मदत होणार आहे. मला बोलायला संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल आपले मनापासून धन्यवाद. जयहिंद, जयमहाराष्ट्र!

**मा.ऊबाळे (प्र.अधिकारी, शिक्षण मंडळ)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, याठिकाणी सुरुवातीला सन्मा.सदस्यांना मी नम्रतापूर्वक सांगू इच्छिते की, मी शिक्षण अधिकारी होण्यासाठी जी शैक्षणिक पात्रता असते, ती एम.ए.बी.एड. विथ डिस्टिंक्शन ही शैक्षणिक पात्रता माझ्याकडे आहे. पी.टी. गणवेष व खेळ गणवेष याबाबतीत मी स्पष्टिकरण देते की, पी.टी. गणवेष हा तिसरी ते सातवी या इयत्तांना दिला जातो व खेळ गणवेष हा बालवाडी ते दुसरी इयत्ता यांमधील विद्यार्थ्यांना दिला जातो. एकाच विद्यार्थ्याला दोन प्रकारचे गणवेष दिले जात नाहीत. बालवाडी ते दुसरी इयत्तेतील मुलांची शारिरीक क्षमता कमी असल्यामुळे त्यांच्या शरीरावर ताण येऊ नये म्हणून त्यांना पी.टी.मध्ये समाविष्ट केले जात नाही. म्हणून या गणवेषाचे नाव खेळ गणवेष असे ठेवलेले आहे. सर्व शाळांतील विद्यार्थी संख्या सर्वसाधारणपणे ४०६९४ अशी आहे. या वर्षी सर्व साहित्याचा पुरवठा हा वेळेत करण्यात आला आहे. ९,००० गणवेशांबाबतीत मी सांगतेय.

**मा.बाबासाहेब धुमाळ** - पीटी गणवेष कुठल्या मुलांना देताय व खेळ गणवेष कुठल्या मुलांना देताय ते सांगा.

**मा.ऊबाळे (प्र.अधिकारी, शिक्षण मंडळ)** – बालवाडी, पहिली, दुसरी या ३ वर्गांसाठी खेळ गणवेष दिला जातो. तीसरी,चौथी,पाचवी,सहावी व सातवी या वर्गांसाठी पी.टी. गणवेष दिला जातो.

**मा.बाबासाहेब धुमाळ** – बालवाडीचे विद्यार्थी किती?

**मा.ऊबाळे (प्र.अधिकारी,शिक्षण मंडळ)**-बालवाडीचे विद्यार्थी ६५०० आहेत. प्रत्येक इयत्तांमधील विद्यार्थी संख्या वेगवेगळी आहे.

**मा.बाबासाहेब धुमाळ** - तुम्ही पी.टी.गणवेष यासाठी ५० लाखांचे बजेट करताय. तुम्ही ६५०० पीटी गणवेष वाटताय.

**मा.ऊबाळे (प्र.अधिकारी, शिक्षण मंडळ)** - तीसरी ते सातवी या वर्गांसाठी पी.टी. गणवेष दिला जातो. बालवाडी, पहिली व दुसरीसाठी खेळ गणवेष दिला जातो. ६५०० हा आकडा तुम्ही सांगितला आहे. हा खेळ गणवेषाचा आहे. आपण हे बजेट अंदाजे केले आहे. ६५०० हा बालवाडीचा आकडा आहे. त्यात पहिली व दुसरीची मुले ॲड करायची आहेत आपण सांगताय ते सन २०१४-२०१५ चे बजेटमधील आकडे सांगताय.

**मा.बाबासाहेब धुमाळ** – मा.महापौर साहेब, गेल्या वर्षी किती गणवेष वाटप केले त्याचा आकडा सांगा. आत्ताचे नका सांगू. खेळ गणवेष व पी.टी गणवेष किती मुलांना दिला?

**मा.ऊबाळे (प्र.अधिकारी, शिक्षण मंडळ)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा. सदस्य, माझ्याकडे इयत्तेप्रमाणे आकडे आहेत.
इयत्ता पहिलीतील विद्यार्थी संख्या – ५०७२
इयत्ता दुसरीतील विद्यार्थी संख्या – ५५९३
इयत्ता तिसरीतील विद्यार्थी संख्या – ५७९०
इयत्ता चौथीतील विद्यार्थी संख्या – ५९१३
इयत्ता पाचवीतील विद्यार्थी संख्या – ५६६१ अशी विद्यार्थी संख्या आहे.
आरटीई २००९ नुसार प्राथमिक शाळा ही पहिली ते आठवीपर्यंत करण्यात आलेली आहे. आपल्याकडे उर्दू शाळेत आठवीचे वर्ग जोडलेले आहेत. एकूण ४०६९४ विद्यार्थी शालेय गणवेष संख्या आहे. गेल्या वर्षाचे बजेट रु.१०९ कोटी होते.

**मा.बाबासाहेब धुमाळ** – मा.महापौर साहेब,चाळीस हजार अशी विद्यार्थी संख्या आहेतर पी.टी. गणवेषासाठी गेल्या वर्षी किती तरतूद केली होती व त्यातील किती खर्च केला?

**मा.ऊबाळे (प्र.अधिकारी, शिक्षण मंडळ)**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, रु.५० लाख इतकी तरतूद दिसते आहे. ही वाढीव तरतूद करण्यात आली आहे.

**मा.बाबासाहेब धुमाळ** - मा.महापौर साहेब, गेल्या वर्षाचे वाटप आत्ता करताय.

**मा.ऊबाळे (प्र.अधिकारी, शिक्षण मंडळ)**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य,गेल्या वर्षी ९००० गणवेष वाटप हे माध्यमिक विभागाकडून झालेले आहे. शिक्षण मंडळाकडून झालेले नाही.

**मा.बाबासाहेब धुमाळ**–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता गणवेष वाटप झाले ना. मा.आयुक्त साहेब, घाई करु नका. माहिती अधिकारात तुम्ही दिलेल्या पेपरवरूनच मी बोलतो आहे. तरीसुद्धा आत्ता चार महिने होऊन गेले. तुम्ही रु.१० लाख इतका खर्च केला आहे. दहा लाखाचा वकील तुम्ही दिलेला असताना सुद्धा आज उत्तर का देत नाहीत? हा जनतेचा पैसा आहे. का त्यांना द्यायचा? प्रशासन काय करतेय? रेमण्ड (तिरुपती टेक्सटाईल), बॉम्बे डाईंग

(तिरुपती टेक्सटाईल) हा काय प्रकार आहे, ही काय भानगड आहे हे दाखवा. बाबासाहेब (बाबा) धुमाळ म्हणजे माझे नाव बाबा हे कसे असू शकेल, जसे श्रीरंग उर्फ आप्पा बारणे असे असते. तुम्ही कोर्टात सांगितल्याप्रमाणे रिपोर्ट आहे. त्यात तुम्ही क्लिअर कट शेरा मारला आहे. हे चुकून झाले आहे असा तुमच्या अतिआयुक्तांनी असा शेरा मारला आहे. परदेशी साहेबांनी कोंबडा केला आहे, प्रश्नचिन्ह केलेले आहे म्हणून तुम्ही यांना डायरेक्शन दिले होते तुम्ही बॉम्बे डाईंगचे कापड घ्या. रेमण्डचे कापड घ्या. तरीसुद्धा आज परत शिक्षण मंडळाने तुमच्या या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे. परत तिथे तिरुपती टेक्सटाईल्सच येते आहे. तिरुपती टेक्सटाईल याचे जगात कुठेही ऑफिस नाही, त्याचे खाते नाही, त्याचा साधा फोन नंबर नाही, त्याचा कारखाना नाही. अशा माणसाला तुम्ही एवढे दहा दहा कोटी, शंभर शंभर कोटी कसे देताय हा माझा प्रश्न आहे. रेमण्ड, बॉम्बे डाईंगचा कपडा असून सुद्धा त्यांनी का घेतला नाही? हा माझा प्रश्न आहे. याचे उत्तर आयुक्त साहेबांनी द्यावे.

**मा.महापालिका आयुक्त**-मा.महापौर साहेब, उपस्थित सर्व सन्मा.सदस्य, सन्माननीय सदस्यांनी २/३ प्रश्न उपस्थित केले आहेत. एकतर हे प्राथमिक विभागाचे बजेट आहे. माध्यमिक विभागाचे बजेट नाही म्हणून त्यांनी मूळ प्रश्न उपस्थित केला त्याचे उत्तर दिलेले नाही मी यात सांगू इच्छितो की, आपण यात वकील लावलेले आहेत. संबंधित वकिलाच्या मार्गदर्शनाप्रमाणे आपण तोंडी उत्तर मांडायचे का लेखी उत्तर मांडायचे हे ठरवत असतो. जे वकील अर्ग्युमेंटला आले होते, त्यांना त्याबाबतीत तूर्त उत्तर मांडू द्या. त्यामुळे मी वस्तुस्थिती सभागृहासमोर ठेवतो आहे. ही वस्तुस्थिती आहे की मागील २ वर्षे आपण रेमण्ड, बॉम्बे डाईंग आणि त्यात तिरुपती टेक्सटाईल असे यात काम केलेले आहे. याला तत्कालिन आयुक्तांची मान्यता होती आणि शिक्षण मंडळाची मान्यता होती. टर्मस कंडीशनप्रमाणे आपण वर्कऑर्डर दिली होती. पुढे गेल्यावर मान्यता घेऊन आपण ते कंटिन्यू केले होते त्यात कंडीशन टाकली होती फक्त रेमण्ड किंवा बॉम्बे डाईंग यांचेकडूनच करावे. पुढील वर्षी त्याचे पालन झाले नाही तर त्याची चौकशी करण्यात येईल हे मी सभागृहाला सांगू इच्छितो. चौकशी करुन वस्तुस्थिती काय ती सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, साधारण ११० कोटींचे मूळ बजेट व १११ कोटींचे सुधारीत बजेट आहे. याचा आस्थापना खर्च बघितला तर,१५ ते १६ कोटी फक्त खरेदीवर खर्च होतो आहे. खरेदीवर बजेट किती आहे व किती व कशा पद्धतीने आपण त्याच्यावर चर्चा करतोय. परंतू मा.आयुक्त साहेब मला विनंती करायची आहे, आपण आस्थापनेवर एवढा मोठा खर्च करत असू, आणि सभागृहाचे नगरसेवकांचे एवढे म्हणणे आहे शाळेला दर्जा नाही, शाळांमध्ये कोणत्या ॲक्टीव्हीटीज नाहीत, शाळांमध्ये स्वच्छता नाही. या सगळ्या गोष्टी बघितल्या तर खरोखर याबाबतीत शंभर टक्के विचार करायला पाहीजे. वास्तविक शाळांमधील पटसंख्या कमी होते आहे. ४० टक्के ॲडमिशन मधून ५ ते ६ हजार मायनस केले तर ३५,००० विद्यार्थी रोज मनपा शाळांमध्ये शिकायला येतात. याचा अर्थ मनपा शाळांतील विद्यार्थी पटसंख्या चांगली आहे. ४०,००० विद्यार्थी धरले तरी आज महापालिकेच्या शाळेत ३५,००० विद्यार्थी शिकण्यासाठी येतात. बजेट बघितले तर त्या तुलनेत २०/२५ कोटींची खरेदी पण नाही. एवढा खर्च आस्थापनेवर होत असेलतर हे फक्त प्राथमिक वर चालले आहे.

यात माध्यमिक कुठेही नाही. इतकी केविलवाणी परिस्थिती आहे पण याची जबाबदारी कोणाची आहे? ॲक्टीव्हीटी नाहीत. कोण जबाबदारी घेणार. खरोखर अशी परिस्थिती असेल तर ७वीच्या विद्यार्थ्यांला इंग्रजीमधून नाव लिहिता येणार नसेल, मराठीचा धडा वाचता येणार नसेलतर काय कारण आहे. यात प्रायव्हेटबरोबर हे मॅनेज झालेत का. यात सरकारी माणूस नेमा. या प्रत्येक वर्गाची त्याप्रमाणे गुणवत्ता आहे का? या मुलांचे अक्षरच कळत नाही. त्यांना लिहिताच येत नाही. पूर्वी अक्षर सुधार प्रोजेक्ट चालत होता. आत्ता परिस्थिती तशी आहे का? काही ठिकाणी चालते पण त्या मुलांचे अक्षर तरी दिसले पाहीजे. आज पिंपरी चिंचवडमध्ये या शिक्षकांसाठी शाळांना जागा मिळत नाही. मराठी माध्यमाच्या २/४ शाळा शहरात आहेत. ज्ञानप्रबोधिनी आहे. शिवभूमी आहे, मॉडर्न स्कूल आहे बाकी किरकोळ शाळा आहेत. पालकांचा जास्तीत जास्त कल इंग्लिश मिडीयम शाळांकडे आहे. आज शाळा चालवायची असेलतर जागा मिळत नाही. लोक आपल्याला म्हणतात, तुम्ही आम्हाला सांगा, आम्हाला शाळा द्या. मागील शिक्षण मंडळाच्या बजेट सभेच्या वेळी असे बोलले गेले होते. कोणी नामांकित शाळा असेल, ज्ञानप्रबोधिनी असेल, मॉडर्न असेल, शिवभूमी असेल, आणखी कुठल्या चांगल्या टॉपच्या मराठी मिडीयम शाळा असतील त्यांची मिटींग लावायचे ठरवले होते. त्यांना मिटींगला बोलवा. त्यांची सुद्धा नैतिक जबाबदारी म्हणून दत्तक योजनेप्रमाणे प्रायव्हेट शाळांना त्यांना चालवायला द्या. एवढे बजेट या प्रायव्हेट शाळांना दिलेतर शाळांतून चांगला नागरीक तयार व्हायला खरोखर मदत होईल. या शाळांना बोलवा. मुख्याध्यापकांची मिटींग घ्या. त्यांना मिटींगमध्ये सांगा. मराठी मिडीयमच्या शाळांना तुम्हाला मदत करता येईल. शिक्षकांना नाव ठेवावे इतकी माझी पात्रता नाही. ते गुरुवर्य आहेत. काही शिक्षकांच्या बाबतीत सांगत असतील. पाढे म्हणता येतात का, शुद्ध बोलता येते का. यात मग शिक्षकांच्या सुद्धा कार्यशाळा चालतात. ज्ञानप्रबोधिनीमध्ये सुद्धा मे महिन्यात शिक्षकांची कार्यशाळा चालते. अशा शिक्षकांवर कार्यशाळा नेमावी. त्यासाठी काही पेमेण्ट गेलेतरी चालेल, या कार्यशाळा होणे गरजेचे आहे. पिंपरी चिंचवड शहरात इंग्लिश मिडीयम शाळा आहेत. आरटीईच्या नियमाप्रमाणे जे पत्र आले आहे त्या पत्रांचा ते लोक आपल्या शाळेत नेमले पाहीजेत. काही मायनॉरीटी स्कूल्स् आहेत तिथे मायनॉरीटी नियमाप्रमाणे विद्यार्थी भरले जात नाहीत. ही जबाबदारी आपली आहे. त्या त्या शाळांना कळवले आहे का? इथे कोणत्याही नगरसेवकाने सांगावे, इंग्लिश मिडीयम शाळांमध्ये यांना सन्मानपूर्वक वागणूक मिळते का, कोणालाही सन्मानपूर्वक वागणूक मिळत नाही. ज्याचे चालते त्याचे चालते. परंतू सगळ्यांचे चालले पाहीजे. म्हणून इथे सुद्धा आमचे सुद्धा चालायला नको इथे विद्यार्थी १ कि.मी. अंतरावर गेले आहेत का. मायनॉरीटी शाळा आहेत. त्यांनी शंभर टक्के जागा भरल्या पाहीजेत. उरलेले लकी ड्रॉ करणार आहोत का? विद्यार्थी नसतील तर त्यांनी त्या जागा मनपाला कळवल्या पाहीजेत. हा यांचा अधिकार आहे. हा अधिकार यांनी वापरला पाहीजे. मी ऊबाळे मॅडमना सांगितिले आहे, बाहेरच्या शाळांमध्ये सुद्धा फॅसिलिटी द्या. फुकट पाणी द्या. आपण शिक्षणावर एवढा खर्च करणार. अजून चार गोष्टी फुकट दिल्यातरी काही बिघडणार नाही. पाणी पाहीजे तर पाणी द्या. या शाळांना जी काही सुविधा पाहीजे ती द्या. पण आपल्याकडील पिंपरी चिंचवडमधील मुले चांगली गुणवत्ता मिळवून शिकली गेली पाहीजेत. पुढील वर्षी परत असे म्हणायला नको की आख्या वर्षभरात आम्ही मिटींग लावू शकलो नाही. आम्ही त्यांना जागा देऊ शकलो नाही. मा.आर.एस.कुमार यांनी सांगितले, ज्या-ज्या बिल्डींग्ज्

आहेत, तिथे शाळा चालू आहे. सरकारच्या नियमाप्रमाणे शाळा चालू आहे. त्याचा दर्जा टिकवून आहेत. तुम्ही तुमच्या नियमाप्रमाणे घ्या आपल्यावर लोड होतो आहे ताण आहे. शाळा दत्तक घेण्यासाठी विचार करा. बाकी गोष्टींवर बोलण्यासारखे काही नाही. आहे त्या शिक्षकांचा पगार आहे. अतिरिक्त शिक्षक आहेत त्यांचा पगार आहे. वीजरोधक यंत्रणा बसवायचे त्याचे पैसे आहेत. खरेदीसाठी असो, नसो मे महिन्यात टेंडर काढा. कोणाला विचारायची गरज नाही. तुमच्या आमच्या माहितीनुसार आता शिक्षण मंडळाला काही अधिकार राहीलेले नाहीत. आता सरकारने तुम्हाला व सभागृहाला अधिकार दिलेले आहेत त्या माध्यमातून मे महिन्यात सगळ्या पद्धतीने टेंडर काढा. खरोखर रेमण्डचा कपडा दिला आहे तर खरोखर रेमण्डचा कपडा मिळाला आहे का, वरवर बाटा कंपनीचे चार जोड व खाली वेगळेच बूट आहेत का नाही हे बघितले पाहीजे. दर्जा बघा. खरोखर पूर्वीचे लोक असे सांगतात. आत्ता महापालिकेची परिस्थिती चांगली आहे. मुलांना १० कोटी तरतूद केली असेल तर जिल्हा परिषदेच्या शाळेतील, ग्रामपंचायतीच्या शाळेतील विद्यार्थांकडे बघितले तर शर्ट शिवलेला असतो, पायात चप्पल नसते. शिकणारा माणूस कसाही शिकतो. त्यासाठी त्याला खायला दिलेच पाहीजे त्यासाठी अमुक दिले पाहीजे असे मला वाटत नाही. हे करताना हे सुद्धा बघितले पाहीजे सगळी मुले डॉक्टर, इंजिनिअर होणारच आहेत का. स्पर्धा परीक्षा केंद्रे कितीतरी उघडली आहेत. यांना स्कॉलरशीप परीक्षेला बसवले पाहीजे. यांच्यात स्पर्धा व्हायला पाहीजे. यांना वेगवेगळ्या स्पर्धा परिक्षांना बसवले पाहीजे. क्रिडा प्रबोधिनीतील मुले पोलिस भरतीत घेतली पाहीजेत. त्यांना मिलिटरीमध्ये जाण्यासाठी कोचिंग दिले पाहीजे. या मुलांना नोकरी लागली पाहीजे. पूर्वी एनसीसी होती. त्याचे ट्रेनिंग त्या पद्धतीने झाले पाहीजे. मा.महापौर साहेब, स्टँडींग समितीने दिलेला विषय मंजूर झाला पाहीजे. मा.स्थायी समितीकडून आलेला विषय आहे. यात जी उपसूचना आहे, मूळ अंदाजपत्रकात वाढ करायचा तपशिल मा.स्थायी समितीने दिला आहे. ते वर्गीकरण करायचा तपशील त्यात नसल्यामुळे मा.उल्हास शेट्टी जी उपसूचना वाचत आहेत, ती उपसूचना मंजूर करण्यात यावी.

**मा.संजय काटे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो आहे - पिंपरी चिंचवड महापालिकेतील ज्या मनपाच्या शाळा आहेत त्या शाळांमध्ये शिक्षण मंडळाने दरवर्षी १ मे (एक मे) पर्यंत रेनकोट, बूट, कपडे, (गणवेश), पीटी गणवेश, खेळ गणवेश, स्वेटर, दप्तरे या वस्तू कि ज्या विदयार्थ्यांना वेळेवर मिळणे आवश्यक आहे म्हणून सदरच्या वस्तू हया एक मे पर्यंत खरेदी कराव्यात. जर एक मे पर्यंत खरेदी केल्या नाहीत तर मा.आयुक्त यांनी स्वतःच्या अधिकारात अधिकार असेल अथवा नसेल तरी सदरच्या वस्तू दोन (२) मे ते सात (७) जून या दरम्यान खरेदी करुन विदयार्थ्यांना शाळा सुरु झाल्यापासून तीन आठवडयात अथवा ३० जून पर्यंत पुरवाव्यात/वाटप करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.आशा शेंडगे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते आहे - शिक्षण मंडळाच्या वतीने चालविण्यात येत असलेल्या इयत्ता १ ली ते ५ वी मध्ये शिकत असलेल्या विदयार्थ्यांची

गुणवत्ता वाढ व्हावी या करीता " दि वाईज बृध्दा लर्निंग " प्रकल्प राबविण्यास व प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. या करीता सर्वांगिन शैक्षणिक गुणवत्ता व विकास या लेखाशिर्षकावर शिक्षकपगार या लेखाशिर्षकावरुन आवश्यक ते वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.शारदा बाबर** - मा.महापौर साहेब,उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो आहे - उपरोक्त विषयास अनुसरुन मा.स्थायी समितीने ठराव क्र.१०४७२ दि.१३/०१/२०१५ अन्वये शिक्षण मंडळाचे २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक उपसुचनेसह मंजुर करण्यात आले आहे. अ) शिक्षण मंडळाचे सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रकामध्ये खालील लेखाशिर्षावर तरतूदीमध्ये वाढ मंजूर करणेत येत आहे. तपशिल खालीलप्रमाणे-

| **अ.क्र.** | **लेखाशिर्ष** | **वाढ र.रु.** |
|---|---|---|
| १. | विद्यार्थी गणवेश | १,२०,००,०००/- |
| २. | खेळ शाळा गणवेश | ५०,००,०००/- |
| ३. | पी.टी.गणवेश | ५०,००,०००/- |
| ४. | शैक्षणिक गुणवत्ता व विकास | ५,००,०००/- |
| ५. | विजरोधक यंत्रणा | १,००,००,०००/- |
| ६. | शिष्यवृत्ती | ५,००,०००/- |
| ७. | शालेय स्वेटर | ५०,००,०००/- |
| | **एकूण वाढ र.रु.** | **३,८०,००,०००/-** |

वरील लेखाशिर्षावरील तरतूद व वाढीव मनपा हिस्सा रक्कम मनपाच्या खालील विभागातील उत्पन्नामध्ये वाढ करुन शिक्षण मंडळास उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रक | अ.क्र. | वाढ र.रु. | जमा किंवा वाढ |
| | १ | ०१ कोटी | कर संकलन |
| | २ | २ कोटी ८० लाख | एलबीटी |

ब) शिक्षण मंडळाच्या सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये खालील लेखाशिर्षावर तरतुदीमध्ये वाढ मंजूर करणेत येत आहे. तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | लेखाशिर्ष | वाढ र.रु. | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | शिक्षक वेतन | ६,००,००,०००/- | सध्या १०० पदे रिक्त असून, जून २०१५ पासून शासनाकडून जादा शिक्षक वर्ग होऊन/नविन नेमणूका होतील, त्यांचे वेतनासाठी व मनपा कर्मचा-यांप्रमाणे शिक्षकांना महागाई भत्ता फरक देणेकामी |
| २ | कार्यालय फर्निचर | १,००,००,०००/- | शिक्षण मंडळ कार्यालयाचे नूतनीकरण करणेकामी |
| ३ | शालेय फर्निचर | १,५०,००,०००/- | इ.१ ली ते ४ थी करीता शाळांमध्ये बेंचेस घेणेकामी |
| ४ | शारिरीक शिक्षण व साहित्य | १०,००,०००/- | उडी मारण्याची दोरी,डंबेल्स, रबरी रिंग इ. घेणेकामी |
| ५ | गणवेश | १,००,००,०००/- | गणवेश खरेदीकामी |
| ६ | पाटया व दप्तरी | २०,००,०००/- | पाटया व दप्तरी खरेदीकामी |
| ७ | विदयार्थी कला क्रिडा व नाटय स्पर्धा | १०,००,०००/- | दरवर्षीप्रमाणे स्पर्धा भरविणे |
| ८ | पी.टी.गणवेश | २५,००,०००/- | पी.टी.गणवेश खरेदीकामी |
| ९ | शालेय स्वेटर | ५०,००,०००/- | स्वेटर खरेदीकामी |
| १० | ई-लर्निंग | १,००,००,०००/- | लॅब तयार करणे, संगणक खरेदी, ऑनलाईन कामकाज |
| ११ | विज्ञान प्रदर्शन (सायन्स पार्क) भेट | २०,००,०००/- | विदयार्थी सायन्स पार्क भेटीचा खर्च मनपास देणे. |
| १२ | विजरोधक यंत्रणा | २,००,००,०००/- | विज अटकाव यंत्रणा शाळा इमांरतीवर बसविणे. |
| १३ | घरबांधणी कर्ज अग्रीम | ५,००,००,०००/- | मनपा कर्मचा-यांप्रमाणे शिक्षकांना घरबांधणी कर्ज देणे. |
| १४ | वाहन कर्ज अग्रीम | १,००,००,०००/- | मनपा कर्मचा-यांप्रमाणे शिक्षकांना वाहन कर्ज देणे. |
| | **एकूण वाढ र.रु.** | **१९,८५,००,०००/-** | |

वरील लेखाशिर्षावरील तरतूद व वाढीव मनपा हिस्सा रक्कम मनपाच्या खालील विभागातील उत्पन्नामध्ये वाढ करुन शिक्षण मंडळास उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत यावी.

| सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक | अ.क्र. | वाढ र.रु. | जमा किंवा वाढ तपशिल |
|---|---|---|---|
| | १ | ०२ कोटी | कर संकलन |
| | २ | ०१ कोटी | बांधकाम परवानगी |
| | ३ | १६ कोटी ८५ लाख | एलबीटी |

तसेच प्रभाग क्रमांक ५७, पिंपळे गुरवमध्ये ठिकठिकाणी रुंदीकरण झालेल्या व मनपाच्या ताब्यात आलेल्या रस्त्याचे खडी-मुरुम व बी.बी.एम.चे काम मे.क्लिन्सी कन्स्ट्रक्शन्स प्रा.लि. निविदा नोटीस क्रमांक ३/६७/१४-१५ निविदा रक्कम १४ लाख ५६० हे काम सुरु आहे. या कामांतून लक्ष्मीनगर, सुवर्ण पार्क, तुळजाभवानी नगर, या भागातील उर्वरित रस्त्यांचे डांबरीकरण करावयाचे आहे. परंतु सदर रकमेतून हे काम पुर्ण होऊ शकणार नाही तसेच नवीन निविदा काढण्यासाठी अधिक वेळ लागणार असल्याचे पाहता चालू कामांसाठी रक्कम रु. ९८ लाखांची महापौर विकास निधीतून सुधारित प्रशासकीय मान्यता वाढवून देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र जगताप** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.अरुण बो-हाडे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो आहे - पिं.चिं.म.न.पा. शिक्षण मंडळाच्या लेखाशिर्षातील (क्र.३५) विदयार्थी पावसाळी साधणे यासाठी केलेली तरतूद लेखाशिर्ष (क्र.३९) बालग्रंथालय, (क्र.२३) संगीत साहित्य खरेदी, यासाठी वर्ग करुन विदयार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता व विकास यासाठी आवश्यक प्रशिक्षण यासाठी वर्ग करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळातील शाळांच्या विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विदयार्थ्यांसाठी बालग्रंथालय, पर्यावरण शिक्षण आणि संगीत शिक्षण यासाठी रु. ५०,००,०००/- (पन्नास लाख रुपये) भरीव तरतूद करण्यात यावी. सदरची तरतूद खालील लेखाशिर्षमधून वर्ग करण्यात यावेत. क्र.२ - कार्यालय फर्निचर - वाढीव तरतूद रु. १,००,००,०००/- पैकी रु. २५,००,०००/- (पंचवीस लाख) ही वर्ग करावी. क्र. ३ -शालेय फर्निचरची वाढीव तरतूद रु. १,५०,००,०००/- पैकी रु. २५,००,००० (पंचवीस लाख) वर्ग करावी. २५,००,०००/- + २५,००,०००/- एकूण ५०,००,०००/- (रु.पन्नास लाख) वरील दोन्ही लेखाशिर्षातून वर्ग करुन लेखाशिर्ष संगीत साहित्य खरेदी, पर्यावरण शिक्षण आणि बालग्रंथालय यासाठी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद करणेस मान्यता देणेत यावी.
**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.
**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६३७ विषय क्रमांक - २

दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/६/कावि/२०४४/१५ दि.१२/१/२०१५
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०४७२ दि. १३/०१/२०१५

शिक्षण मंडळाचे सन २०१४-२०१५ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.१०९,९८,९९,०००/- चे व सन २०१५-२०१६ चे मूळ अंदाजपत्रक र.रु.११०,९६,५०,०००/- मान्यतेकामी सादर केलेले

असल्याने त्यास तसेच शिक्षण मंडळासाठी पुढीलप्रमाणे तरतुदीमध्ये वाढ करणेबाबत विनंती आहे.

शिक्षण मंडळाचे सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रक - तरतुदीमध्ये वाढ करावयाचा तपशिल

| अ.क्र. | लेखाशिर्ष | वाढ र.रु. |
|---|---|---|
| १) | विद्यार्थी गणवेश | १.२०,००,००० |
| २) | खेळ शाळा गणवेश | ५०,००,००० |
| ३) | पी.टी.गणवेश | ५०,००,००० |
| ४) | सर्वांगिण शैक्षणिक गुणवत्ता व विकास | ५,००,००० |
| ५) | विजरोधक यंत्रणा | १,००,००,००० |
| ६) | शिष्यवृत्ती | ५,००,००० |
| ७) | शालेय स्वेटर | ५०,००,००० |
| | एकूण वाढ र.रु. | ३,८०,००,००० |

शिक्षण मंडळाचे सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक - तरतुदीमध्ये वाढ करावयाचा तपशिल

| अ.क्र. | लेखाशिर्ष | वाढ र.रु. | कारण |
|---|---|---|---|
| १) | शिक्षक वेतन | ६,००,००,००० | सध्या १०० रिक्त पदे असून जून २०१५ पासून शासनाकडून जादा शिक्षक वर्ग होऊन/नविन नेमणूका होतील, त्यांचे वेतनासाठी व मनपा कर्मचा-यांप्रमाणे शिक्षकांनाही महागाई भत्ता फरक देणेकामी |
| २) | कार्यालय फर्निचर | १,००,००,००० | शिक्षण मंडळ कार्यालयाचे नूतनीकरण करणेकामी |
| ३) | शालेय फर्निचर | १,५०,००,००० | इ.१ली ते ४थी करीता शाळांमध्ये बेंचेस घेणेकामी |
| ४) | शारिरीक शिक्षण व साहित्य | १०,००,००० | उडी मारण्याची दोरी, डंबेल्स, रबरी रिंग इ. घेणेकामी |
| ५) | विद्यार्थी गणवेश | १,००,००,००० | गणवेश खरेदीकामी |
| ६) | पाट्या व दप्तरे | २०,००,००० | पाट्या व दप्तरे खरेदीकामी |
| ७) | विद्यार्थी कला,क्रिडा व नाट्य स्पर्धा | १०,००,००० | दरवर्षीप्रमाणे स्पर्धा भरविणेकामी |
| ८) | पी.टी.गणवेश | २५,००,००० | पी.टी.गणवेश खरेदीकामी |
| ९) | शालेय स्वेटर | ५०,००,००० | स्वेटर खरेदीकामी |
| १०) | ई-लर्निंग | १,००,००,००० | लॅब तयार करणे, संगणक खरेदी ऑनलाईन कामकाज |

| | | | |
|---|---|---|---|
| ११) | विज्ञान प्रदर्शन (सायन्स पार्क) भेट | २०,००,००० | विद्यार्थी सायन्स पार्क भेटीचा खर्च मनपास अदा करणेकामी |
| १२) | विजरोधक यंत्रणा | २,००,००,००० | विज अटकाव यंत्रणा शाळा इमारतींवर बसविणेकामी |
| १३) | घरबांधणी कर्ज | ५,००,००,००० | मनपा कर्मचा-यांप्रमाणे प्राथ. शिक्षकांना घरबांधणी कर्ज देणे |
| १४) | वाहन कर्ज | १,००,००,००० | मनपा कर्मचा-यांप्रमाणे प्राथ.शिक्षकांना वाहन कर्ज देणे. |
| | एकूण वाढ र.रु. | १९,८५,००,००० | |

तसेच शिक्षण मंडळातील शिक्षकांना गृहकर्ज देणेसाठी ररु.१५ कोटी व वाहनकर्ज देणेसाठी र.रु.१ कोटी तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेतील ज्या मनपाच्या शाळा आहेत त्या शाळांमध्ये शिक्षण मंडळाने दरवर्षी १ मे (एक मे) पर्यंत रेनकोट, बूट, कपडे, (गणवेश), पीटी गणवेश, खेळ गणवेश, स्वेटर, दप्तरे या वस्तू कि ज्या विदयार्थ्यांना वेळेवर मिळणे आवश्यक आहे म्हणून सदरच्या वस्तू हया एक मे पर्यंत खरेदी कराव्यात. जर एक मे पर्यंत खरेदी केल्या नाहीत तर मा.आयुक्त यांनी स्वतःच्या अधिकारात अधिकार असेल अथवा नसेल तरी सदरच्या वस्तू दोन (२) मे ते सात (७) जून या दरम्यान खरेदी करुन विदयार्थ्यांना शाळा सुरु झाल्यापासून तीन आठवडयात अथवा ३० जून पर्यंत पुरवाव्यात/वाटप करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच शिक्षण मंडळाच्या वतीने चालविण्यात येत असलेल्या इयत्ता १ ली ते ५ वी मध्ये शिकत असलेल्या विदयार्थ्यांची गुणवत्ता वाढ व्हावी या करीता " दि वाईज बृध्दा लर्निंग " प्रकल्प राबविण्यास व प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. या करीता सर्वांगिन शैक्षणिक गुणवत्ता व विकास या लेखाशिर्षकावर शिक्षकपगार या लेखाशिर्षकावरुन आवश्यक ते वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच उपरोक्त विषयास अनुसरुन मा.स्थायी समिने ठराव क्र.१०४७२ दि.१३/०१/२०१५ अन्वये शिक्षण मंडळाचे २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक उपसुचनेसह मंजुर करण्यात आले आहे. अ) शिक्षण मंडळाचे सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रकामध्ये खालील लेखाशिर्षावर तरतूदीमध्ये वाढ मंजूर करणेत येत आहे. तपशिल खालीलप्रमाणे-

| **अ.क्र.** | **लेखाशिर्ष** | **वाढ र.रु.** |
|---|---|---|
| १. | विद्यार्थी गणवेश | १,२०,००,०००/- |
| २. | खेळ शाळा गणवेश | ५०,००,०००/- |
| ३. | पी.टी.गणवेश | ५०,००,०००/- |
| ४. | शैक्षणिक गुणवत्ता व विकास | ५,००,०००/- |
| ५. | विजरोधक यंत्रणा | १,००,००,०००/- |
| ६. | शिष्यवृत्ती | ५,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ७. | शालेय स्वेटर | ५०,००,०००/- |
| | **एकूण वाढ र.रु.** | **३,८०,००,०००/-** |

वरील लेखाशिर्षावरील तरतूद व वाढीव मनपा हिस्सा रक्कम मनपाच्या खालील विभागातील उत्पन्नामध्ये वाढ करुन शिक्षण मंडळास उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

| सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रक | अ.क्र. | वाढ र.रु. | जमा किंवा वाढ |
|---|---|---|---|
| | १ | ०१ कोटी | कर संकलन |
| | २ | २ कोटी ८० लाख | एलबीटी |

ब) शिक्षण मंडळाच्या सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये खालील लेखाशिर्षावर तरतुदीमध्ये वाढ मंजूर करणेत येत आहे. तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | लेखाशिर्ष | वाढ र.रु. | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | शिक्षक वेतन | ६,००,००,०००/- | सध्या १०० पदे रिक्त असून, जून २०१५ पासून शासनाकडून जादा शिक्षक वर्ग होऊन/नविन नेमणूका होतील, त्यांचे वेतनासाठी व मनपा कर्मचा-यांप्रमाणे शिक्षकांना महागाई भत्ता फरक देणेकामी |
| २ | कार्यालय फर्निचर | १,००,००,०००/- | शिक्षण मंडळ कार्यालयाचे नूतनीकरण करणेकामी |
| ३ | शालेय फर्निचर | १,५०,००,०००/- | इ.१ ली ते ४ थी करीता शाळांमध्ये बेंचेस घेणेकामी |
| ४ | शारिरीक शिक्षण व साहित्य | १०,००,०००/- | उडी मारण्याची दोरी, डंबेल्स, रबरी रिंग इ. घेणेकामी |
| ५ | गणवेश | १,००,००,०००/- | गणवेश खरेदीकामी |
| ६ | पाटया व दप्तरी | २०,००,०००/- | पाटया व दप्तरी खरेदीकामी |
| ७ | विदयार्थी कला क्रिडा व नाटय स्पर्धा | १०,००,०००/- | दरवर्षीप्रमाणे स्पर्धा भरविणे |
| ८ | पी.टी.गणवेश | २५,००,०००/- | पी.टी.गणवेश खरेदीकामी |
| ९ | शालेय स्वेटर | ५०,००,०००/- | स्वेटर खरेदीकामी |
| १० | ई-लर्निंग | १,००,००,०००/- | लॅब तयार करणे, संगणक खरेदी, ऑनलाईन कामकाज |
| ११ | विज्ञान प्रदर्शन (सायन्स पार्क) भेट | २०,००,०००/- | विदयार्थी सायन्स पार्क भेटीचा खर्च मनपास देणे. |
| १२ | विजरोधक यंत्रणा | २,००,००,०००/- | विज अटकाव यंत्रणा शाळा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | इमांरतीवर बसविणे. |
| १३ | घरबांधणी कर्ज अग्रीम | ५,००,००,०००/- | मनपा कर्मचा-यांप्रमाणे शिक्षकांना घरबांधणी कर्ज देणे. |
| १४ | वाहन कर्ज अग्रीम | १,००,००,०००/- | मनपा कर्मचा-यांप्रमाणे शिक्षकांना वाहन कर्ज देणे. |
| | **एकूण वाढ र.रु.** | **१९,८५,००,०००/-** | |

वरी
ल लेखाशिर्षावरील तरतूद व वाढीव मनपा हिस्सा रक्कम मनपाच्या खालील विभागातील उत्पन्नामध्ये वाढ करुन शिक्षण मंडळास उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

| सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक | अ.क्र. | वाढ र.रु. | जमा किंवा वाढ तपशिल |
|---|---|---|---|
| | १ | ०२ कोटी | कर संकलन |
| | २ | ०१ कोटी | बांधकाम परवानगी |
| | ३ | १६ कोटी ८५ लाख | एलबीटी |

तसेच प्रभाग क्रमांक ५७, पिंपळे गुरवमध्ये ठिकठिकाणी रुंदीकरण झालेल्या व मनपाच्या ताब्यात आलेल्या रस्त्याचे खडी-मुरुम व बी.बी.एम.चे काम मे.क्लिन्सी कन्स्ट्रक्शन्स प्रा.लि. निविदा नोटीस क्रमांक ३/६७/१४-१५ निविदा रक्कम १४ लाख ५६० हे काम सुरु आहे. या कामांतून लक्ष्मीनगर, सुवर्ण पार्क, तुळजाभवानी नगर, या भागातील उर्वरित रस्त्यांचे डांबरीकरण करावयाचे आहे. परंतु सदर रकमेतून हे काम पुर्ण होऊ शकणार नाही तसेच नवीन निविदा काढण्यासाठी अधिक वेळ लागणार असल्याचे पाहता चालू कामांसाठी रक्कम रु. ९८ लाखांची महापौर विकास निधीतून सुधारित प्रशासकीय मान्यता वाढवून देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिं.चिं.म.न.पा. शिक्षण मंडळाच्या लेखाशिर्षातील (क्र.३५) विदयार्थी पावसाळी साधणे यासाठी केलेली तरतूद लेखाशिर्ष (क्र.३९) बालग्रंथालय, (क्र.२३) संगीत साहित्य खरेदी, यासाठी वर्ग करुन विदयार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता व विकास यासाठी आवश्यक प्रशिक्षण यासाठी वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळातील शाळांच्या विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विदयार्थ्यांसाठी बालग्रंथालय, पर्यावरण शिक्षण आणि संगीत शिक्षण यासाठी रु.५०,००,०००/- (पन्नास लाख रुपये) भरीव तरतूद करण्यास मान्यता देणेत येत आहे. सदरची तरतूद खालील लेखाशिर्षमधून वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. क्र.२ - कार्यालय फर्निचर - वाढीव तरतूद रु. १,००,००,०००/- पैकी रु. २५,००,०००/- (पंचवीस लाख) ही वर्ग करावी. क्र. ३ -शालेय फर्निचरची वाढीव तरतूद रु. १,५०,००,०००/- पैकी रु. २५,००,००० (पंचवीस लाख) वर्ग करावी. २५,००,०००/- + २५,००,०००/- एकूण ५०,००,०००/- (रु.पन्नास लाख) वरील दोन्ही लेखाशिर्षातून वर्ग करुन लेखाशिर्ष संगीत साहित्य खरेदी, पर्यावरण शिक्षण आणि बालग्रंथालय यासाठी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६३८ विषय क्रमांक - ३

दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वृ.सं./४/कावि/१६/१५ दि.३/१/२०१५

२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०५७९ दि. ३०/०१/२०१५

मनपाच्या वृक्षप्राधिकरणाचे सन २०१४-१५ चे सुधारीत र.रू.१५,२८,२१,०००/- व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक र.रू.१५,६५,२१,०००/- प्रस्तावासोबत जोडणेत आलेल्या वृक्षप्राधिकरण ठराव क्र.११ दि.१२/११/२०१४ चे अंदाजपत्रकास तपशिलाप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वृक्षसंवर्धन विभागाने सन २०१५-२०१६ चे मूळ अंदाजपत्रक मांडले आहे. महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडाचे संरक्षण व जतन करणे. आमची एक कमिटी आहे वृक्ष तोड कमिटी. या कमिटीमध्ये याच्याशिवाय दुसरा विषयच नसतो. आयुक्त साहेब, तुम्ही या कमिटीचे अध्यक्ष आहात कधीतरी या वृक्षतोड समितीतील कारभार बघत जा. कंटीन्यू २०/२० वर्षे तेच काम चालले आहे. जरा तुट्ट द्या. याठिकाणी इथे उद्यान अधिक्षक असतील ते म्हणतात बाई तुम्हाला अधिकार नाही. त्यांना अधिकारांची सगळी माहिती आहे. ते खूप कमी वेळ उद्यानांत असतात. बाकी वेळ अभ्यासच करत असतात. कुठलाही विषय काढला की ते म्हणतात तुमचा तो अधिकार नाही. त्यांना विचारा त्यांचा अधिकार आहे का हे त्यांना दाखवा. यातील आकड्यांवर बोलले तरी ते कमी जास्त होणार नाहीत. आहे तेच राहणार आहेत. त्यातील ज्या काही त्रुटी आहेत. आम्हाला एक प्रकारचे खरेतर मी प्रश्नउत्तर देणार होते. तसे मी महापौर मॅडमशी बोलले होते. विषय आलाच आहेतर बोलून घ्यावे. काही बोलले तरी पालथ्या घड्यावर पाणीच आहे. कारण ते इतके निगरगट्ट आहेत. त्यांच्यावर काही परिणाम होणार नाही. मी परवा वृक्षप्राधिकरणाच्या समितीमध्ये बोलले आणि लगेच मला एक अननोन फोन आला होता.

**मा.सुलभा ऊबाळे** - मा.नगरसचिव नियम सांगा. कोरम नसताना बजेटच्या विषयाला मंजुरी कशी काय घेताय? तुमचे बजेट, मिटींग सगळे बेकायदेशीर आहे. ८/१० लोकांमध्ये तुम्ही मिटींग घेताय.

**मा.शमिम पठाण**- बजेट पास झाले पाहीजे. त्याशिवाय वृक्षतोड कशी करणार.

**मा.सुलभा ऊबाळे** - मा.महापौर साहेब, कोरमचा नियम सांगा. हरकत आली की लगेच नियम सांगावा लागतो.

(मा.नगरसचिव यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची प्रकरण २ मधील नियम-१ (फ) वाचून दाखवला.)

**मा.सुलभा ऊबाळे** - सदस्य संख्या किती ते मोजा. महत्वाचा विषय असताना तुम्ही सदस्य थांबवून ठेवायला पाहीजे होते.

**मा.शमिम पठाण**- आम्ही अधिका-यांना बजेट देतोय. त्यांना काम करु द्यायला नको का? मा.महापौर साहेब, हा विषय मंजूर करुन टाका. मी प्रश्नोत्तरे देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ४

दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.रमा ओव्हाळ व मा.अतुल शितोळे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०७२७ दि. १०/०२/२०१५

महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळातील निवृत्त प्राथमिक शिक्षकांना मनपा कर्मचा-यांप्रमाणे धन्वंतरी योजनेचा लाभ देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.आर.एस.कुमार**- मा.महापौर साहेब,मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-महानगरपालिकेतील नगसेवकांना मेडीक्लेम इन्शुरन्स कार्ड रु. ५,००,०००/- इन्शुरन्स कंपनीकडून काढून देणेस

मान्यता देणेत येत आहे सदर कार्ड मनपाकडून देणेत यावे तसे शक्य नसेलतर मनपाकडून कार्ड देणेत यावे व त्याची (कार्डची) रक्कम मानधनातून वसुल करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र जगताप** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६३९ विषय क्रमांक - ४
दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.रमा ओव्हाळ व मा.अतुल शितोळे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०७२७ दि. १०/०२/२०१५

महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळातील निवृत्त प्राथमिक शिक्षकांना मनपा कर्मचा-यांप्रमाणे धन्वंतरी योजनेचा लाभ देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महानगरपालिकेतील नगसेवकांना मेडीक्लेम इन्शुरन्स कार्ड रु ५,००,०००/- इन्शुरन्स कंपनीकडून काढून देणेस मान्यता देणेत येत आहे सदर कार्ड मनपाकडून देणेत यावे तसे शक्य नसेलतर मनपाकडून कार्ड देणेत यावे व त्याची (कार्डची) रक्कम मानधनातून वसुल करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६४० विषय क्रमांक - ५
दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.रमा ओव्हाळ व मा.अतुल शितोळे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०७२८ दि. १०/०२/२०१५

मनपामध्ये काम करीत असणा-या समुह संघटकांना मनपा कर्मचा-यांप्रमाणे शासकीय व सार्वजनीक सुट्टया मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ६

दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/७/कावि/११/२०१५, दि.१६/०१/२०१५

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.७६ दि.३१/०१/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये जाहिरात फलक उभारुन जाहिराती केल्या जातात. त्यावर महानगरपालिकेमार्फत जाहिरात कर, परवाना फी व जाहिरात फलक म.न.पा. जागेत असल्यास जागाभाडे आकारणी करणेत येऊन परवाना दिला जातो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ नुसार आकारण्यात येणारे परवाना फीचे दर सन २०१५ - १६ करिता निश्चित करणेकामी व महानगरपालिकेच्या उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने जाहिरातीचे दरात प्रस्तावात नमुद परिशिष्ट “अ” प्रमाणे सर्व साधारण क्षेत्रासाठी परवाना फी चे दर प्रस्तावित केले आहेत. त्यामध्ये प्रस्तावात नमुद परिशिष्ट “अ” मधील अ.क्र.१ वरील जाहिरात फलक/आकाशचिन्ह (होर्डिंग्ज)/जमीनीवरील, इमारतीवरील, टेरेसवरील इ. सर्व ठिकाणचे जाहिरात फलकास सन २०१५-१६ करिता सुचविणेत आलेला दर प्रति चौरस फुट प्रतिमहा र.रु.१०/- ऐवजी प्रति चौरस फुट प्रतिमहा र.रु.१५/- अशा दुरुस्तीसह मान्यता देणेस तसेच विशिष्ट चौकांची यादी प्रस्तावात नमुद परिशिष्ट “ब” मध्ये नमुद केलेप्रमाणे परवाना फी चे दर प्रस्तावित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, सभागृहात सदस्य संख्या १/३ पेक्षा कमी आहे. नगरसचिव नियम वाचा. गणपूर्ती असो वा नसो तरीही सभागृह चालू शकते सभा दोन वेळा तहकूब केली आहे. गणसंख्येचा काय विषय आला. नगरसचिव तुम्ही चुकीचे वाचताय. (अधिनियमातील अनुसूची प्रकरण २ मधील नियम १ (फ) वाचून दाखवला) सहा दिवस सभा तहकूब झाली आहे. तुम्ही चुकीचे सांगताय नियम काय सांगतो. साहेब, तुम्ही सगळ्यांना सांगितले पाहीजे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दोन वेळा मिटींग तहकूब झाली आहे. आता विषय क्रमांक ६ वर चर्चा सुरु करा.

**मा.राजेंद्र जगताप** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आकाशचिन्ह परवाना विभाग हे महापालिकेचे आर्थिक उत्पन्नाचे महत्वाचे साधन आहे. मात्र गेल्या ३० वर्षांत काही अधिकारी,

पदाधिका-यांनी आपले स्वतःचे हितसंबंध जोपासण्यासाठी गेले ३० वर्ष कोट्यावधी रुपयाचे नुकसान झाले आहे. आता एल.बी.टी. उत्पन्नावर मर्यादा येणार आहे. त्यामुळे आता तरी डोळे उघडणार आहेत का नाही? कारण भविष्यात महापालिकेतील कर्मचा-यांचे पगार होऊ शकणार नाही. त्यामुळे या विभागाकडे आता उत्पन्नाच्या दृष्टिने लक्ष देण्याची गरज आहे. शहरात एकूण आकाशचिन्ह परवान्यांची संख्या किती? प्रशासनाकडून देण्यात येणारी माहिती ही दिशाभूल करणारी आहे. त्यामुळे ख-या अर्थाने आकाश चिन्ह परवाना विभागाकडून ५०% उत्पन्न मिळत आहे. धिरेंद्र ॲडव्हरटायझिंग या मालकाच्या वेगवेगळ्या नावांने ५ ते ६ शाखा आहेत. यांच्यावर अनेक वर्षांपासून महापालिका मेहेरबान आहे. का मेहेरबान आहे? कारण अनेक वर्षांपासून हे हितसंबंध जोपासले आहेत. मा.आयुक्त साहेब, माझी आपणास विनंती आहे की, आपण खाजगी संस्थेकडून शहरातील सर्व जाहिरात फलकांचा सर्वे करावा. तेव्हा आपणास खरी माहिती उघड होईल. या आकाश परवान्यासाठी किती शुल्क आकारले जाते? किती वर्षांपासून वाढ केली आहे की नाही आणि जर केली असेल तर ती किती केली आणि नसेल केली तर का केली नाही, याचे प्रशासनाने सविस्तर उत्तर द्यावे. प्रशासनाकडून खोटी माहिती देण्याचा प्रयत्न केल्यास आम्हाला सर्वे करण्याची वेळ आणुन देऊ नका. एवढेच या निमित्ताने माझे विचार व्यक्त करुन यावर प्रशासनाने योग्य खुलासा करावा अशी प्रशासनाला व आयुक्तांना एवढीच विनंती आहे.

**मा.राजेंद्र काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आकाशचिन्ह परवाना विभागाकडे ख-या अर्थाने महापालिकेच्या उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून आपण पाहिलेतर मला एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून द्यायची आहे की, हायकोर्टाचा आदेश असूनही चौकाचौकात कितीतरी अनधिकृत बोर्ड लावले जातात ख-या अर्थाने मागील मिटींगला आलो होतो तेव्हाही सांगितले होते. तेव्हा अक्षरशः दूकानांसमोर बोर्ड लावले जातात कोणत्यातरी नेत्याच्या वतीने बोर्ड लावले जातात. दूकानदारावर विविध करांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने खूप मोठ्या प्रमाणावर बोजा असतो. मग असे दुकानासमोर बोर्ड लावले तर त्याना धंदा करायचा कसा? निश्चितपणे असा बोर्ड अनधिकृत बोर्ड काढतो. कुठेतरी तक्रारी केल्या जातात. यातून समाजात भिती निर्माण झाली पाहीजे. यातून काहीतरी दंडात्मक कारवाई व्हायला पाहीजे आहे. त्यांच्यावर एफ.आर.आय. दाखल करणे अशा कोणत्याही माध्यमातून त्यांच्यावर कारवाई करत नाही. निश्चितपणे याठिकाणी सरळ नुकसान होत असेल तर ते जबाबदार आहेच. आपण ही प्रशासनाची जबाबदारी समजून यांच्यावर कारवाई करावी. आत्ता मा.राजेंद्र जगताप यांनी काही गोष्टी निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला. परवानगी घेताना जाहिरातींचे बोर्ड लावतो. त्यात ब-याच गोष्टी आहेत. एखाद्या जाहीरातीच्या बोर्डाची परमिशन घेतो. त्याच्यावरच २/३ बोर्ड लावले जातात. हे बोर्ड वादळाने वा-याने पाडायची शक्यता असते. आपल्याला असे करता येऊ शकते. यावर कुठेतरी बोर्डवर महापालिकेचा नंबर असावा. असे असताना पाहिलेतर नंबर नसलेले असे कुठेतरी बोर्ड आहेत त्यामुळे अनधिकृत कोणता व अधिकृत कोणता ते ओळखता येत नाही. यामुळे शहराच्या सौंदर्यात निश्चितपणे बाधा येणार आहे. यावर निश्चित निर्णय घ्यावा. पुणे महापालिकेत अशा बोर्डसाठी खूप मोठ्या प्रमाणात दर लावतात यातून मोठा

उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होतो. शहराचे विकृतीकरण कुठेतरी थांबले पाहीजे. या माध्यमातून सावध व्हावे अशी इच्छा व्यक्त करतो.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, अनेक नेते लोक, नगरसेवक बोर्ड लावतात. त्यांच्यावर कारवाई होत नाही. पब्लिकने एखादा बोर्ड लावला तर त्याच्यावर मात्र कारवाई होते. आम्हाला लोक विचारतात, अशी भाडेवाढ का करतात. तुम्ही अधिका-यांना क्लिअर सूचना दिल्या पाहीजेत. बोर्ड लावले पाहीजेत. तुम्ही नागरीकांवर कारवाई करता. ज्येष्ठ नागरीकाला तुम्ही पाच हजाराची पावती फाडली. नगरसेवक, पुढारी,बिझनेसमन सगळे कायद्यासमोर समान आहेत.

**मा.अनंत को-हाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.आर.एस.कुमार यांनी अतिशय चांगला मुद्दा मांडला आहे. नेते असतील, गोरगरीब असतील असे फलक लावून शहराला विद्रूप करतात. त्यातून आपले उत्पन्न वाढत नाही. अशावेळी शहरामध्ये महापालिकेने ५ ठिकाणे फायनल करावीत. १० बाय १० चा बॅनर लावू शकलोतर चौकात बातमी लोकांपर्यंत जाऊ शकेल. लोक अनधिकृतपणे एवढे बोर्ड लावत आहेत. आपले शहर विद्रूप शहर होते आहे. कोणीही येतो बोर्ड लावतो आहे. लहान मुलांच्या वाढदिवसापासून मोठ्या नेत्याच्या वाढदिवसापर्यंत प्रत्येक मनुष्यांच्या वाढदिवसाचे बोर्ड लावले जात आहेत. अधिकृत बोर्डांचे दर वाढवायचा निर्णय तुम्ही निश्चितपणे घेतला आहे, त्याला आमची मंजुरी आहे. परंतू अनधिकृत फ्लेक्सवर कारवाई झाली पाहीजे. आम्ही एखाद्याला सांगितले हा अनधिकृत बोर्ड लावतोय तर असा निरोप जसाच्या तसा दुसरीकडे जातो. जे बोर्ड लावतात, त्यांच्यावर देखील बंधने पडली पाहीजेत. यावर चांगला विचार होऊन सूचना मांडली आहे. प्रत्येक प्रभागात १० बाय १० चे बोर्ड लावून उत्पन्न सुद्धा वाढेल अशी सूचना करतो.

**मा.संजय काटे** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला अनधिकृत फ्लेक्सबद्दल बोलायचे आहे. मला वाटते, आपल्याला हायकोर्टाचा आदेश असून सुद्धा आपल्या कर्मचा-यांकडून, म्हणजेच तुमच्याकडून या आदेशाची पायमल्ली होते आहे. शहरात इतके फ्लेक्स लावले जातात आणि आपले कर्मचारी ते मुद्दाम ठेवतात. शनिवार, रविवारी सुट्टी असते. त्यावेळी कार्यक्रमाचे फ्लेक्स लावले जातात. कार्यक्रम झाल्यानंतर हे फ्लेक्स काढून टाकले पाहीजेत. फ्लेक्स करायला दोन हजारपेक्षा जास्त खर्च येत नाही. हे प्लेक्स काढताना आपले कर्मचारी किंवा ते काढणारे फाडून काढतात, घेऊन जातात आणि त्याची फ्रेम तशीच राहते. म्हणजे पुन्हा काही कार्यक्रम असेल तर त्याचा फ्लेक्स त्या फ्रेमवर लागतो. तुम्ही त्यांना फ्रेमसह घेऊन जा असे म्हटले पाहीजे, असे फ्लेक्स काढणा-यांना सांगितले तर ते उत्तर देतात, हे आमच्या कामात येत नाही. आम्ही फोन केला की असे असे फ्लेक्स याठिकाणी लागले आहेत. ते सांगतात तुम्हाला माहित आहे का. कोणी केले असेल तर ते त्यांच्यामुळे आले आहे. मग कशावर बोलतोय. हायकोर्टाचे आदेश असून सुद्धा ते तसेच राहू द्यायचे का आपल्या मोबाईल टॉवर्सबद्दल आपण काय केले आहे. काही कारवाई किंवा काही केले आहे का

नाही. एमएसईबी यांना रोड खणण्यासाठी ६ महिने झाले, एवढा रेट द्या तेवढा रेट द्या असे करतोय. आम्ही त्याबद्दल काही बोलत नाही. ते आपली एवढी जागा वापरतात. त्यामुळे त्या भागाला काही धोका निर्माण होईल अशी शंका आहे. ते यावर करोडोंची संपत्ती कमवतात. त्यांच्यावर कारवाई करावी. काही नियम, कायदे आहेत का नाही. ते कशात बसतात का नाही. २० ते २५ हजाराची ते देत असतील तर आपण त्यांच्यावर काही टॅक्स लागू करतोय का. त्यांची परवानगी घेतली आहे का. याचा सर्वे आपण केला आहे का. आकाशचिन्ह विभागाबद्दल बोलत असालतर तो विभाग त्यात कंम्पलसरी घेतला पाहीजे. टॅक्समध्ये किंवा बजेटमध्ये त्याची कुठेही नोंद नाही. हे मला इथे खेदाने नमूद करायचे
आहे.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, फक्त पिंपरी चिंचवड नाहीतर जगामध्ये ॲडव्हर्टायझिंग मिडीया हे जोरात चालू आहे. प्रत्येक ठिकाणी ॲडव्हर्टायझिंगला खूप महत्व आले आहे. कोणीही राजकारणी असू देत,बिझनेसमध्ये, राजकारणामध्ये. ॲडव्हर्टायझिंग खूप मोठा रोल प्ले करतो. आज इथे अधिकृत/अनधिकृत होर्डींगसंदर्भात चर्चा चालू आहे. मा.शमिम पठाण ताईंनी सांगितल्याप्रमाणे बीएसएनएल, व्होडाफोनच्या टॉवरबद्दल कोणी काही बोलत नाही. टप-या उभ्या करुन प्रत्येक चौक विद्रूप करतात. त्याबद्दल कोणी बोलत नाही. आज चौकाचौकात चायनिजच्या गाड्या चालू आहेत. अनधिकृतपणे परमिटरुम चालू आहेत. याठिकाणी कोणाचेच लक्ष जात नाही. आज जाहिरातबाजी हे खूप मोठे क्षेत्र झाले आहे. आपण यावर बंधन टाकले पाहीजे. आपण जाहीरातींतून शहरामध्ये चांगला संदेश देण्याचे काम करु शकतो. स्वाईन फ्ल्यूसारखा महाभयानक रोग शहरात आलातरी आपण होर्डींग लावून मेसेज देऊन सांगू शकतो. जाहीरातीखाली झाडे लावा झाडे जगवा असा किंवा अन्य काही मेसेज टाकून किंवा आरोग्यासंदर्भात मेसेज टाकणे बंधनकारक करता येईल. चॅनलवर बातम्या चालल्या असल्यातरी खाली जाहिरात चालू असते. सिस्काची ॲड चालू असते. न्यूज चालू असतात. मा.आर.एस.कुमार म्हणाले, त्याप्रमाणे आमच्यासारखे लोक ॲड करत असतात. इथे अधिका-यांना स्ट्रिक्टली सांगीतले पाहीजे. डि.वाय.पाटील कॉलेज सारख्या ठिकाणी लहान लहान मुलांचे, अंडरएज असणारे त्यांचे सुद्धा फ्लेक्स लावतात. त्यामुळे तिथे गडबड चालू होते, भांडण होते. हाणामा-या चालू होतात. याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. होर्डींग संदर्भात हे डेफिनेटली पाहणे गरजेचे आहे. आज बिझनेस वाढवण्यासाठी जाहीरात करणे आवश्यक आहे. चौकात गेलात की एक मेसेज हजारो लोकांपर्यंत एका मिनिटांत पोहोचतो. हा मिडीया आहे. हे गरजेचे आहे. त्याला काही दोष देता येणार नाही. कोणी कोणाचे होर्डींग लावायचे हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. आपल्याला उत्पन्न मिळते का नाही हा प्रश्न आहे. त्या माध्यमातून प्रशासनाने ठरविल्याप्रमाणे रेट ठरविले असतील तर मग ज्याची मर्जी आहे त्याने रेट प्रमाणे ते लावलेच पाहीजेत. कोणी महापालिकेचा जावई नाही. त्याच्याकडून तो चार्ज घेतला पाहीजे. मी मा.महापौर यांना विनंती करतो की, या विषयाला उपसूचना देणार आहे, ती तुम्ही मान्य करावी. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये जाहीरात फलक उभारुन जाहिराती केल्या जातात. त्यावर महानगरपालिकेमार्फत जाहिरात कर, परवाना फी व जाहीरात फलक म.न.पा. जागेत असल्यास जागाभाडे आकारणी करणेत येऊन परवाना दिला जातो. महानगरपालिकेच्या उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने जाहिरातीचे दरात प्रस्तावात नमूद

परीशिष्ट अ मधील अ.क्र. १ वरील जाहिरात  फलक/आकाश चिन्ह/जमिनीवरील, टेरेसवरील इ. सर्व ठिकाणचे जाहिरात फलकास सन २०१५-१६ करीता सुचविणेत आलेला दर प्रतिचौरस फूट प्रतिमहा र.रु. १० ऐवजी प्रति चौरस फूट प्रतिमहा र.रु.१५ अशा दुरुस्तीसह मान्यता देणेत येत आहे तसेच विशिष्ट चौकांची यादी प्रस्तावात नमूद परिशिष्ट ब मध्ये नमूद केलेले परवाना फी ऐवजी प्रति चौरस फूट दर र.रु. १५ प्रतिमाह परवाना फी करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.जितेंद्र ननवरे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.आशा शेंडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर हा विषय आकाशचिन्ह व परवाना विभागाचा आहे. हे खरेतर उत्पन्नाचे मोठे साधन होऊ शकते. भविष्यात पुढे जाऊन एलबीटी बंद होणार आहे असे म्हटले जाते आहे. एलबीटीचे उत्पन्न दिवसेंदिवस घटते आहे. ही वस्तुस्थिती नाकारुन चालणार नाही. आत्ता आपला इन्कमसोर्स चांगला आहे. परंतू नवीन गावांची आखणी करणे, त्यासाठी लागणारी तरतूद ही आव्हाने आहेत. त्याला चांगल्या पद्धतीने उत्तर द्यायचे असेल, विकास करायचा असेलतर तशी तरतूद चांगल्या पद्धतीने असणे आवश्यक आहे. आपण एलबीटीवर पूर्णपणे विसंबून राहू शकतो असे वाटत नाही. निश्चितपणे आपल्याकडे इन्कम सोर्स चांगला असेल तर शहराला निश्चितपणे चांगल्या गोष्टी देऊ शकतो. खरेतर यात मोट्या प्रमाणात वाढ सूचवणे गरजेचे होते. ही वाढ सूचवली असती तर आपल्याकडे येणारे इन्कम वाढले असते. मग कोणाचे बोर्ड लागतात हा आपला संशोधनाचा विषय नाही. परंतू याठिकाणी प्रशासनाने एकही रुपायाची वाढ सूचवली नाही, याचा मला अत्यंत खेद वाटतो. आपण निवासी कर व व्यावसायिक कर या दोन्ही भागांमध्ये वाढ सूचवली आहे. मी माझ्या वस्तूचे मार्केटींग करणार आहे. त्यातून मला उत्पन्न मिळणार आहे तर त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात खर्च करुन शहराचे उत्पन्न कसे वाढेल या दृष्टिकोणातून प्रयत्न व्हायला पाहिजे होते. शिक्षण मंडळाचे बजेट आमच्याकडे कधी आले. स्थायी समितीच्या सदस्यांना त्यांचा अधिकार मिळाला पाहीजे. त्यांना वेळ मिळाला पाहीजे. कुठेतरी अधिकारी इतके तयारीचे आहेत. त्यांना प्रॉपर टाईमिंग, कोणत्या वेळी विषय आणला तर त्यावर चर्चा होणार नाही हे ठाऊक आहे. याचे परफेक्ट गणित त्यांना माहित आहे. मग या तयारीने आलेले अधिकारी प्रॉपर विषय आणतात. जास्त चर्चा न करता विषय मंजूर करतो. वृक्ष प्राधिकरणाचा विषय असो, शिक्षण मंडळाचा विषय असो, आकाशचिन्ह परवाना विभागाचा विषय असो, शहरातले जे मोठे मोठे विषय आहेत ते तशाच प्रकारचे आणले जातात. यामध्ये कुठेतरी लक्ष घाला. आपण यावर कुठेतरी अंकुश ठेवावा.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर जाहिरात फलकाचा विषय असल्यामुळे प्रेशरसुद्धा आहे, बोलायचे का नाही. पण घाबरायचे काही कारण नाही. मी आत्ताच कडूसकर साहेबांना विचारले, शहरात अधिकृत फलक किती लावले आहेत? त्यांनी माहिती दिली, अधिकृत फलक १०४४, त्यातून मिळणारे उत्पन्न रु.२,५२,००,०००/-, जाहिरात करातून मिळणारे उत्पन्न रु.१,०४,००,०००/- असे त्यांनी सांगितले. आपल्या लोकांना १ २ ३ ४ फलक असे मोजता येतात का. किती खोटे काम करावे याला काही मर्यादा राहीलेली नाही. मग एखादा कॉन्ट्रॅक्टर मग त्याला कसे बदनाम करायचे. तुमच्याकडे ४०/४५ प्लेयर्स आहेत. ३०० अनधिकृत

फलक आहेत. आपल्या घरी आपणच चोरी करायची. जे लागेल ते रितसर घ्या. तेही घेण्याची आपली वृत्ती नसेलतर उत्पन्नाचा काही स्त्रोत वाढवावा. कमी कसे होईल यावर प्रयत्न करत असाल कर आपले टायटॅनिक व्हायला वेळ लागणार नाही. याचा गंभीरपणे विचार केला पाहीजे. आयुक्त म्हणून तुम्हीसुध्दा या विभागाकडे लक्ष द्या परवाना विभागाला मी माहिती अधिकारात २६ तारखेला पत्र दिले होते. ही २६ गेली. परवाना विभागाने मला एक रुपयाची सुध्दा माहिती दिलेली नाही. अधिकृत किती अनधिकृत किती. या प्रत्येकाचा व्यवहार वेगळा, वेगवेगळ्या नावाच्या पावत्या असतील. त्यांच्या नावावर किती किती रक्कम जमा होते याची माहिती मागितली होती. प्रशासनाला शरम वाटली पाहीजे. आपण माहिती देत नाही आणि बजेटला विषय देतो. कशाला बजेट पास करतो. आज वृक्ष प्राधिकरणाचा विषय आहे. शहरात वृक्ष किती आहेत हे मोजायला ते काल गेले होते तुमच्या नावाने पत्र दिले पाहीजे. सकाळपासून ताई बोला ताई बोला,दिले होते. तुम्ही चांगले करताय, मग येऊ द्या. कळायला नको. आम्ही शहराची ३३ टक्के ग्रीनरी राखतो, तुम्ही कोणाला उल्लू बनवताय. तो विषय घाईघाईने केला गेला होता. या गोष्टी मागची कारणे खूप वेगळी आहेत. माझी आपल्याला विनंती असेल की, आयुक्त साहेब आपण, महापौर साहेब व अन्य काही सदस्य बरोबर घ्या, आम्हाला बरोबर घेऊ नका. तुम्ही या फलकांची गणना करा. मनपाचे कर्मचारी काम करतात का नाही ते दिसू द्या. मग मनपाचे उत्पन्न कसे वाढते का नाही ते पण बघा. काही समोर येतच नाहीत. जे देत नाहीत त्याला आपण विचारतच नाही. अनधिकृत फलक का म्हणतो आहोत. आम्ही फलक लावला तर फौजदारी दाखल करायचे म्हणता. मग यांच्यावर आजपर्यंत काय केले. संबंधित विभाग माहिती पुरवत नाही. तुमच्याकडे असणारा हा अधिकृत आकडा आहे. त्यापेक्षा चांगला निकाल तर काय करणार ते ठरवा. आमची विनंती आहे, आम्ही सारखे सारखे तुम्हाला सांगणार. तिकडे जाऊ इकडे जाऊ त्यापेक्षा आम्हाला आमचा अधिकार वापरायचा आहे. आम्हाला आमचा अधिकार वापरु द्या. माझी आपल्याला विनंती असेल की, शहरातील फलकांची गणना झालीच पाहीजे या मताची मी आहे. ते किती स्क्वे.फूटाचे आहेत. काही ठिकाणी शंभर टक्के लिहिले आहे. काही ठिकाणी अजिबातच काही कळत नाही. काही ठिकाणी एक नंबर, दोन नंबर असे टाकलेले कासारवाडीत सुध्दा आहेत. ते सुध्दा बघा. मग आम्ही परवाना दिलेला आहे. फलकांची गणना करा. तुमच्या मागे अधिकारी बसलेले आहेत, त्यांना पाठवा. मनपाच्या तिजोरीत पैसे आले पाहीजेत. नागरीकांच्या कष्टांच्या पैशावर आमचा अधिकार नाही. परंतू मनपाच्या हद्दीत जे व्यवसाय करत असतीलतर मनपाचे सुध्दा उत्पन्न वाढले पाहीजे. या संस्थेचे ट्रस्टी म्हणून आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. मा.महापौर साहेब,आपण आयुक्त साहेबांना आदेश द्यावा, सर्व फलकांची गणना झाली पाहीजे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा जो कर वाढवण्याच्या दृष्टीकोणातून विषय आहे, या विषयाच्या अनुषंगाने आज पिंपरी चिंचवड शहराच्या दृष्टिकोणातून उद्या येणारे धोके आहेत एलबीटीतून उत्पन्न कमी झाले, एलबीटी बंद झालीतर या दृष्टीकोणातून पिंपरी चिंचवड शहर असेल ही महापालिका असेल हे आपले घर आहे. या घराच्या माध्यमातून तरतूद कशी करणार. कुठेतरी उत्पन्नाचे स्त्रोत वाढले गेले पाहीजेत या दृष्टीकोणातून सर्वजण पोडतिडकीने चर्चा करत आहेत. चर्चा करत असताना खरेतर आज

आपण बघितले तर निश्चित ही ओरड आहे. बोर्डाला कुठेतरी नंबरींग पाहीजे. आत्ता अधिकारी नवीन आहेत. त्यांना पुणे मनपाचा अनुभव असेल. त्यांनी पिंपरी चिंचवडमध्ये चांगल्या पद्धतीने लक्षात घेऊन काम केले गेले पाहीजे. अधिकृत व अनधिकृत कोण, डिव्हायडरला दिलेली परमिशन, लाईट बोर्ड यांचे दिलेले परवाने हे सुद्धा मोजले पाहीजेत त्यानंतर त्यात वीक/मायनस पॉईंट आहे. एक जाहीरात किती दिवसांसाठी दिलेली आहे. परत मुदत संपल्यानंतर दुसऱ्याला दिली गेली आहे का. मनपाच्या बसस्टॉपवर लोक जाहिरात करतात. पत्रके लावतात. मनपाच्या इतक्या सुंदर भिंती पेंट केल्या आहेत. कोणीही जाऊन पत्रक लावतो. अनधिकृत बोर्डसाठी प्रभागात अशी काहीतरी कमिटी झाली आहे. मग काही प्रभागांनीच काम करायचे आणि काहींनी काही काम केले नाही. मी मागील सभेत म्हटले होते. मग ज्यांनी काम केले नाही, त्यांचे काय केले. मघाशी मा.राजेंद्र काटे यांनी सांगितले, एक दूकान त्याचे पाच बोर्ड लागतात. त्याचे भाडे तो भरत नाहीत. इतके बोर्ड लावतात. कधी कधी कॉर्नरला लावतात, अपघाताचे प्रमाण वाढू शकते. मागील वर्षी हेच सांगितले होते. वॉर्डात फ्लेक्ससाठी जागा ठरवून द्या. फ्लेक्स कुठे-कुठे लावले पाहीजेत. खरेतर नागरीकांच्या सोईच्या दृष्टीने महत्वाचे आहे. काहीतरी कार्यक्रम आहे. नागरीकांनी बघितला तर त्यांनाही सवय लागेल. ते येता जाता बघतील. त्यांचे सुद्धा भाडे घ्या. जिथे जागा आहे, तिथेच हे बोर्ड, फ्लेक्स लागतील. नगरसेवकांना, नागरिकांना ज्यांना लावायचे त्यांना लावू द्या. आपण त्यांना म्हणून शकत नाही बोर्ड लावू नका. त्यांचे सुद्धा १०० टक्के भाडे घ्या. छोटे-छोटे बोर्ड आहेत. बोर्ड लावायचा, काढायचा टाईमपिरियड ठेवा. अधिकृत बोर्ड ठेवा, अनधिकृत बोर्ड काढून टाका. दवाखाने, दूकाने सगळ्यांच्याबाबतीत तसेच आहे. आपण बसवलेले बेंचेस बघितले त्यावर सुद्धा जाहिराती चिकटवतात. डी.पी. त्यावर सुद्धा चिटकवलेले आहेत. वाचनालयांवर लावलेले असतात. बसेसवर सुद्धा कागद लावतात. लावताना विचारत नाहीत. मनपाची प्रॉपर्टी आहे ना मग करा खराब. कोणी विचारणार नाही. आपले काही बिघडणार नाही. आपण फक्त या जाहिरातीकडे बघतो. १९९२ मध्ये फिरती लायसन्स दिली होती. इथे कुठलेही काहीही धोरण आखले गेलेले नाही. इथे आपण डोळेझाक करतोय. श्वास घ्यायला पिपंरी चिंचवड शहरात फूटपाथ सुद्धा रिकामे राहीलेले नाहीत. फ्रूटवाले, भाजीवाले, चिकनवाले, चायनीजवाले, अंडीवाले, आता उन्हाळा सुरु झालातर माठवाले, कुंड्यावाले, कुल्फीवाले, आईसक्रिमवाले, ज्यूसवाले. परवा थेरगावमधून संध्याकाळी ९ वा. येत होते. इथे रोडवर मार्केटमध्ये लोक रोडवर उभे राहतात. इतका कचरा टाकतात. त्यांना थोडे सुद्धा मनाला वाईट वाटत नाही. ते रोडवर फूकट बिझनेस करतात. कचरा तसाच सोडून जातात. रात्री ९.०० वा. नंतर एवढी वाईट अवस्था होती. यातून आरोग्याचा प्रश्न वाढत असतो. मनपाचा कर्मचाऱ्याने हे करायचे कोण विचारतोय का. पुण्यात संभाजी पार्क इथे जा. शहाळ्याचे पाणी घ्यायचे असेल तर तो गाडीवाला म्हणेल पुण्यात नियम फार क़डक आहे. एक बाई उभी होती. तिने स्पष्ट सांगितले, शहाळे पिणार असाल तर इथेच प्या. इथे डस्टबीनमध्येच त्या नारळाची साल टाका. आपल्याकडील नागरीकांना असे काही वाटत नाही का. पुण्यामध्ये असे चालते. तिथे कुठेही कचरा टाकू देणार नाहीत. नाहीतर त्या विक्रेत्याला उद्या तिथे उभा रहायला परवानगी मिळणार नाही. आपल्याकडे हे का चालत नाही. २०/२५ रुपयाची वस्तू आहे, त्यात शंभर टक्के बिझनेस आहे. यावर कुठेतरी बंधन आले पाहीजे. जिथे तिथे जाहीरात होते. बसस्टॉप सगळे घाण करुन टाकले आहेत. उरले सुरले टॉयलेटमध्ये सुद्धा तिथेही जाहिराती

चिकटवतात. महापालिकेची कोणतीही प्रॉपर्टी सुस्थितीत नाही. यावर कुठेतरी निर्णय घेतला गेला पाहीजे. इलेक्शनच्या काळात आपण घर, बंगल्यावर पेंटींग करायला गेलोतर एनओसी घ्यावी लागते,आमची जाहीरात करु का. त्यांनी एनओसी दिलीतरी निवडणूका संपल्यावर परत आहे तसे कलरींग करुन द्या असे तो माणूस म्हणतो. या प्रॉपर्ट्या आहेत, यातून छोट्या-छोट्या गोष्टींमधून उत्पन्न मिळणार आहे. यात एक/दोन गोष्टींकडे बघून चालणार नाही. अनधिकृतमधून कलेक्शन झालेतर आज जे चार कोटी मिळतात त्याचे दहा कोटी मिळतील. या सगळ्या माध्यमातून आपल्याला उत्पन्न वाढवता येईल. मनपाचे उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न केला पाहीजे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६४१ विषय क्रमांक - ६
दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/७/कावि/११/२०१५दि.१६/०१/२०१५
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.७६ दि.३१/०१/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये जाहिरात फलक उभारुन जाहिराती केल्या जातात. त्यावर महानगरपालिकेमार्फत जाहिरात कर, परवाना फी व जाहिरात फलक म.न.पा. जागेत असल्यास जागाभाडे आकारणी करणेत येऊन परवाना दिला जातो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ नुसार आकारण्यात येणारे परवाना फीचे दर सन २०१५ - १६ करिता निश्चित करणेकामी व महानगरपालिकेच्या उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने जाहिरातीचे दरात प्रस्तावात नमुद परिशिष्ट "अ" प्रमाणे सर्व साधारण क्षेत्रासाठी परवाना फी चे दर प्रस्तावित केले आहेत. त्यामध्ये प्रस्तावात नमुद परिशिष्ट "अ" मधील अ.क्र.१ वरील जाहिरात फलक/आकाशचिन्ह (होर्डिंग्ज)/ जमीनीवरील, इमारतीवरील, टेरेसवरील इ. सर्व ठिकाणचे जाहिरात फलकास सन २०१५-१६ करिता सुचविणेत आलेला दर प्रति चौरस फुट प्रतिमहा र.रु.१०/- ऐवजी प्रति चौरस फुट प्रतिमहा र.रु.१५/- अशा दुरुस्तीसह मान्यता देणेस तसेच विशिष्ट चौकांची यादी प्रस्तावात नमुद परिशिष्ट "ब" मध्ये नमुद केलेप्रमाणे परवाना फी चे दर प्रस्तावित करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये जाहीरात फलक उभारुन जाहिराती केल्या जातात. त्यावर महानगरपालिकेमार्फत जाहिरात कर, परवाना फी व जाहीरात फलक म.न.पा. जागेत असल्यास जागाभाडे आकारणी करणेत येऊन परवाना दिला जातो. महानगरपालिकेच्या उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने जाहिरातीचे दरात प्रस्तावात नमूद परीशिष्ट अ मधील अ.क्र.१ वरील जाहिरात फलक/आकाश चिन्ह/जमिनीवरील, टेरेसवरील इ. सर्व ठिकाणचे जाहिरात फलकास सन २०१५-१६ करीता सुचविणेत आलेला दर प्रतिचौरस फूट प्रतिमहा र.रु. १० ऐवजी प्रति चौरस फूट प्रतिमहा र.रु.१५ अशा दुरुस्तीसह मान्यता देणेत येत आहे तसेच विशिष्ट चौकांची यादी प्रस्तावात नमूद परिशिष्ट ब मध्ये नमूद केलेले परवाना फी ऐवजी प्रति चौरस फूट दर र.रु. १५ प्रतिमाह परवाना फी करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विषय क्रमांक ७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६४२ विषय क्रमांक - ७

दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/७/कावि/८०२/२०१४,दि.३०/१२/२०१४

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.७७ दि.६/०२/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३, ३७६ व उपविधीनुसार उद्योगधंदा व्यवसाय, साठा परवाने देण्यात येतात. या व्यावसायिकांकडून परवाना फी प्रती वर्षी वसुल करणेत येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ चे तरतूदीस अधिन राहून प्रति वर्षी परवाना फी चे दर निश्चित करण्यात येतात. त्यानुसार प्रचलित सन २०१४-१५ दरामध्ये १०% दरवाढ सर्व उपरोक्त तिन्ही प्रकारच्या परवान्यांसाठी करणेत येऊन सन २०१५-१६ साठी प्रस्तावित दर दर्शविणारे उद्योगधंदा परवाना फी साठी प्रपत्र “अ”, व्यवसाय परवाना फी साठी प्रपत्र “ब”, व साठा परवाना फी साठी प्रपत्र “क” प्रमाणे दर निश्चितीस मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विषय क्रमांक ८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६४३ विषय क्रमांक - ८

दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.ज.शु.के./वि/४७/२०१५,दि.०५/०२/२०१५

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.७८ दि.६/०२/२०१५

अशुध्द जल उपसा केंद्र, रावेत येथे टप्पा क्र. ३ व ४ योजने अंतर्गत अतिरिक्त सर्ज अरेस्टर यंत्रणा बसविणे व अनुषंगिक कामे करणेकामी येणारा अंदाजे र.रु.१,५४,४०,०००/-

(अक्षरी र.रु.एक कोटी चौप्पन्न लाख चाळीस हजार फक्त) चे पूर्वगननपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - संबंधित अधिका-यांनी या विषयाची माहिती द्यावी.

**मा.गलबले (कार्य.अभियंता)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्य, टप्पा ३ व ४ ची क्षमता वाढवली आहे. पाईपलाईनची क्षमता वाढवण्यासाठी, लाईट गेलीतर शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होऊ शकतो म्हणून रावेत इथे सर्ज अरेस्टर बसवतोय.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विषय क्रमांक ९वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६४४ विषय क्रमांक - ९

दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.संजय वाबळे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव **-**
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.८० दि.६/०२/२०१५

मनपाचे वाय.सी.एम.हॉस्पिटल मधील बहुतांशी कर्मचा-यांची बँक खाती ही बँक ऑफ बडोदा, पिंपरी येथील मनपा मुख्य प्रशासकीय इमारत येथील शाखेत आहेत त्यामुळे तेथील कर्मचा-यांना बँक विषयक कामकाजासाठी पिंपरी येथील शाखेमध्ये यावे लागते. त्यामुळे तेथील कर्मचा-यांची गैरसोय होत आहे. वाय.सी.एम.हॉस्पिटल येथील कर्मचा-यांचे सोयीचे दृष्टीने वाय.सी.एम.हॉस्पिटल येथे बँक ऑफ बडोदाचे एटीएम चालू करणेबाबत वायसी.एम. हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिक्षक व पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघाची मागणी आहे बँक ऑफ बडोदा ही राष्ट्रीयकृत बँक असून भारत सरकारचा उपक्रम आहे. पिंपरी चिंचवड मनपाचे बहुतांशी आर्थिक व्यवहार याच बँकेमार्फत हाताळले जातात. तरी मनपाचे कामकाजाचे सोयीचे दृष्टीने वाय.सी.एम.हॉस्पिटल आवारात बँक ऑफ बडोदा या बँकेस विना निविदा थेट पध्दतीने १० वर्ष कालावधीसाठी मनपा नियमानुसार येणारे भाडे दराने एटीएम सेंटर चालू करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपाची सर्व क्षेत्रीय कार्यालये, आवश्यक दवाखाने, मनपाच्या सर्व शाळा व इतर विभागीय कार्यालयांमध्येही आवश्यकतेनुसार वाय.सी.एम.हॉस्पिटलचे धर्तीवर बँक ऑफ बडोदाचे एटीएम सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विषय क्रमांक १०वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १०

दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/पिं.गुरव/ड-८/१/१५ दि.२०/०१/२०१५

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.३९ दि.९/०२/२०१५

मौजे पिंपळे गुरव गावाचे विकास योजनेनुसार स.नं.५१ पैकी व ५२ पैकी जागेत आरक्षण क्र.३४५, मनपा उपयोगाचे आरक्षण प्रस्तावित आहे. सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र सुमारे ४००४.७५ चौ.मी. आहे. सदर आरक्षणाचे भूसंपादन प्रस्ताव पाठविणेत आलेला असून संयुक्त मोजणी पूर्ण झालेली आहे. सदर आरक्षणाचे जागेपैकी सद्यस्थितीत टी.डी.आर.च्या माध्यमातून सुमारे ३५३९.५२ चौ.मी.जागेचा ताबा महानगरपालिकेकडे आहे. सदर जागेत नाटयगृह बांधणेचे नियोजन आहे. सदर बाबत संबंधित जागा मालक यांचे मालकीचे क्षेत्र वगळून उर्वरित ३५ गुंठे जागेत नाटयगृहाचे काम करता येईल असे सह शहर अभियंता, स्थापत्य, ड प्रभाग यांनी त्यांचे दि.२३/०९/२०१४ चे पत्रानुसार कळविले आहे. तरी एकूण आरक्षणाचे क्षेत्र ४००४.७५ पैकी महानगरपालिकेचे ताब्यात असलेले ३५३९.५२ चौ.मी.क्षेत्र सोडून बांधकामे असलेले उर्वरित सुमारे ४६५.२३ चौ.मी.क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसारची कार्यवाही प्रस्तावित करणेत येत आहे. तरी बाधीत मिळकतधारक व स्थापत्य ड प्रभाग यांचे मागणीनुसार मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.५१ पैकी व ५२ पैकी मधील आरक्षण क्र.३४५, मनपा उपयोग पैकी जागेतील सुमारे ४६५.२३ चौ.मी. क्षेत्र आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेकामी हरकती व सूचना मागवून अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय पुढील कार्यवाही करण्याकरीता व शासनास प्रस्ताव सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.साधना जाधव** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - मौजे चिखली, कुदळवाडी येथे पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचा स्पाईन रस्ता ते देहुआळंदी रस्त्यापर्यंत बीआरटी रस्ता आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या विकास योजनेत कुदळवाडी येथील रस्ता काही ठिकाणी ३० मी. व काही ठिकाणी २४ मी. रुंद आहे. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीत स्पाईन रस्त्याजवळ फ्लॉयओहर असल्याने त्याच्या पोहच रस्त्यासाठी २४ मी.रस्ता ३० मी.रुंद करण्याची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ च्या कलम ३७ अन्वये कार्यवाही प्राधिकरणा मार्फत चालू आहे तसेच सदर फ्लॉयओहर जवळीस मनपाच्या हद्दीतील १.०० कि.मी. रस्त्याची रुंदी २४ मी. ची ३० मी. करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ च्या कलम ३७ अन्वये कार्यवाही चालू आहे, तथापि सदर रस्ता उत्तर बाजुस ज्या ठिकाणी देहु आळंदी रस्त्यास मिळतो त्या ठिकाणी (गट नं.७१४ ते देहु आळंदी रस्ता) तो २४ मी. रुंद आहे. त्यामुळे भविष्यात सदर ठिकाणी वाहतुकीला प्रचंड प्रमाणात अडथळा निर्माण होणार आहे त्यामुळे चिखली, कुदळवाडी येथील स्पाईन रस्ता ते देहु आळंदी रस्ता या रस्त्यावरील देहु-आळंदी रस्त्याजवळील (गट नं. ७१४ ते देहु आळंदी रस्ता) (अंदाजे ५०० मी.रस्ता) २४ मी.रुंद रस्ता ३० मी.रुंद करण्यासाठीच्या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ च्या कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस व तसा प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.जितेंद्र ननवरे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - म.फुलेनगर प्रभाग क्र. ३७ मधील नागरीकांसाठी खेळाच्या मैदानासाठी जागा उपलब्ध नसल्याने पिं.चिं. म.न.पा. विकास आराखडयातील एम.आय.डी.सी हद्दीतील आरक्षण क्र.३९ नाल्याच्या व एच.सी.एम.टी.आर. मैदानासाठी उपलब्ध करुन देणेकरीता एम.आय.डी.सी. रेखांकनातील ज्या मोकळया जागा (open space) पैकी २ एकर जागा ज्या मनपाच्या उपयोगात नाही अथवा ज्या जागेवर वृक्षारोपण केले नसेल वा अतिक्रमण होण्याची शक्यता आहेत त्या जागा पुन्हा एम.आय.डी.सी. कार्यालयाला देऊन त्या बदल्यात आरक्षण क्र. ३९ मधील मोकळी जागा विनामोबदला मनपाच्या ताब्यात खेळाच्या मैदानासाठी घेण्याकरीता प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.कैलास थोपटे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.विनायक गायकवाड** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - पिंपरी चिंचवड महानगरपालिके मधील मौजे वाकड या गावाच्या विकास आराखडयामध्ये मौजे वाकड येथील सर्व्हे नं.१७६ मध्ये १८ मी. व २४ मी. रुंदिअसलेले डि.पी. रस्त्याचे आरक्षण दर्शविलेले आहे. त्यातील १८ मी. रुंदिचा रस्ते एकमेकास काटकोनात आहेत. त्यापैकी उत्तर दक्षिण असणा-या १८ मी. रुंद रस्त्याचे पूर्व बाजूस आरक्षित असलेल्या १८ मी. रुंदिचा विकास योजना रस्ता हा पुढे प्राधिकरणाच्या हद्दीतून जाऊन २४ मी.रुंदिच्या उत्तर दक्षिण रस्त्यास मिळतो. निगडी प्राधिकरण हद्दीमध्ये असा १८ मी. रुंदिचा रस्ता प्रस्तावित नाही. त्यामुळे विकास आराखडयात

दर्शविलेला १८ मी. रुंदिचा रस्ता हा वाकड हद्दीतच मर्यादित होणार असून अशा रस्त्याचा भविष्यात कोणताही उपयोग नाही.

सदर १८ मी.रुंद रस्त्यामध्ये महानगरपालिका तसेच प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये तसेच प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये दत्तात्रय नगर क्रं. १,२,३ मध्ये रहिवासी रहात असून त्यांची सर्व घरे १८ मी. रुंदिच्या रस्त्यामध्ये बाधित होत आहेत. रस्त्यामुळे बाधित होणा-या घरांची संख्या जवळपास १३० एवढी आहे. सदर रहिवासी गेले २०-२५ वर्षापासून या घरांमध्ये रहात आहेत त्यामुळे सदर रस्ता विकसित होवू शकणार नाही.

उत्तर दक्षिण असणा-या १८ मी. रुंद रस्त्याचे पुर्व बाजूस आरक्षित असलेल्या १८ मी. रुंदीच्या रस्त्यापासून दक्षिण बाजूस केवळ ८० मी. अंतरावर सध्या १२ मी. रुंदीचा समांतर डांबरी रस्ता अस्तित्वात आहे हाच रस्ता पुढे प्राधिकरणाच्या हद्दीतून जाऊन २४ मी. रुंदीच्या उत्तर दक्षिण रस्त्यास मिळतो व त्यामुळे वाहतुकीच्या दृष्टीने कोणतीही अडचण येत नाही तथापि हा अस्तित्वातील रस्ता विकास आराखडयात दर्शविलेला नाही. सदर अस्तित्वातील/वापरात असलेल्या रस्ता विकास आराखडयात दर्शवून तो पुढे भविष्यात १८ मी.रुंदीचा करता येवू शकतो.

त्यामुळे सदर उत्तर दक्षिण असणा-या १८ मी. रुंद रस्त्याचे पुर्व बाजूस आरक्षित असलेल्या १८ मी.रुंदीचा विकास योजना रस्त्याची आवश्यकता नसल्याने कलम ३७ अन्वये असणा-या तरतूदीनुसार रद्द करणे अथवा डि.सी.रुल १४.४.१ जी अन्वये शिफ्ट करणेबाबत योग्य ती कार्यवाही करणेसाठी मा.आयुक्त यांना सर्व अधिकार देणेस मान्यता देणेत यावेत.

**मा.राजेंद्र जगताप** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.
**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६४५ विषय क्रमांक - १०
दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/पिं.गुरव/ड-८/१/१५ दि.२०/०१/२०१५
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.३९ दि.९/०२/२०१५

मौजे पिंपळे गुरव गावाचे विकास योजनेनुसार स.नं.५१ पैकी व ५२ पैकी जागेत आरक्षण क्र.३४५, मनपा उपयोगाचे आरक्षण प्रस्तावित आहे. सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र सुमारे ४००४.७५ चौ.मी. आहे. सदर आरक्षणाचे भूसंपादन प्रस्ताव पाठविणेत आलेला असून संयुक्त मोजणी पूर्ण झालेली आहे. सदर आरक्षणाचे जागेपैकी सद्यस्थितीत टी.डी.आर.च्या माध्यमातून सुमारे ३५३९.५२ चौ.मी.जागेचा ताबा महानगरपालिकेकडे आहे. सदर जागेत नाटयगृह बांधणेचे नियोजन आहे. सदर बाबत संबंधित जागा मालक यांचे मालकीचे क्षेत्र वगळून उर्वरित ३५ गुंठे जागेत नाटयगृहाचे काम करता येईल असे सह शहर अभियंता, स्थापत्य, ड प्रभाग यांनी त्यांचे दि.२३/०९/२०१४ चे पत्रानुसार कळविले आहे. तरी एकूण आरक्षणाचे क्षेत्र ४००४.७५ पैकी

महानगरपालिकेचे ताब्यात असलेले ३५३९.५२ चौ.मी.क्षेत्र सोडून बांधकामे असलेले उर्वरित सुमारे ४६५.२३ चौ.मी.क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसारची कार्यवाही प्रस्तावित करणेत येत आहे. तरी बाधीत मिळकतधारक व स्थापत्य ड प्रभाग यांचे मागणीनुसार मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.५१ पैकी व ५२ पैकी मधील आरक्षण क्र.३४५, मनपा उपयोग पैकी जागेतील सुमारे ४६५.२३ चौ.मी. क्षेत्र आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेकामी हरकती व सूचना मागवून अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय पुढील कार्यवाही करण्याकरीता व शासनास प्रस्ताव सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे चिखली, कुदळवाडी येथे पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचा स्पाईन रस्ता ते देहु आळंदी रस्त्यापर्यंत बीआरटी रस्ता आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या विकास योजनेत कुदळवाडी येथील रस्ता काही ठिकाणी ३० मी. व काही ठिकाणी २४ मी. रुंद आहे. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीत स्पाईन रस्त्याजवळ फ्लॉयओहर असल्याने त्याच्या पोहच रस्त्यासाठी २४ मी.रस्ता ३० मी.रुंद करण्याची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ च्या कलम ३७ अन्वये कार्यवाही प्राधिकरणा मार्फत चालू आहे तसेच सदर फ्लॉयओहर जवळीस मनपाच्या हद्दीतील १.०० कि.मी. रस्त्याची रुंदी २४ मी. ची ३० मी. करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ च्या कलम ३७ अन्वये कार्यवाही चालू आहे, तथापि सदर रस्ता उत्तर बाजुस ज्या ठिकाणी देहु आळंदी रस्त्यास मिळतो त्या ठिकाणी (गट नं.७१४ ते देहु आळंदी रस्ता) तो २४ मी. रुंद आहे. त्यामुळे भविष्यात सदर ठिकाणी वाहतुकीला प्रचंड प्रमाणात अडथळा निर्माण होणार आहे त्यामुळे चिखली, कुदळवाडी येथील स्पाईन रस्ता ते देहु आळंदी रस्ता या रस्त्यावरील देहु-आळंदी रस्त्याजवळील ( गट नं. ७१४ ते देहु आळंदी रस्ता ) (अंदाजे ५०० मी.रस्ता) २४ मी.रुंद रस्ता ३० मी.रुंद करण्यासाठीच्या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ च्या कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस व तसा प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच म.फुलेनगर प्रभाग क्र. ३७ मधील नागरीकांसाठी खेळाच्या मैदानासाठी जागा उपलब्ध नसल्याने पिं.चिं. म.न.पा. विकास आराखडयातील एम.आय.डी.सी हद्दीतील आरक्षण क्र. ३९ नाल्याच्या व एच.सी.एम.टी.आर. मैदानासाठी उपलब्ध करुन देणेकरीता एम.आय.डी.सी. रेखांकनातील ज्या मोकळया जागा (open space) पैकी २ एकर जागा ज्या मनपाच्या उपयोगात नाही अथवा ज्या जागेवर वृक्षारोपण केले नसेल वा अतिक्रमण होण्याची शक्यता आहेत त्या जागा पुन्हा एम.आय.डी.सी. कार्यालयाला देऊन त्या बदल्यात आरक्षण क्र. ३९ मधील मोकळी जागा विनामोबदला मनपाच्या ताब्यात खेळाच्या मैदानासाठी घेण्याकरीता प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिके मधील मौजे वाकड या गावाच्या विकास आराखडयामध्ये मौजे वाकड येथील सर्व्हे नं.१७६ मध्ये १८ मी. व २४ मी. रुंदिअसलेले डि.पी. रस्त्याचे आरक्षण दर्शविलेले आहे. त्यातील १८ मी. रुंदिचा रस्ते एकमेकास काटकोनात आहेत. त्यापैकी उत्तर दक्षिण असणा-या १८ मी. रुंद रस्त्याचे पूर्व बाजूस आरक्षित असलेल्या १८ मी. रुंदिचा विकास योजना रस्ता हा पुढे प्राधिकरणाच्या हद्दीतून जाऊन २४ मी.रुंदिच्या उत्तर दक्षिण रस्त्यास मिळतो. निगडी प्राधिकरण हद्दीमध्ये असा १८ मी. रुंदिचा रस्ता प्रस्तावित

नाही. त्यामुळे विकास आराखडयात दर्शविलेला १८ मी. रुंदिचा रस्ता हा वाकड हद्दीतच मर्यादित होणार असून अशा रस्त्याचा भविष्यात कोणताही उपयोग नाही.

सदर १८ मी.रुंद रस्त्यामध्ये महानगरपालिका तसेच प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये तसेच प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये दत्तात्रय नगर क्रं. १,२,३ मध्ये रहिवासी रहात असून त्यांची सर्व घरे १८ मी. रुंदिच्या रस्त्यामध्ये बाधित होत आहेत. रस्त्यामुळे बाधित होणा-या घरांची संख्या जवळपास १३० एवढी आहे. सदर रहिवासी गेले २०-२५ वर्षापासून या घरांमध्ये रहात आहेत त्यामुळे सदर रस्ता विकसित होवू शकणार नाही.

उत्तर दक्षिण असणा-या १८ मी. रुंद रस्त्याचे पुर्व बाजूस आरक्षित असलेल्या १८ मी. रुंदीच्या रस्त्यापासून दक्षिण बाजूस केवळ ८० मी. अंतरावर सध्या १२ मी. रुंदीचा समांतर डांबरी रस्ता अस्तित्वात आहे हाच रस्ता पुढे प्राधिकरणाच्या हद्दीतून जाऊन २४ मी. रुंदीच्या उत्तर दक्षिण रस्त्यास मिळतो व त्यामुळे वाहतुकीच्या दृष्टीने कोणतीही अडचण येत नाही तथापि हा अस्तित्वातील रस्ता विकास आराखडयात दर्शविलेला नाही. सदर अस्तित्वातील/वापरात असलेल्या रस्ता विकास आराखडयात दर्शवून तो पुढे भविष्यात १८ मी.रुंदीचा करता येवू शकतो.

त्यामुळे सदर उत्तर दक्षिण असणा-या १८ मी. रुंद रस्त्याचे पुर्व बाजूस आरक्षित असलेल्या १८ मी.रुंदीचा विकास योजना रस्त्याची आवश्यकता नसल्याने कलम ३७ अन्वये असणा-या तरतूदीनुसार रद्द करणे अथवा डि.सी.रुल १४.४.१ जी अन्वये शिफ्ट करणेबाबत योग्य ती कार्यवाही करणेसाठी मा.आयुक्त यांना सर्व अधिकार देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विषय क्रमांक ११वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६४६ विषय क्रमांक - ११

दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.निवडणूक/१/कावि/४७/२०१५ दि.७/२/२०१५

मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र.सीईओ/एमआयएस २०१४/१०८/३३ दि.१७/११/२०१५ अन्वये मा.भारत निवडणुक आयोगाने दिलेल्या निदेशानुसार दिनांक-१/१/२०१५ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण मोहिमेअंतर्गत पुणे जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदार संघातील दुबार, मयत व स्थानांतरीत मतदार यांची वगळणीसाठी प्रस्तावित असलेल्या नावांची यादी(सी.डी.) सर्वसाधारण सभेमध्ये सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणावी तसेच सदरची मतदार यादी त्यांचे निदर्शनास आणलेबाबतचा ठराव करुन सदर सभेचे इतिवृत्त व ठरावाची प्रत कार्यालयास पाठविणेबाबत

मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी, पुणे यांचेकडील पत्र क्र.पी.ई-३/जा.क्र/२६/२०१५ दि.०७/०१/२०१५ अन्वये कळविले आहे.

त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील २०५, चिंचवड, २०६, पिंपरी व २०७, भोसरी विधानसभा मतदार संघातील दुबार, मयत व स्थानांतरीत मतदार यांची वगळणीसाठी प्रस्तावित असलेल्या नांवाची यादीची सी.डी मा.महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सर्व मा.नगरसदस्यांच्या निदर्शनास आणून दिलेबाबत मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विषय क्रमांक १२वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६४७ विषय क्रमांक - १२
दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

अ) दिनांक २४/१२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दिनांक १४/१/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.जितेंद्र ननवरे** - मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विषय क्रमांक १३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६४८ विषय क्रमांक - १३

दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.क्रिडा समिती</u>**

दि.७/१/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.जितेंद्र ननवरे** - मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विषय क्रमांक १४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १४

दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) अ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र. अप्र/११/कावि/६/२०१५ दि.०९/०१/२०१५

२) मा.अ प्रभाग समिती कडील ठ.क्र. ५१ दि. १७/१२/२०१४

३) मा.आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव.

ट्रान्सपोर्टनगरी सेक्टर २३ लगत (देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड हद्दीत) असलेल्या "दी इंस्टिटयूट ऑफ चार्टेड अकौंटन्ट ऑफ इंडिया" या कार्यालयास सध्य स्थितीत पिण्याचे पाण्याचा नळ नाही. सदर इंस्टिटयूट ने पाण्याचे नळ मिळणेकामी विनंती केलेली आहे. पिंण्याचे पाणी ही अत्यंत महत्वाची बाब असलेने त्यांना नळकनेक्शन देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.जितेंद्र ननवरे** - मा.महापौर साहेब हा विषय ३ महिन्यांसाठी तहकूब करणेत यावा.

**मा.विनायक गायकवाड** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६४९ विषय क्रमांक - १४
दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) अ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र. अप्र/११/कावि/६/२०१५ दि.०९/०१/२०१५
२) मा.अ प्रभाग समिती कडील ठ.क्र. ५१ दि. १७/१२/२०१४
३) मा.आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक १४ चा विचार जून-२०१५ चे सभेमध्ये करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विषय क्रमांक १५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६५० विषय क्रमांक - १५
दिनांक - २६/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) क क्षेत्रीय समिती कार्यालय यांचेकडील पत्र क्र. कक्षे कावि/४/२०१५ दि.२०/१/२०१५
२) मा.क प्रभाग समिती कडील ठ.क्र. १०३ दि. ७/१/२०१५
३) मा.अतुल शितोळे, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

सांगवी वॉर्ड क्र.५९ मधील मनपा विकास आराखडयामध्ये नमूद केलेले रस्ते रद्द करणेबाबत.

| अ.क्र. | डी.पी. मधील नमूद रस्ता | जवळील खूण |
|---|---|---|
| १ | स.नं. १४ ते २४ पर्यंत ग्रीन प्लेट लगतचा रस्ता | मधुबन कॉलनीमधील १२.०० मी. डी.पी.रस्ता |
| २ | सर्व्हे नं. ९ ते १२ (आ.क्र.३२१) चे लगतचा ९ मी.रस्ता | ढोरेनगर मधील ९ मी. नियोजित रस्ता |

तरी या भागामध्ये उपलब्ध असणारे इतर रस्ते विकसित झाले असल्याने व वरील रस्त्यांची आवश्यकता भासत नाही तरी सदर रस्ते विकास आराखडयापासून रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर** - सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/९२/२०१५
दिनांक - १६/०३/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.